शब्द


# रुची

आर्थिक विशेषांक

मार्च २०१५

मूल्य :१० रुपये


## आता मराठी माणूस ‘अमाउंट’ एव्हरेस्टकडे !



## गोवा येथील क्षणचित्रे



गोवा मॅरेथॉन स्पर्धेमध्ये
धावताना डॉ. प्रेमानंद रामाणी





रामाणीज् गोवा मॅरेथॉन २०१५, गोवा येथे 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची' आरोग्यविषयक विशेषांक अंकाचे प्रकाशन झाले.
त्यासमयी आनंद लिमये
गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर
वर्षा उसगांवकर
डॉ. प्रेमानंद रामाणी आणि
सुदेश हिंगलासपूरकर





रामाणीज् गोवा मॅरेथॉन २०१५, गोवा येथे डॉ. प्रेमानंद रामाणी लिखित 'Walk Jog Run' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन झाले.
गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर
वर्षा उसगांवकर
डॉ. प्रेमानंद रामाणी
आनंद लिमये आणि
सुदेश हिंगलासपूरकर

## डॉ. प्रेमानंद रामाणी यांची प्रसिद्ध पुस्तके





मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.




मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.




मूल्य १२० रु.
सवलतीत ७० रु.




मूल्य १३० रु.
सवलतीत ८० रु.




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मार्च २०१५, वर्ष दुसरे
अंक अकरावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **विनायक कुळकर्णी**
सहसंपादन : **सविता अमर**
मुखपृष्ठ : **पुंडलिक वझे**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**



## संपादकीय...

चाळिसावे वर्ष साजरे करताना दर महिन्याच्या 'शब्द रुची'ने विषयानुसार विशेषांक प्रसिद्ध करून, वाचकांच्या माहितीकोषात भर टाकून त्यांना समृद्ध करताना वाचनानंद प्राप्त करून दिला आहे. मार्चचा अंक अर्थविषयक आहे व त्याच्या संपादनाची जबाबदारी माझ्याकडे सोपवली आहे. त्याबद्दल मी 'ग्रंथाली'चे प्रथम आभार मानतो.

आर्थिक क्षेत्रातील क्लिष्टता कमी करून, रोजच्या जगण्याच्या संबंधित अर्थव्यवहारांच्या दृष्टीने आर्थिक साक्षर करताना वाचकांची अर्थशास्त्रीय व्यवहारातील रुची वाढण्यासाठी आपल्याला हा अंक करायचा आहे अशी खूणगाठ मनाशी बांधूनच तयारी केली. अर्थातच त्याची मांडणी व भाषा सुबोध आणि वाचकाला बांधून ठेवणारी हवी याचा अंदाज मला आला. आज सामान्य माणसाला प्रत्येक व्यवहारात 'अर्थशास्त्र' मूळ संकल्पनेपासून समजून घेणे शक्य नाही. शाळा–महाविद्यालयातील पुस्तकी ज्ञानाने सर्वच आर्थिक व्यवहार करता येत नसतात हे त्या त्या व्यवहारांचा अनुभव घेताना पदोपदी आपल्या लक्षात येते. परंतु ज्या राजकीय–सामाजिक–आर्थिक घटकांचा, व्यवस्थेचा, गुंतवणुकीचा संबंध रोजच्या जगण्यातील आर्थिक व्यवहारात येतो, किमान त्या घटकांच्या कार्यपद्धतींचा, गुंतवणुकीच्या विविध माध्यमांचा आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींचा कार्यकारणभाव किंवा परिणाम जरी जाणून घेतला तरी सामान्य माणसाला आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी मार्गक्रमण करणे सुलभ जाते.

हाच उद्देश मनात ठेवून अंकाच्या विषयांची निवड आणि मांडणी केली आहे. शहरी आणि ग्रामीण क्षेत्रांत अगदी बँकिंग सेवासुविधांपासून सुधारणा का आणि कशा करणे आवश्यक आहे ते जाणून घेतानाच मोठ्या राष्ट्रीयीकृत बँकांत होणारे विलिनीकरण ग्राहकांच्या बरोबरच बँक कर्मचाऱ्यांच्या कितपत सोयीचे असेल याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारी क्षेत्रातील बँका खाजगी क्षेत्राकडे वळण्याची व्यक्त होणारी शक्यता या अंकाच्या निमित्ताने पडताळून पाहता आली आहे.

ग्रामीण अर्थकारणाचा सहकारी पतसंस्थांशी असलेला संबंध निकोप करण्याच्या दृष्टीने विचारमंथन केले आहे. शहरातील आणि ग्रामीण क्षेत्रातील लोकांची गुंतवणुकीबाबत असणारी मानसिकता अभ्यासताना आर्थिक संस्कारांची गरज अधोरेखित होत आहे. सरकारद्वारे ठिकठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्रांची स्थापना करून विस्थापितांना नेमके मार्गदर्शन होत नाही, परिणामी विस्थापितांच्या हातात आलेल्या भूतो न भविष्यती पैशाला वाटा फुटतात आणि... काही वर्षांतच ते कंगाल होतात. या आर्थिक-सामाजिक प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्न या अंकाच्या निमित्ताने केला आहे. विम्यासारख्या क्षेत्रात परदेशी गुंतवणूकदारांना ४९ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करण्यास दिलेली मुभा लक्षात घेता, आजवर या क्षेत्राने रोजगार निर्मितीत केलेल्या प्रगतीचा आढावा घेत भविष्यातील अंदाज व्यक्त केला आहे. स्वतंत्र भारतातील करधोरणे देशाच्या आणि जनतेच्या प्रगतीला कितपत पोषक ठरली याचा पोलखोल करताना उदारीकरणानंतर बदललेल्या करधोरणांनी अनुभवावे लागणारे चांगले-वाईट परिणाम वाचकांच्या लक्षात आणून दिले आहेत. आज शहरी तसेच ग्रामीण क्षेत्रात फसव्या योजनांनी जाळे पसरले आहे. अशा बेकायदेशीर फसव्या योजनांत जोखीम घेणाऱ्या सामान्यजनांना शेअर बाजाराचे व्यवहारकुशल ज्ञान देऊन त्यांचा शेअर्स-म्युच्युअल फंड्सच्या माध्यमातून सहभाग कसा वाढविता येईल याचाही विचार या अंकात केला आहे. एकीकडे स्मार्ट शहरांची निर्मिती सुरू असताना गृहनिर्माण प्रक्रियेतला गृहकर्जाचा घटक कितपत विकसित होऊन विस्तारणार आहे याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आज मनोरंजनाच्या क्षेत्रातील सिनेमा-दूरदर्शन मालिकांतील अर्थकारण तितकेच महत्त्वाचे आणि लक्षवेधी ठरले आहे. पोस्टाच्या बचत योजनेत असलेली महिला शक्तीची उपयुक्तता आणि पोस्टल बँकेची निर्मिती यांची सांगड कशी घातली जाऊ शकते याचाही विचार केला गेला आहे. आगामी आर्थिक वर्षात आंतरराष्ट्रीय अर्थकारणाचे सोने-चांदी आणि शेअर्सवर होणारे परिणाम कसे असतील याचाही अंदाज घेण्याचा प्रयत्न या अंकात दिसून येईल. नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पाच्या दृश्य आणि अदृश्य परिणामांचा वेध घेतला आहे. पारंपरिक गुंतवणूक माध्यमे एकीकडे कवटाळून बसलेले दिसत असतानाच हुशार गुंतवणूकदारांनी निवडलेली अपारंपरिक माध्यमे वाचून वाचकांना सुद्धा आश्चर्य वाटेल.

अंकासाठी विविध मान्यवरांनी लेखांद्वारे दिलेला सहभाग, ख्यातनाम चित्रकार पुंडलिक वझे यांचे मुखपृष्ठ, सविता अमर आणि योगिता मोरे यांचे सहकार्य, यामुळे अंक वाचनीय व देखणा झाला आहे. तो संग्राह्य ठरेल अशी आशा आहे.

**– विनायक कुळकर्णी**



# विषयप्रवेश..

**विनायक कुळकर्णी**



भारतीय अर्थव्यवस्था जसजशी खुली झाली तसतशा जागतिक व्यापारातून उद्भवणाऱ्या जोखमाही वाढू लागल्या. २००८ साली जागतिक अर्थव्यवस्थेवर कोसळलेले अरिष्ट भारतीय अर्थव्यवस्थेवर विशेष परिणामकारी ठरले नाही. अर्थात यात काळ्या पैशांच्या अर्थव्यवस्थेने अधिकतम हातभार लावला असे म्हटले तर गैर ठरणार नाही. नॅशनल काउन्सिल फॉर अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER),नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी IPFP आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिनान्शियल मॅनेजमेंट (NIFM) या तीन सरकारी थिंक-टँक म्हणून गणल्या जाणाऱ्या संस्थांनी दिलेल्या अंदाजानुसार भारताच्या एकूण सकल उत्पन्नाच्या GDP ३०% किंवा किमान २५ लाख कोटी रुपये इतकी काळ्या पैशांची अर्थव्यवस्था आहे. ग्लोबल फिनान्शियल इण्टेग्रिटी या वॉशिंग्टन स्थित थिंक-टँकने केलेल्या अंदाजानुसार ४६२ बिलियन डॉलर म्हणजे २०,७९,००० कोटी रुपये इतका काळा पैसा १९४८ ते २००८ या साठ वर्षांत भारताबाहेर पाठवला गेला. स्विस बँकेशिवाय जर्मनीतील लिंचेस्टिन, ऑस्ट्रेलियातील सेंट किट्स द्वीपसमूह, ब्रिटिश वर्जिन आयलंड, लग्झेंबर्ग, सेशेल्स, मॉरिशस, मकाऊ या परदेशांतील ठिकाणी भारतातील काळा पैसा ठेवलेला आहे. १४५६ अब्ज डॉलर म्हणजे ७० लाख कोटी रुपये परदेशात गुंतवलेले किंवा ठेवलेले असून हा काळा पैसा गैरमार्गाने-हवालाद्वारे देशाबाहेर नेला आहे. अर्थतज्ज्ञ अरुणकुमार यांच्या मते विद्यमान एकूण सकल उत्पन्नाच्या अंदाजानुसार भारताच्या एकूण संपत्तीच्या ४०% संपत्ती काळ्या पैशांच्या रूपाने देशाबाहेर गेली आहे. २००० ते २००८ या आठ वर्षांत भारताचा १.०४ बिलियन डॉलर एवढा काळा पैसा परदेशात स्थलांतरित झाला. स्थावर मालमत्तेत सर्वात अधिक काळा पैसा गुंतलेला असून त्यानंतर सोन्याचा किंवा अलंकारांचा क्रमांक लागतो. ग्राहकोपयोगी वस्तूंमध्येही काळ्या पैशाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत असते. त्याशिवाय शेअर बाजारात नोंदणीकृत नसलेल्या कंपन्यांच्या परिवर्तनीय कर्जरोख्यांच्या (Convertible Debentures) माध्यमातून काळ्या पैशांचे पांढऱ्या पैशांत रूपांतर करण्याचे प्रयत्न केले जात जे आता सरकारच्या लक्षात आले आहेत. (उदाहरणार्थ, सहारा इंडिया कंपनीच्या उपकंपनीने केलेले असे उद्योग सेबीने पकडले आहेत.) अशा शंभरहून अधिक कंपन्यांवर आता सरकारची कडक नजर आहे. या कंपन्यांनी हजारो कोटी रुपयांचा काळा पैसा अधिकृत अर्थव्यवस्थेत आणला आहे. कंपन्यांकडून शेअर बाजारातील नोंदणीकृत शेअर्सच्या माध्यमातूनही काळ्या पैशांचे पांढऱ्या पैशांत रूपांतर केले जाते. निवडणुकांच्या काळात काळ्या पैशांचे व्यवहार सर्वात अधिक होत असतात. पैशांतून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा असे चक्र सुरूच असते. सरकारी आणि निमसरकारी कार्यालयातील होणारे भ्रष्ट व्यवहार, सरकारी योजनांमध्ये मंत्र्यांकडून केला जाणारा भ्रष्टाचार, सार्वजनिक कामांमध्ये ठेवली जाणारी दलाली, उद्योगपती-व्यावसायिकांकडून होणारी करचुकवेगिरी, अपेक्षित परवाने आणि मंजुरी प्राप्त करण्यासाठी राजकारण्यांना आर्थिक मलिदा देऊन उद्योगसमूहाची केली जाणारी भरभराट इत्यादी अनेक प्रकारांत काळा पैसाच करता असतो. प्रत्यक्षात नसलेले कृषी उत्पन्न दर्शवून करमुक्त उत्पन्न कमावणारे बरेच राजकारणी 'गरीब' शेतकरी बनून स्वत:च्या काळ्या धनांत भरच टाकत आहेत



याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना आधीचे सरकार आणू

शकलेले नव्हते आणि विद्यमान सरकारला परदेशातील काळा पैसा कोणाचा आणि कोणत्या देशात आहे हे माहीत असूनही आधीच्या सरकारने केलेल्या आंतरराष्ट्रीय वाणिज्य आणि व्यापारी करारांतील तरतुदींमुळे आणता आलेला नाही.

२००७ मध्ये भारताचा समावेश ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी क्लबमध्ये झाला. आज जगभरात मंदीचे वातावरण असूनसुद्धा २०१३ मध्ये भारत दोन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेला देश ठरला. भारताचा २००३ ते २००७ या अवधीत सकल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) दर ९ टक्के होता. पण २०१३-२०१४ मध्ये हाच दर ५ टक्के इतका खाली आला होता. त्यात डॉलरच्या तुलनेत रुपयाने आजवरचा नीचांक स्थापून भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रश्न उभे केले होते. पण दुर्दैवाने मागील दोन वर्षांत कोणतेही ठोस उपाय न योजल्यामुळे आणि धोरणे अमलात न आणल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था पंगू ठरली होती.

बचतीचा दर, गुंतवणुकीचे वाढते प्रमाण आणि महागाईचे नियमन यामुळे भारत आर्थिक महासत्ता बनू शकते असा विश्वास आर्थिक क्षेत्रात व्यक्त होत होता आणि अजूनही तशी आशा वाटत आहे. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे २०२० सालात भारतीयांचे सरासरी वय २९ वर्षे असणार आहे. सध्या ८० कोटी असलेली श्रमिकांची संख्या २०२६ मध्ये ९५ कोटींवर पोचलेली असणार आहे. चीन व अमेरिकेतील लोकसंख्येचे सरासरी वय ३७ वर्षे, युरोपीय देशांचे सरासरी वय ४५ वर्षे तर जपानचे सरासरी वय पन्नाशी जवळ पोहोचणार आहे. त्यामुळे भारत उत्पादन क्षमतेच्या आणि उत्पन्न मिळवण्याच्या सर्वोच्च पातळीवर असणार आहे. इतर प्रगत देशांच्या तुलनेत अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाची तरतूद करण्याची क्षमता भारतात जास्त असणार आहे. भारत आर्थिक महासत्ता होऊ शकतो हे जीम ओ नील या अर्थतज्ज्ञाने बारा-तेरा वर्षांपूर्वी केलेले भाकीत आता कितपत खरे करता येईल याचा सर्व धुरिणांनी खरे तर विचार केला पाहिजे. कोणताही देश आर्थिक महासत्ता बनू पाहतो त्यावेळी त्या देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न आणि अर्थव्यवस्था वाढणारी हवी असते. जेणेकरून जागतिक अर्थव्यवस्थेला ह्या देशावर अवलंबून राहावे लागण्याशिवाय पर्याय नसेल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच भांडवली गुंतवणुकीसाठी या देशाचे दार उघडे हवे.

आज अर्थव्यवस्थेतील वाढ आणि मनुष्यविकास यामध्ये मोठा फरक पडत चालला आहे. इतर आशियाई देशांच्या तुलनेत १९९१-९२ पासून भारतीय अर्थव्यवस्थेत चांगली वाढ झाली असली तरी समाजात उत्पन्नामुळे विषमता वाढली आहे. एकीकडे श्रीमंत राज्यांचे उत्पन्न गरीब राज्यांच्या उत्पन्नापेक्षा चार-पाच पटींनी वाढत आहे. तर दुसरीकडे गरीब राज्यांत अन्न, शिक्षण आणि आरोग्य या तीन महत्त्वपूर्ण गरजाही भागवल्या जाऊ शकत नाहीत. नेमकी हीच विषमता आज देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मुळावर आली आहे. त्यात आजवर झालेले आर्थिक-राजकीय घोटाळे, विधिनिषेधशून्य राजकीय निर्णय, होणारी चलनवाढ, पर्यायाने वाढणारे व्याजाचे दर, अनावश्यक जातीपातीचे-धर्माचे राजकारण आणि त्यातून घेतले जाणारे लोकानुनयी धोरणात्मक(?) निर्णय या सर्व घटकांमुळे भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा १९९१ पूर्व सदृश आर्थिक आणीबाणीत सापडलेली होती. अजून एक घटक घातक ठरला होता, तो म्हणजे अनेक पक्षांची कडबोळी बनून झालेली सत्ताधारी सरकारे. केवळ स्वार्थी हेतूंनी सरकारमध्ये सामील होऊन देशहिताचा किंवा लोकहिताचा विचार न करता फक्त स्वत:चा आर्थिक लाभ कसा उठवायचा याकडेच लक्ष देणारे सत्ताधारी तसेच अन्य पक्षीय राजकारणी आर्थिकसुधारणा कार्यक्रमांना विरोध करत आले होते. याची परिणती अर्थव्यवस्थेच्या दरात चार टक्क्यांहून खाली घसरण होण्यात झाली होती! जुलै २०१४ मध्ये खरे तर भारत एका मोठ्या आर्थिक संकटाच्या कड्यावर उभा होता असे म्हटले तर गैर ठरणार नाही. देशाचे माजी पंतप्रधान अर्थतज्ज्ञ असूनही दुर्दैवाने आपली अर्थव्यवस्था अशी डळमळीत झाली, याला निसर्ग किंवा अन्य कोणतीही बाह्य शक्ती जबाबदार नसून केवळ तत्कालीन सरकारला आलेला धोरणलकवा कारणीभूत होता.

भारताची साठ टक्के लोकसंख्या आजही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. या क्षेत्राकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून न पाहिल्याने या क्षेत्राची उत्पादनक्षमता कमी कमी होत चालली आहे. रस्ते, वीज, पाटबंधारे योजना आणि जलसिंचन या पायाभूत सुविधांची कमतरता या क्षेत्राला मारक ठरत आहे. त्यात या सर्व पायाभूत सुविधांची तरतूद करण्यात होणारे भ्रष्टाचार, जमीनींचे होणारे तुकडे, आणि गुंतवणुकीचा अभाव यामुळे कृषीक्षेत्राची गळचेपी झाली आहे. मागणी आणि पुरवठा यात वाढत जाणाऱ्या फरकामुळे अन्नधान्य महाग होत चालले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची केली जाणारी नासाडी, हवामानात सातत्याने होणारे बदल, पाणीटंचाई, उर्जेच्या वापराची अकार्यक्षमता इत्यादी घटकांमुळे कृषिउत्पादकतेवर विपरीत परिणाम झाला आहे.

मागील वर्षी डॉलरच्या तुलनेत घसरलेल्या रुपयाला सावरण्यासाठी खरे तर रिझर्व्ह बँक, अर्थ मंत्रालय आणि अन्य वित्तीय नियामक संस्थांनी एकत्रित येऊन पावले उचलणे आवश्यक होते. सुवर्ण निर्यातीवर कठोरपणे बंदी घालून चालू खात्यातील तुटीवर नियंत्रण आणणे गरजेचे होते. पण तसे प्रयत्न करण्याऐवजी रिझर्व्ह बँक गव्हर्नरांशी मतभेद करण्यात धन्यता मानली गेली. आर्थिक सुधारणांची थांबलेली गाडी सुरू करण्यासाठी तत्परतेने प्रयत्न करताना तत्कालीन काँग्रेस सत्ताधारी दिसत नव्हते की विरोधी पक्षही त्याबद्दल आग्रही दिसत नव्हते. संसदीय प्रणालीशिवाय या सुधारणा अमलात आणणे अशक्य असल्याने, गांभीर्याने या आर्थिक अरिष्टाचा विचार होणे किती गरजेचे होते ते लक्षात येऊनसुद्धा, केवळ आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये लाभ मिळवण्यासाठी, राजकीय हितसंबंध जपण्यासाठी देशहिताचा बळी जात होता, असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. ज्यावेळी स्टँडर्ड अँड

पूअर, मूडीज यांसारख्या जागतिक रेटिंग कंपन्यांनी भारताची पतमानांकन श्रेणी घसरण्याची शक्यता वर्तवली होती तेव्हा विदेशी गुंतवणूकदार संस्थांना भारत सोडून जाऊ नका किंवा भारतातच गुंतवणूक करा आम्ही हमी देतो असे सांगू शकणाऱ्या माजी पंतप्रधानांव्यतिरिक्त एका तरी राजकारण्याची पत शिल्लक राहिली होती का? भारतीय जनतेमुळे एकीकडे आर्थिक महासत्तेचा मार्ग मोकळा होत असताना अपरिपक्व आणि भ्रष्ट राजकारण्यांमुळे जगात भारताची पत घसरत होती. रुपया घसरण्यापेक्षा होणारी ही घसरण देशाला रसातळाला नेऊ पाहत होती.

परंतु गेल्या सोळा-सतरा महिन्यांत असे काही चित्र पालटेल असे कोणी भाकीत केले असते तर त्याला नक्कीच वेड्यात काढले गेले असते. आंतरराष्ट्रीय स्तरावर पन्नास डॉलर प्रती बॅरल घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किमतीने भारताला मोठा हात दिला आहे. भारताला लागणाऱ्या एकूण तेलाच्या सुमारे ८० टक्के तेल आपण आयात करतो. या तेलाच्या किमतीत साठ टक्क्यांहून अधिक घसरण झाल्याने आपल्या अर्थव्यवस्थेवरील चालू खात्यातील तुटीमुळे Current Account Deficit येणारा मोठा भार कमी झाला आहे. २०१५च्या जानेवारी महिन्यात जागतिक बँक आणि संयुक्त राष्ट्रे यांची सर्वेक्षणे जाहीर झाली. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचा हवाला देत २०१६-२०१७ या वर्षात भारत चीनच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकू शकेल अशी शक्यता जागतिक बँकेच्या अहवालात व्यक्त केली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर येत्या दोन आर्थिक वर्षांत सात टक्क्यांच्या जवळ जाऊन चीनच्या दराला मागे टाकू शकेल असा विश्वास जागतिक बँकेला वाटू लागला आहे. आज जरी चीनच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर आघाडीवर असला तरी २०१७ मध्ये त्यात घसरण होण्याची शक्यता या अहवालात व्यक्त केली आहे. जागतिक बँकेच्या मते, जर भारतात आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी शिस्तबद्ध पद्धतीने केली आणि त्यात सातत्य राखतानाच जाचक नियंत्रणे हटवली गेली तर परदेशी गुंतवणुकीचा मोठा ओघ भारतात अपेक्षिता येईल.

संयुक्त राष्ट्रांच्या एस्कप ESCAP या आर्थिक आणि सामाजिक आयोगाने 'आशिया-पॅसिफिक २०१४' च्या सांगता सर्व्हेक्षणात दक्षिण आशियाई आणि पश्चिमी आशियाई देशांत अर्थव्यवस्थेचा सरासरी वृद्धी दर ५.३ टक्के असण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. हा वृद्धीदर मागील चार वर्षांतील उच्चांक ठरणार आहे. या देशांमध्ये वाढणारी ही सकारात्मकता मुख्यत: भारतातील आर्थिक प्रगतीबद्दल वाढलेल्या अपेक्षांमुळेच असल्याचे या अहवालात नमूद केले आहे. विद्यमान २०१५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था गतवर्षीच्या ५.५ टक्क्यांच्या तुलनेत ६.४ टक्के दराने प्रगती करत असल्याचे लवकरच कळेल असा अंदाज या सर्व्हेक्षणात व्यक्त केला आहे. केंद्रातील नवीन सरकारच्या उद्योगलक्ष्यी धोरणांमुळे उद्योगक्षेत्रातील मरगळ दूर होत असल्याचे आणि परदेशी गुंतवणूकदारांना विश्वास देणारी भावना वाढीस लागत असल्याचे मत या अहवालात मांडले आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने International Monitory Fund सुद्धा जानेवारीच्या अखेरीस जाहीर केलेल्या अहवालामुळे तर शेअरबाजारात चैतन्य येऊन मुंबई शेअर बाजार निर्देशांक आणि निफ्टी सर्वोच्च पातळीवर पोचला. याचे कारण त्या अहवालात २०१६ मध्येच भारतीय अर्थव्यवस्थेचा दर साडेसहा टक्क्यांहून अधिक असेल, तर त्याचवेळी चीनची अर्थव्यवस्था ६.३ टक्क्यांवर खाली उतरेल असा अंदाज व्यक्त केला आहे. मागील वर्षापासून चीनच्या अर्थव्यवस्थेचा दर खाली घसरत चालला असून गतवर्षी ७.४ टक्के असलेला दर येत्या दोन वर्षांत ६.३ टक्केइतका अपेक्षिला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवरील आयातखर्चाचा भार हलका होत असल्याने आणि महत्त्वाच्या रचनात्मक सुधारणांबद्दल ठरवण्यात येत असलेली धोरणे अर्थव्यवस्थेला गती प्राप्त करून देण्यास सकारात्मक असल्याचा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला आहे.

एकीकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा सर्व्हेक्षण अहवालातून भारताबद्दलची सकारात्मक भावना परदेशी गुंतवणूकदारांमध्ये वाढीस लागत असल्याचे प्रतिबिंबित झाल्याचे शेअर बाजारात अनुभवास येत आहे. सलग पाच महिने घसरणारा घाऊक किंमत निर्देशांक तर नोव्हेंबर २०१४ मध्ये शून्याजवळ राहिल्याने किरकोळ किंमत निर्देशांकातही घट झाली. परंतु डिसेंबरमध्ये अन्नधान्याचा महागाईदर ५.२ टक्क्यांवर पोचल्यामुळे डाळी, भाज्या, फळे इत्यादीत दरवाढ झाल्याचे दिसत आहे. गहू-दूध यांच्या एकीकडे किंमती वाढत असताना अंडी, मासे, मटण यांचे दर घसरले आहेत. डिसेंबरमध्ये पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ केली गेली होती. इंधन आणि ऊर्जा क्षेत्रात साधारणपणे दुपटीने किंमतवाढ झाली होती. या इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील महागाईचा दर ४.९१ टक्क्यांवरून ७.८२ टक्क्यांर पोचला होता. या सर्व पार्श्वभूमीवर घाऊक किंमत निर्देशांक नियंत्रणाखाली आल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन यांनी संक्रांतीच्या मुहूर्तावर व्याजदर कपातीचा निर्णय घेतला. आंतरबँक व्याजदरात पाव टक्क्यांची कपात करून आश्चर्याचा धक्का दिला. गेली दोन वर्षे जुन्या आणि नव्या सरकारच्या कोणत्याही दडपणाखाली न येता किंवा उद्योगपतींच्या विनंत्या-अर्जांना न जुमानता महागाईनियंत्रणाचा स्पष्ट मुद्दा रेटून धरत रघुराम राजन यांनी नेटाने किल्ला लढवला. त्यात ते यशस्वी झाले यात शंकाच नाही. एकीकडे चालू खात्यातील तूट नियंत्रणात आली असतानाच दुसरीकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य वाढीस लागत होते. शेअर बाजाराबरोबरच रोखेबाजारातही गुंतवणूकदार तेजी अनुभवत आहेत.

केवळ पाव टक्क्यांच्या कपातीने केवढा फरक पडणार, असा सामान्य लोकांना प्रश्न निश्चित पडणारा आहे. गृहकर्जे आणि वाहनकर्जे घेणाऱ्या ग्राहकांना कमी झालेला कर्जाचा समान मासिक हप्ता नेहमीच मोठा दिलासा देत असतो. जेवढे कर्ज मोठे तेवढी हप्त्यातील झालेली मोठी कपात त्या कर्जदारांच्या गुंतवणुकीत किंवा क्रयशक्तीत भर घालते. पर्यायाने अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास

मदत होते. रघुराम राजन यांची ही व्याजदर कपातीची कृती, आगामी पतधोरणात आणि गरज भासल्यास पतधोरणाची वाट न बघता, अर्थव्यवस्थेला गती देईल असा विश्वास सामान्य ग्राहकांपासून बँका-उद्योगविश्वाला वाटू लागला आहे.

भारताच्या कमावत्या लोकसंख्येच्या अवघे ३-४ टक्के लोक शेअर बाजारात गुंतवणूक करतात. याचा अर्थ उर्वरित ९६-९७ टक्के लोकांकडे गुंतवणुकीसाठी पैसे नाहीत असा होत नाही तर त्यांच्याकडे या साधनाचे ज्ञान नाही म्हणून ते या वाटेकडे फिरकत नाहीत. आजवर मल्टिलेव्हल मार्केटिंग कंपन्या, जमिनीच्या प्लॉटर कंपन्या, इमू-शेळ्या-बकऱ्यापालन कंपन्या, साग लागवड कंपन्या तसेच शेरेगर, केबीसी, कल्पवृक्ष अशा खंडिभर कंपन्यांनी किमान बावीस हजार कोटी रुपयांना, सामान्य जनतेच्या आर्थिक निरक्षरतेचा लाभ उठवत, हातोहात फसवले आहे. बहुसंख्य बँकांमधून आणि एजंटांनी युलिप पॉलिसीच्या माध्यमातून २००४-०५ ते २००११-१२ या सात आर्थिक वर्षांत एकूण १.५ ट्रिलियन (एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शून्ये) रुपयांमध्ये गंडा घातला आहे. या रकमेपैकी ७१ टक्के रक्कम म्हणजे १.१३ ट्रिलियन रुपयांचे कमिशन बँकांना व एजंटांना देण्यात आले आहे. शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड्स या दोन माध्यमांबद्दल लोकशिक्षण देणे जितके आवश्यक आहे, तितकेच समाजातील एकूणच आर्थिक निरक्षरतेच्या प्रश्नात सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था आणि सरकार यांनी अधिक लक्ष घालणे आवश्यक आहे. तरच सामान्यजनाला लाभ आणि लोभ यांतील मात्रेचा नेमका फरक लक्षात येईल.

देशाची अर्थव्यवस्था आणि अर्थकारण चर्चिले जात असताना महाराष्ट्रासारख्या महत्त्वपूर्ण राज्याबद्दल उल्लेख करावाच लागतो. सर्वाधिक करमहसूल केंद्राला जमा करून देणारे हे राज्य खरेच आर्थिकदृष्ट्या प्रगत आणि पुढारलेले आहे का? या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने नाही येते. गुजरातपेक्षा कांकणभर अधिकच साधन-संपत्ती असणाऱ्या महाराष्ट्राला इतक्या वर्षांत कोणी नागवले आणि कोणी महाराष्ट्राच्या विकासात अडसर उभे केले हे सांगण्यासाठी आजवर ना विरोधी पक्षांची गरज होती, ना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणांची. राज्यातील गेल्या पंधरा वर्षांतील माजी सत्ताधाऱ्यांनी नुसता आरसा जरी समोर धरला तर सत्य पुढ्यात येईल. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौरस किलोमीटर असून, पस्तीस जिल्ह्यातील ३७८ शहरे आणि ४३,७११ गावांत मिळून एकूण लोकसंख्या ११,२३,७२,९७२ आहे. शहरी लोकसंख्येचे प्रमाण ४५ टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण ८२.९१ टक्के आहे. देशाच्या लोकसंख्येच्या ९.३ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र राज्याचे सकल उत्पन्न ११,४१,८६,००० कोटी रुपये आहे. महाराष्ट्राच्या डोक्यावर ३१ मार्च २०१४ रोजी सुमारे २ लाख ८२ हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. या कर्जावरील व्याजासाठी मागील आर्थिक वर्षात २०१३-१४ सुमारे तेवीस हजार कोटी रुपये द्यावे लागले आहेत. गेल्या सहा आर्थिक वर्षांत महाराष्ट्र राज्याचे करमहसुली उत्पन्न दुपटीहून अधिक वाढले आहे. परंतु हे करमहसुली उत्पन्न वसूल करण्यासाठी खर्च तिप्पट झाला आहे! राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दिलेल्या सहाव्या वेतन आयोगामुळे प्रशासनावरच्या आणि निवृत्तीवेतनावरच्या खर्चात तर तिपटीहून अधिक वाढ झाली आहे. शिक्षण, क्रीडा आणि कला संस्कृतीवरील खर्च चाळीस हजार कोटींच्या घरात जाऊनसुद्धा या क्षेत्रांत सुमार कामगिरी दिसते आहे. शिक्षणक्षेत्र तरी राजकारणमुक्त असायला हवे होते. पण तत्कालीन स्वार्थी सत्ताधारी राजकारण्यांनी याच क्षेत्राचा मागील दहा वर्षांत केलेला खेळखंडोबा कित्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाट लावणारा ठरला. भ्रष्ट राजकारण्यांची शिक्षणक्षेत्रातील दुकाने चालण्यासाठी केलेली सरकारी धोरणे आज द्विपदवीधारकाला सफाई कामगार म्हणून किंवा पोलिस शिपायाच्या भरतीत ऊर फुटेस्तो धावायला लावत आहेत. दर्जाहीन शिक्षणाच्या वरिष्ठ पात्रतेची कागदी भेंडोळी हातात पैसे घेऊन कोंबणारा तथाकथित शिक्षणमहर्षी राजकारणी त्याला ना रोजगार देऊ शकत की ना उद्योग-व्यवसायासाठी भांडवल! मग अशावेळी कोणत्या ना कोणत्या पक्षाचा नेता येतो आणि हातात झेंडा देतो आणि सांगतो... माझ्यासाठी लढ! त्याबदल्यात शुद्ध हरपेल एवढी दारू आणि कोंबडीची प्लेट देऊन त्याचा 'कार्यकर्ता' बनवला जातो.

आर्थिक आणि सामाजिक परिमाणे लक्षात घेऊन महाराष्ट्राचा विचार केल्यास, महाराष्ट्राच्या आजवरच्या राज्यकर्त्यांकडे दूरदृष्टी जाऊ दे, पण सामान्य दृष्टीचाही अभाव दिसून आला आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत लहान असलेल्या गोवा, गुजरात, तसेच मध्यप्रदेशशी स्पर्धाच महाराष्ट्राच्या नव्याने आलेल्या सत्ताधीश राजकारण्यांनी करायची तर त्या त्या राज्यांच्या उद्यमशीलतेशी आणि आर्थिक-सामाजिक त्वरित निर्णयक्षमतेशी करावी. भ्रष्टाचारमुक्त निबंधकाच्या नोंदणी प्रक्रियेशी करावी. पेवर ब्लॉक मुक्त गुळगुळीत रस्ते निर्मितीशी करावी... जनतेच्या बांधिलकीशी स्पर्धा तर जरूर केलीच पाहिजे. तरच महाराष्ट्र खऱ्या अर्थाने मोठा ठरेल. आजवर आर्थिकदृष्ट्या अत्यवस्थ झालेला महाराष्ट्र संपन्न बनण्यासाठी सरकार आणि जनतेने नेमके अर्थकारण समजून घेऊन समाजकारणातून प्रगल्भ राजकारण केले पाहिजे. हे अर्थकारण समजून येण्यासाठीच व्यावहारिक अर्थसाक्षरतेचे धडे केवळ शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात क्रमिक पुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष व्यवहारात कसे आणता येतील यासाठी सरकार, अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, विद्यार्थी आणि सामान्य जनतेच्या प्रतिनिधींनी (नगरसेवक-आमदार-खासदार नव्हे) एकत्रित येऊन दीर्घकालीन कृती योजना आणणे गरजेचे आहे. आर्थिक साक्षरतेची चळवळ जेवढी घराघरात पोचेल तेवढी जनता अर्थप्रगल्भ होऊन स्वच्छ राजकारणाची चांगली फळे जनतेला, राज्याला, आणि पर्यायाने देशाला अनुभवता येऊन समृद्ध भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल.

**- विनायक कुळकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८९२१५२९२८
vvskul@yahoo.com

# अनुक्रम




स्वतंत्र भारतातील अर्थधोरणातील बदल / १०
**अरुण केळकर**
विकासलक्ष्यी आर्थिक शिस्तीचा संकल्प / १४
**विनायक कुळकर्णी**
देशाच्या अर्थकारणाची दिशा / १६
**डॉ. अभिजीत फडणीस**





भारतीय बँकिंग – प्रगतीचे स्टेंटमेंट! / २०
**राजीव जोशी**
नागरी सहकारी बँकांचे आधुनिकीकरण की खाजगीकरण? / २२
**उर्वशी धराधर**





सहकारी पतसंस्था आणि ग्रामीण अर्थकारण / २४
**माधव प्रभुणे**
महिला शक्ती / २८
**शामानंद सुखी**





बँक विलिनीकरण नवीन आव्हाने पेलताना / ३२
**स्मिता जोगळेकर**
विमाउद्योगातून रोजगारनिर्मिती किती आणि कशी?/ ३६
**नीलेश साठे**





शेअर बाजारातील गुंतवणुकीत ग्रामीण क्षेत्राचा सहभाग / ३८
**अजय वाळिंबे**
फसव्या गुंतवणूकयोजना व त्यामागील गुपित / ४२
**उदय तारदाळकर**





गृहकर्जक्षेत्राचा अखंड विस्तार / ४६
**महेश सरलष्कर**
गुंतवणूकदारांची मानसिकता : शहरी आणि ग्रामीण / ५०
**सुप्रिया देवस्थळी**





जमीन अधिग्रहण आणि लोकसंख्या / ५४
**धनंजय गांगल**
सोन्या-चांदीचे भाव कुठपर्यंत? / ५७
**आशीष ठाकूर**





अपारंपरिक गुंतवणूकसाधने / ६०
**विवेक बकोरे**
सिनेमाचे अर्थकारण / ६२
**दिलीप ठाकूर**





‘मेक इन इंडिया’त कुठे आहे महाराष्ट्र? / ६५
**नितीन पोतदार**
पैशाचे भान / ६८
**प्रवीण शिंदे**

# स्वतंत्र भारतातील अर्थधोरणातील बदल

अरुण केळकर



१९४७ साली स्वतंत्र झालेल्या भारताच्या आर्थिक धोरणाची चौकट तयार होण्यासाठी १९५१ साल उजाडावे लागले; जेव्हा पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. सोव्हिएट रशियाच्या केंद्रीभूत आर्थिक नियोजनाच्या प्रारूपाने प्रभावित झालेल्या नेहरूंचा त्यावर ठसा दिसला. संमिश्र अर्थव्यवस्था हे ह्या धोरणाचे वैशिष्ट्य होते. शासनाचे हे कर्तव्य मानले गेले की तुटपुंज्या संसाधनांचा योग्य वापर व्हावा. ह्या योजनेची प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि स्वावलंबन. ह्या धोरणांतर्गत सरकारी उद्योग मोठ्या प्रमाणावर स्थापन केले गेले आणि तुटपुंज्या संसाधनांचा योग्य वापर व्हावा यासाठी उद्योग सुरू करण्यासाठी आणि अस्तित्वात असलेल्या उद्योगांच्या क्षमतावाढीसाठी सरकारची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक केले गेले. ज्यामुळे परमिट राज प्रस्थापित झाले आणि मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराला वाव मिळाला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीला प्राधान्य दिले गेले तर दुसऱ्या योजनेत उद्योगवाढीला. पहिल्या योजनेत आयातीवर कठोर निर्बंध घातले होते तर दुसरीत परराष्ट्रांकडून आणि जागतिक संस्थांकडून कर्जे घेऊन आयात करण्यावर जोर दिला गेला, ज्यामुळे स्थानिक उद्योगांना आवश्यक तो कच्चा माल आणि यंत्रसामग्री मिळेल अशी अपेक्षा होती. दुसऱ्या योजनेला, ज्याला नेहरू-महालनोबीस योजना, असे नाव दिले गेले, त्यात औद्योगिकीकरणावर भर दिला गेला. यात जड उद्योग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगविकासावर भर होता.

ह्यामुळे अर्थव्यवस्थेत शेतीपेक्षा तुलनेने उद्योगात गुंतवणूक वाढली. शेतीक्षेत्राचे महत्त्व कमी होऊ लागले. तरीसुद्धा हे क्षेत्र सगळ्यात जास्त रोजगार निर्माण करणारेच राहिले.

तिसऱ्या योजनेत पुन्हा शेती क्षेत्रावर भर दिला गेला, कारण त्यामुळे उद्योग आणि निर्यात वाढण्यास मदत होईल असे मानले गेले. पण ह्याच योजनेच्या काळात चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) अशी दोन युद्धे झाली. आर्थिक विकासाचा दर अपेक्षेपेक्षा निम्मा म्हणजे २.८५ टक्के एवढाच झाला. भाववाढीवर, परमिट राजमधील भ्रष्टाचारावर सरकार नियंत्रण ठेवू शकले नाही.

ह्यानंतर तीन वार्षिक योजना आखल्या गेल्या, ज्यात शेती उत्पादनात वाढ होण्यावर जोर दिला गेला, जेणेकरून परदेशावर अन्नधान्यासाठी अवलंबून राहावे लागणर नाही. पहिल्या तीन योजनांमागचा विचार असा होता की एकदा उद्योगांचा विकास झाला की संस्थात्मक बदल आपोआप होतील. असे म्हणता येणार नाही की ह्या योजना असफल ठरल्य,पण अमर्याद लोकसंख्यावाढीने हा विकास अपुरा ठरवला.

चौथ्या पंचवार्षिक योजनेचा काळ १९६९ ते १९७४ हा होता. ह्यात पुन्हा शेतीवर भर दिला गेला, पण बांगलादेशातील शरणार्थींमुळे सगळी अनुमाने चुकली.

पाचव्या योजनेत स्वावलंबन आणि गरिबीचे निर्मूलन ही उद्दिष्टे ठेवली गेली. पण जनता सरकार स्थापन झाल्यावर १९७८ मध्ये ही योजना स्थगित करण्यात आली. मात्र दोन वर्षांत ते सरकार कोसळले आणि नव्याने निवडून आलेल्या काँग्रेस सरकारने ही योजना गूंडाळून ठेवली.

चौथ्या आणि पाचव्या योजनांमध्ये विकासाबरोबर न्याय्य वाटपावर भर दिला गेला होता, पण पुन्हा वाढती लोकसंख्या हा मोठा अडसर निर्माण झाला.

सहाव्या आणि सातव्या योजनांत राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, तंत्रविज्ञानात प्रगती, रोजगारात वाढ ही उद्दिष्टे होती आणि ह्यासाठी थोड्या प्रमाणात उद्योगांना मुक्तता देण्यात आली. जवळपास तीस उद्योगांवरील गुंतवणुकीबाबतचे निर्बंध काढून टाकले. तेवढेच अन्य उद्योग विनापरवाना सुरू करण्याची मुभा उपलब्ध करून देण्यात आली.

राजकीय अस्थिरतेमुळे पुढील दोन वर्षे विनायोजना गेली. १९९१ मध्ये वित्तमंत्री मनमोहन सिंह ह्यांनी मुक्त आर्थिक धोरण मांडणारी योजना सादर केली आणि भारतीय अर्थविश्वात एक नवे पर्व सुरू झाले.

जर असे म्हणता येऊ शकते की सोव्हिएत केंद्रीभूत प्रारूपाने प्रभावित होऊन भारतात केंद्रीय नियोजन अमलात आणले गेले तर असेही म्हणता येईल की सोव्हिएत रशियाचे विघटन आणि जर्मनीसह पूर्व युरोपमधील साम्यवादी सरकारे सत्ताभ्रष्ट होणे ह्या पार्श्वभूमीवर भारतात मुक्त आर्थिक धोरण अमलात आणले गेले.

व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने देशावर

राज्य केले. ह्यामुळे मुक्त बाजार हे वसाहतवादाचे हत्यार आहे असे मानण्यात येत गेले आणि त्याविरुद्ध जनमत बनत गेले. स्वातंत्र्यपूर्व काळातील परकीय वस्तूंवर बहिष्कार म्हणजे परकीय वस्तूंचा उपभोग हा देशद्रोह करण्यासारखे मानले जाऊ लागले. भारतीय अर्थव्यवस्था बंदिस्त होत गेली. तंत्रविज्ञानातील प्रगती खुंटली. आर्थिक विकासातील निर्यातीचे महत्त्व लक्षात न घेतल्यामुळे विकासावर मर्यादा पडल्या.

मुक्त बाजारावर अविश्वास, निर्यातीविषयी अनास्था ह्यातून आर्थिक संकट निर्माण झाले होते. उद्योगांची वाढ खुंटली होती. मागासलेल्या प्रदेशात उद्योग निर्माण व्हावे, म्हणजे उद्योगांचे विकेंद्रीकरण व्हावे, सामाजिक दृष्ट्या ज्या घटकांना प्राधान्य मिळायला हवे ते देता यावे ह्यासाठी ही परवाने व्यवस्था स्थापन केली गेली, पण प्रत्यक्षात ती वापरली गेली मंत्री, लोकप्रतिनिधी आणि नोकरशहांनी पैसे खाण्यासाठी आणि आपल्या पसंतीच्या उद्योगसमूहांना परवाने देण्यासाठी. म्हणजे परमिट राजचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य झाले नाही.

आयातीवर निर्बंध आणि अवाजवी आयात कर ह्यांच्या संरक्षणाखाली भारतातील उद्योग मक्तेदार (मोनोपॉलिस्टीक) असल्यासारखे वागू लागले होते, तयार मालाचा पुरवठा रोखून ठेवून कृत्रिम भाववाढ करत होते, आणि आपला माल काळ्या बाजारात विकत होते. काळ्या पैशांची समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली होती. स्वावलंबन आणि परकीय गुंतवणुकीवर निर्बंध ह्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत नव्हता. देशांतर्गत स्पर्धा नसल्यामुळे आणि ती निर्माण होण्याची शक्यता नसल्यामुळे उद्योजकांत शिथिलता आली होती.



नियोजनाच्या काळात आपल्या देशाचा आर्थिक विकासाचा सरासरी वार्षिक दर चार टक्के एवढा होता, जो अन्य विकसनशील देशांपेक्षा कमी होता. ज्या सार्वजनिक उद्योगांकडून विकासाला चालना मिळावी, बचतीला हातभार लागावा अशी अपेक्षा होती तेच मुळात तोट्यात जाऊ लागले. आणि हे तोट्यातील सार्वजनिक उद्योग चालू ठेवण्यासाठी जनतेचा पैसा वापरावा लागला.

आर्थिक सुधारणांची गती सततच स्थिर राहिली नाही ह्याची कारणे शोधणे कठीण नाही. व्होट बँकचे राजकारण हा एक महत्त्वाचा घटक ह्यात होता. संसदेत बहुमत नसणे हाही घटक होताच, ज्यामुळे जे करणे आवश्यक होते त्याऐवजी लोकप्रियता, मिळवून देणारे निर्णय घेतले गेले.

कर्ज घेण्यास सरकारवर कसलेही बंधन नसल्यामुळे वित्तीय तूट वाढत होती, चलनाचे मूल्य कमी होत होते आणि सरकारला चलनाचे अवमूल्यन करावे लागले होते. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी व्हीडीएससारख्या आयकरातून सुटीच्या सवलती द्याव्या लागल्या होत्या.

स्वतंत्र भारतात जन्माला आलेली पिढी तयार झाली होती. शाळा-कॉलेजांतील पुस्तकांमधून जे त्यांना वाचायला मिळाले त्यामुळे त्यांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. त्यांना अन्य देशांत काय होत आहे, तेथील परिस्थिती कशी आहे हे समजत होते आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तर काय होईल ह्याची कल्पना नक्षलवाद आणि डाव्या दहशतवादी चळवळी ह्यातून येत होती.

स्वतंत्र भारताने विकासाचा हा जो नमुना स्वीकारला होता तो अयशस्वी झाला का, तो तसा असण्यातच चूक होती का, हे वादाचे प्रश्न राहिले आहेत आणि ह्याविषयी भिन्न भिन्न मते व्यक्त होत आली आहेत आणि होत रहातील.

एका बाजूला असे म्हटले गेले आहे की जेवढ्या मोठ्या प्रमाणात गरिबी होती ती बघता केंद्रीय नियोजनाशिवाय अन्य काही पर्याय नव्हता. मालमत्तेचे पुनर्वाटप अन्य प्रकारे होऊच शकले नसते. म्हणून विकासाचा वाढता दर कसा प्रत्यक्षात येईल ह्या दृष्टीने नियोजन केले गेले. म्हणूनच शेती कायद्यात सुधारणा (कसेल त्याची जमीन), संपत्तीचे केंद्रीकरण होऊ नये म्हणून परवाना पद्धती आणि उत्पन्नातील असमानता कमी करण्यासाठी कराचे उच्च दर, हे पर्याय निवडले. तर दुसऱ्या बाजूला असे म्हटले जाते की जर नियोजनात बाजाराला, फक्त देशांतर्गत नाही तर आंतरराष्ट्रीयसुद्धा, महत्त्व दिले गेले असते तर विकास जलद गतीने झाला असता आणि संपत्तीचे केंद्रीकरण झाले नसते. निर्यात आर्थिक विकासाला साहाय्यभूत ठरते हे त्यावेळी लक्षात घेतले गेले नव्हते. चीनची अर्थव्यवस्था बघितल्यावर, जेथे बाजारावर अवलंबित अर्थव्यवस्था आपल्याआधी दहा वर्षे स्वीकारली गेली, हे लक्षात येते.

उत्पन्नातील असमानता हा निकष विकासानंतर विचारात घेतला जावा, की

धनसंपत्तीचे न्याय्य वाटप ह्याला प्राधान्य द्यावे हाच तो मतभेदाचा मुद्दा राहिला. स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी ह्याचसारखा हा मुद्दा आहे.

हे जरी काही असले तरी ह्या काळात शिक्षणावर, प्राथमिक आणि उच्च शिक्षण व्यवस्थेत जी गुंतवणूक केली गेली त्यामुळे जेव्हा मुक्तअर्थव्यवस्था स्वीकारली गेली तेव्हा तंत्रविज्ञानाची जी प्रगती झाली त्याचा लाभ देशाला झाला. अर्थात समाजाच्या कोणत्या घटकाला हा लाभ झाला हा प्रश्न राहतोच, पण एक निश्चित की सेवा देणाऱ्या उद्योगांची ज्या प्रचंड प्रमाणात वाढ झाली त्याला नियोजनातील शिक्षणावरील खर्च हा एक प्रभावी घटक होता.

त्यावेळची परिस्थिती अशी होती की इंधन तेलाच्या किमतीमुळे सर्वच विकसनशिल देशांवर आर्थिक संकट आले. वित्तीय तूट आणि कर्ज ह्यामुळे खिळखिळी झालेली अर्थव्यवस्था मोडकळीला आली. शासन अस्तित्वात राहील की अराजकता माजेल अशी अवस्था निर्माण झाली. दोन आठवडे पुरेल एवढेच परकीय चलन सरकारजवळ होते आणि अन्य देशांकडून आणि वित्त संस्थांकडून घेतलेली कर्जे तर सोडाच पण त्यावरील व्याजसुद्धा देता येणार नव्हते. यामुळे आयातीवर निर्बंध घालावे लागले त्याचा परिणाम औद्योगिक उत्पादनात घट झाली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जाची परतफेड आणि त्यावरील व्याज वेळेवर देता येईल ह्याची हमी म्हणून वीस टन सोने स्वीस बँकेकडे आणि सत्तेचाळीस टन तोळे बँक ऑफ इंग्लंडकडे गहाण ठेवावे लागले. त्यांनतर अर्थव्यवस्थेत केलेल्या सुधारणा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दबावामुळे कराव्या लागल्या.

नियोजनामागे गृहीत हे होते की त्यामुळे बचतीला चालना मिळेल, ज्याचा फायदा वेगाने औद्योगिकीकरणात होईल, जे प्रत्यक्षात अपेक्षेएवढे झाले नाही. ह्याला एक कारण असेही होते की खाजगी उद्योग सुरू करण्यासाठी जवळपास सत्तर परवानग्या घ्याव्या लागत, ज्यात दिरंगाई तर होत असेच, पण भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणावर होत असे. त्यामुळे सरकारला औद्योगिकीकरणासाठी सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागली. खाजगी बँकांचे राष्ट्रीय करणे हा त्याचाच एक भाग होता.

१९९० मध्ये सुरू झालेल्या सुधारणांचा संक्षेपाने आढावा घेऊन आपण आजच्या धोरणांकडे वळू. ह्याचा रोख प्रामुख्याने केंद्रीभूत नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेकडून मुक्त बाजारावर अवलंबून असणारी व्यवस्था आणणे हा होता. ह्यात नवे उद्योग सुरू करण्यासाठी तसेच उत्पादनात वाढ करण्याठी, कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठी लागणारी पूर्वपरवान्याची अट काढून टाकली. ज्याचा पहिला परिणाम हा झाला की बाजारात विक्रीसाठीच नव्हे तर माल खरेदीसाठी स्पर्धा सुरू झाली आणि जे उद्योग कार्यक्षम नव्हते ते बंद करावे लागले. आयात सहज शक्य झाली. परवाना पद्धत बंद झाली. परकीय गुंतवणूक वाढली त्याबरोबरच प्रगत तंत्रविज्ञान आले. अर्थव्यवस्थेचे स्थिर (स्टॅटिक) हे स्वरूप गेले आणि ती गतिमान झाली. पण हे अगदी प्राथमिक स्वरूपाचे होते. ह्यात टेलिकम्युनिकेशन आणि सॉफ्टवेर ह्यावर भार दिला गेला.

आर्थिक विकासात १९९० च्या दशकात ६.५ टक्क्यांनी वाढ झाली. १९९८ साली भारतावर बंधने (सँक्शन्स) घातली गेली तरी परकीय चलनसाठ्यात वाढ झाली. चालू खात्यातील (करंट अकाउंटमधील) तूट, जी अवाढव्य झाली होती, कमी झाली. घेतलेल्या व्याजावरील कर्जाचा बोजा कमी झाला. भाववाढीचा दर खालावला. पण ह्याच काळात शेतमालाच्या आणि औद्योगिक उत्पादनात वाढ झाली नाही. जी.डी.पी.मध्ये जी वाढ झाली ती बव्हंशी सेवाउद्योगातील वाढीमुळे होती, ज्यात माहिती–तंत्रविज्ञान (सॉफ्टवेर) आणि इलेक्ट्रॉनिक सेवा देणाऱ्या (बी.पी ओ.) क्षेत्राचा मोठा वाटा होता.

परकीय गुंतवणूक १९९२ च्या सुमारास १३० मिलियन डॉलर एवढी होती ती १९९६च्या सुमारास ५ हजार मिलियन डॉलर एवढी झाली. मुंबईव्यतिरिक्त चेन्नई, नॉयडा, हैदराबाद, बंगलोर यांसारखी शहरे उद्योगांची नवी केंद्रे बनली. एक नवा उद्योजकवर्ग तयार झाला.

आर्थिक सुधारणांची गती सततच स्थिर राहिली नाही ह्याची कारणे शोधणे कठीण नाही. व्होट बँकचे राजकारण हा एक महत्त्वाचा घटक ह्यात होता. संसदेत बहुमत नसणे हाही घटक होताच, ज्यामुळे जे करणे आवश्यक होते त्याऐवजी लोकप्रियता, कदाचित सवंग लोकप्रियता, मिळवून देणारे निर्णय घेतले गेले आणि हे फक्त आर्थिक क्षेत्रातच नाही तर शहाबानू खटल्यात उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राजीव गांधींनी कायदा बदलणे, बाबरी मशिदीचे दरवाजे पूजेसाठी उघडणे असे समाजाला भिडणारे पण एका विशिष्ट समाजाचे लांगुलचालन करणारे निर्णय घेतले गेले.

प्रश्न असा निर्माण होतो की नरसिंहराव ह्यांचे अल्पमतात असलेले सरकार जे करू शकले ते त्याआधीचे राजीव गांधी ह्यांचे दोनतृतीयांश बहुमत असणारे सरकार का करू शकले नाही वा राजीव गांधींनी ते करण्याचे धाडस का दाखवले नाही? हा प्रश्न केवळ ऐतिहासिक महत्त्वाचाच नाही तर तो सध्याच्या नरेंद्र मोदींच्या बाबतीतही लागू होतो.

कारण एकीकडे विकासाचा विचार मांडणारे मोदी वाढत्या धार्मिक असहिष्णुतेविषयी मौन बाळगतात. एवढेच नव्हे, तर स्वच्छतेच्या अभियानासाठी गांधींचे नाव घेणाऱ्या मोदींच्या पक्षाचे आणि त्याच्याशी जवळीक असणारे नथुराम गोडसे ह्यांचा उदोउदो करतात. यामुळे तरी परिस्थिती उत्साहजनक वाटत नाही.


**– अरुण केळकर**
सीए
भ्रमणध्वनी : ९८३३०५३००७
arunkelkar@rediffmail.com

# मैत्रेय प्रकाशनाची 'अर्थ'रत्ने!


## अर्थसंकल्पः अनेक अर्थ! - चन्द्रशेखर टिळक

अर्थसंकल्प देशाचा विकास घडवू शकतो तसाच तो रोखूही शकतो. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपावेतो भारतात मांडलेल्या अर्थसंकल्पांचे सखोल विश्लेषण करणारे हे पुस्तक महत्त्वाचे ठरते.

● पृष्ठे-२१६ ● मूल्य-२२५/-




## अर्थानुभव - चन्द्रशेखर टिळक




अर्थशास्त्रीय विश्लेषकाच्या भुमिकेतून केलेल्या निवडक भाषणाच्या या संग्रहात मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानवी नातेसंबंध आणि महिला उद्योजकता अशा विविध अंगाने अर्थचिकित्सा केली आहे.

● पृष्ठे-१५६ ● मूल्य- १७५/-

## तिची लक्ष्मी - विनायक कुळकर्णी




आजच्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र स्त्रीने तिच्या हक्काची कमाई कशी आणि कुठे गुंतवावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणारा लेखसंग्रह.

● पृष्ठे-१४४

● मूल्य- १५०

## गुंतवणुकीचं ग म भ न - विनायक कुळकर्णी

स्त्रियांना नजरेसमोर ठेवून केलेल्या या अर्थविषयक लेखनात तिच्या जीवनात कोणत्या घटना घडू शकतात, त्या प्रसंगी तिने कोणती उपाययोजना करावी, यासंबंधी विस्तृत मार्गदर्शन करणारे पुस्तक.

● पृष्ठे-१२० ● मूल्य- १२५





## सहज सोपे अर्थसूत्र - अरुण केळकर

ट्रेडमार्क, कॉपीराइट, सबसिडी, पेटंट, करपद्धती, अर्थसंकल्प, सोने खरेदी इ. अनेक वित्तीय संकल्पांची मुद्देसूद व सोप्या भाषेत माहिती देणारे पुस्तक.

● पृष्ठे-१२५

● मूल्य- १२५




## गोष्टी पैशाच्या - विनायक कुलकर्णी




वेगवेगळी चलनं कशी अस्तित्वात आली, शेअर्स-पेन्शनपासून ग्रॅच्युईटीपर्यंत विविध आर्थिक गोष्टींचा उदय कसा झाला याची माहिती देणारे पुस्तक.

● पृष्ठे-६४ ● मूल्य- ७०

मैत्रेय प्रकाशन

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.
फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.
टोल फ्री नंबर : १८००२२२६१३.
Website : www.maitreyaprakashan.com

**आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती**

# विकासलक्ष्यी आर्थिक शिस्तीचा संकल्प

**विनायक कुळकर्णी**

भारतीय जनता पक्ष नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेत आल्यानंतर नऊ महिन्यांनी अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांना बरीच कसरत करावी लागली आहे. एकीकडे पायाभूत सोयीसुविधांसाठी तरतूद करतानाच औद्योगिक क्षेत्राला कंपनी करात सवलत देऊन चुचकारताना, पगारदार मध्यमवर्गाला बचतीचे धडे देताना, दुसरीकडे निवृत्त पश्चात काळासाठी पेन्शन फंडांना प्राधान्य देण्याचे सुचवले आहे. त्यासाठी वाढीव सवलत आयकरपात्र उत्पन्नात देऊ केली आहे. देशातील नागरिकांचा आरोग्यावर होणारा खर्च लक्षात घेता आणि त्यामुळे त्यांची धोक्यात येणारी कौटुंबिक अर्थव्यवस्था लक्षात घेता सर्व प्रकारच्या नागरिकांसाठी आरोग्यविम्याचा मांडलेला प्रस्ताव निश्चितच स्वागतार्ह ठरला आहे. वैद्यकीय विम्याची गरज लक्षात घेऊन आयकर कलम ८०-डी अन्वये मिळणारी वजावट पंधरा हजार रुपयांवरून पंचवीस हजार रुपये तर वरिष्ठ नागरिकांसाठी दहा हजार रुपयांनी वाढवून तीस हजार रुपयांवर नेली आहे. सर्व नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षा देण्याचा झालेला प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे. वर्षाला बारा रुपये भरून पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेंतर्गत दोन लाख रुपयांचा अपघात विमा देण्यात आला आहे. वय वर्षे अठरा ते पन्नास या वयोगटातील व्यक्तींसाठी पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेत दरवर्षी ३३० रुपये भरून आयुर्विमा आणि अपघात विम्याचे दोन लाख रुपयांचे दिलेले संरक्षण चांगले आहे. अटल पेन्शन योजनेत दरवर्षी एक हजार रुपये हप्ता भरून ज्या व्यक्ती खाते चालू ठेवतील त्या खात्यात पहिली पाच वर्षे सरकार सुद्धा तेवढीच रक्कम जमा करून वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर पेन्शन देऊ करणार. सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधीत (पीपीएफ) आणि कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीत (एम्प्लॉइज प्रोव्हिडंट फंड) गेल्या अनेक वर्षांपासून दाव्याशिवाय पडून राहिलेले अनुक्रमे तीन हजार कोटी रुपये व सहा हजार कोटी रुपये ज्येष्ठ नागरिक कल्याण निधीसाठी आणि अनुसूचित जाती-जमातीच्या अनुदानासाठी उपयोगात आणले जाणार आहेत. हा निर्णय खरोखरच चांगला आहे.

परंतु वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) लागू होईपर्यंत दोन टक्क्यांनी वाढवलेला सेवाकर मात्र अन्याय करणारा ठरला आहे. वित्त आयोगाने केलेल्या सूचनेवरून केंद्रीय कर महसुलातील एकूण बासष्ट टक्के हिस्सा सर्व राज्यांना दिला जाणार आहे. परंतु या महत्त्वाच्या निर्णयाबद्दल किंवा या निर्णयाच्या परिणामांबद्दल या अर्थसंकल्पात सूचना अपेक्षित होत्या. काळा पैसा खरे म्हणजे राजकारणातील आणि देशाच्या अर्थकारणातील आजवर वापरले गेलेले हुकूमी चलन ठरले आहे. त्यासाठी आजवरच्या एकाही अर्थसंकल्पाने काळ्या पैशांचा स्रोत ठरलेल्या सोन्यातील आणि जमिनीतील रोख रकमेचे व्यवहार टाळण्याचे किंवा नियंत्रित करण्याचे प्रयत्न केलेले नव्हते. यावेळी मात्र अर्थसंकल्पात यावर गांभीर्याने विचार झाला आहे. तसेच उत्पन्न आणि संपत्तीची माहिती दडवल्यास किंवा परदेशातील मालमत्तेबद्दल कर द्यावा लागू नये म्हणून केलेल्या कृतीस तीनशे टक्के दंडासहित दहा वर्षांचा तुरुंगवास होणार आहे. वीस हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचे व्यवहार आता रोख करण्यास प्रतिबंध केला आहे. एक लाख रुपयांहून अधिक रकमेच्या सर्व प्रकारच्या खरेदी-विक्री व्यवहारांसाठी आता आयकराचा पॅन क्रमांक अनिवार्य केला आहे. जनतेची रोख व्यवहार करण्याची मानसिकता बदलण्यासाठी, क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डाचे व्यवहार रुपे कार्डाच्या माध्यमातून करण्याचे या अर्थसंकल्पात सूचित केले आहे. संपत्तीकरातून मिळणारा अवघा एक हजार कोटी रुपयांच्या महसुलापोटी होणारा खर्च लक्षात घेऊन संपत्तीकर रद्द करून अत्युच्च उत्पन्न गटातील म्हणजेच वर्षाला एक कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्यांवर आयकर अधिभारात दोन टक्क्यांनी वाढ करून तो बारा टक्के केला आहे. अर्थातच त्यामुळे किमान आठ हजार कोटी रुपयांनी करमहसुलात भर पडणार आहे.

घराघरात आणि विविध धर्मांच्या देवस्थानांत किमान बावीस हजार टन सोने आहे. हे 'अकाउंटेड' सोने मानले जाते. तर 'अनअकाउंटेड' सोने सुद्धा तितकेच असल्याचा अंदाज वेळोवेळी आला आहे. या बावीस हजार टनांतील किमान वीस-पंचवीस टक्के सोने जरी या सोने रोखीकरणाच्या योजनेद्वारे गोल्ड मॉनेटायझिंग स्कीम चलनात आले तर देशाला खूपच उपयुक्त ठरणारे असेल. या योजनेंतर्गत सोने ठेवीदारांना व्याजाचा लाभ होणार असून ज्वेलरांना त्यांच्या खात्यातील धातू स्वरूपातील जमा सोन्यावर

कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. सामान्यजना-कडून वेळोवेळी केल्या जाणाऱ्या धातू स्वरूपातील सोन्याच्या खरेदीला पर्याय म्हणून स्वतंत्र सुवर्ण रोखे (सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड्स) योजना विकसित केली जाणार आहे. त्याशिवाय सोन्याच्या नाण्यांची होणारी तस्करी लक्षात घेऊन भारतीय सोन्याच्या नाण्यांची ओळख म्हणून त्या नाण्यांवर अशोक चक्राची मुद्रा कोरण्यात येण्याची योजना आखली आहे. त्यामुळे देशातील सोने पुनर्चक्राद्वारे चलनात येऊन सोन्याची आयात कमी करणे शक्य होईल.

आज भारतात शेअर बाजार ज्या प्रमाणात विकसित होऊन जनसामान्यांपर्यंत पोचत आहे त्या तुलनेत रोखे बाजार भारतात विकसित होऊ शकला नाही. म्हणूनच प्रगत राष्ट्रांच्या धर्तीवर भारतात सार्वजनिक रोखे व्यवस्थापन सेवा संस्था (Public Debt Management Agency) या वर्षी निर्माण करून देशांतर्गत आणि विदेशी ऋणपत्रांचे नियमन एकाच छपराखाली आणण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात झाला आहे. सर्वसामान्यांमध्ये रोखे बाजाराबद्दल असणारी अनभिज्ञता एक प्रकारे दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. वायदा बाजार आयोगाचे सेबीमध्ये विलिनीकरण करून एकाच नियामक संस्थेकडे सर्वच आर्थिक व्यवहारांचे नियमन करण्याचा प्रयत्न दिसून येत आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी सट्टेबाजार असेल त्यावर एकाच संस्थेचे नियमन असल्याने गुंतवणूकदारांचे हित जपण्याचा मानस या कृतीतून स्पष्ट होतो. यासाठी आवश्यक असणाऱ्या सरकारी रोखे कायदा आणि भारतीय रिझर्व्ह बँक कायद्यातील दुरुस्त्या वित्त विधेयक २०१५ मध्येच अंतर्भूत केल्या आहेत. गुंतवणूकदारांचे संरक्षण आणि साक्षरता या घटकांनासुद्धा आता यामुळे महत्त्व आले आहे.

पगारदाराला करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत अपेक्षित असलेली वाढ झालेली नसली तरी त्याच्या करमुक्त प्रवासभत्त्यात ८०० रुपयांवरून १६०० रुपयांवर वाढ झाली आहे. तसेच निवृत्तीपश्चात आवश्यक ठरणाऱ्या पेन्शन फंड आणि राष्ट्रीय पेन्शन योजनेत अधिकतम पन्नास हजार रुपयांपर्यंत आयकर कलम ८० सीसीडी अन्वये करपात्र उत्पन्नातून अतिरिक्त वजावट मिळणार आहे. त्यामुळे म्युच्युअल फंडांच्या पेन्शन फंडांना मागणी येणार आहे. बहुसंख्य म्युच्युअल फंड पेन्शन फंड आणण्यासाठी मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत.



प्रत्येक अर्थसंकल्पातून सर्वांच्याच अपेक्षा खूपच असतात, पण भविष्यातील प्रश्नांचा नेमका विचार करून वित्तीय शिस्त आणताना काहीसे कठोर निर्णय घेताना अर्थमंत्र्यांनी सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर केला आहे असेच म्हणावे लागेल.

नुकतीच चालू झालेली सुकन्या समृद्धी खाते ही लहान मुलींच्या नावे करायची गुंतवणूक योजना आहे. या योजनेत मुख्यत: त्या खातेधारक मुलीच्या उच्च शिक्षणासाठी किंवा विवाहासाठी तरतूद करण्याच्या उद्दिष्टाने त्या मुलीच्या आई-वडिलांनी किंवा कायदेशीर पालकांनी खाते उघडणे अपेक्षित आहे. एका आर्थिक वर्षात-एप्रिल ते मार्च - या खात्यात मुलीचे पालक अधिकतम १,५०,००० रुपये भरू शकतात. या खात्यावर प्रतिवर्ष चक्रवाढ पद्धतीने ९.१ टक्के दराने व्याज देण्यात येणार आहे. अर्थातच हा व्याजदर दरवर्षी बदलता असून तो बाजारपेठेतील व्याजदरांशी निगडीत असेल. हे व्याज संपूर्ण करमुक्त असेल आणि या खात्यावर मुलीच्या नावाने केलेल्या गुंतवणुकीवर पालकांना आयकर कलम ८० सी अन्वये करपात्र उत्पन्नातून वजावट घेता येईल, असे केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अर्थसंकल्पात जाहीर केले आहे. प्रत्येक अर्थसंकल्पातून सर्वांच्याच अपेक्षा खूपच असतात, पण भविष्यातील प्रश्नांचा नेमका विचार करून, वित्तीय शिस्त आणताना काहीसे कठोर निर्णय घेताना अर्थमंत्र्यांनी सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर केला आहे असेच म्हणावे लागेल. ●


॥ग्रंथाली॥ मुद्रण सुविधा केंद्र




**हेलिकॉप्टर आणि मी**

**सुरेश शिवराम गोखले**

सुरेश गोखले यांच्या हेलिकॉप्टर उड्डाणाच्या कारकिर्दीतील काही आठवणी...

**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.**

# देशाच्या अर्थकारणाची दिशा

## डॉ. अभिजीत फडणीस



‘अच्छे दिन’च्या घोषणा करत सत्तारूढ झालेल्या विद्यमान मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांविषयी तसंच त्यामागच्या मानसिकतेविषयी उलगडून सांगत आहेत आयआयटी पवई येथील शैलेश मेहता व्यवस्थापन केंद्रातील अभ्यागत प्राध्यापक डॉ. अभिजित फडणीस.

**⁂ आधीचे युपीए सरकार आणि विद्यमान भाजप सरकार यांच्यामधील साम्यस्थळं आणि फरक कोणते?**

**डॉ. अभिजित फडणीस –** गेल्या २० वर्षांतील काँग्रेस पक्षाचे सरकार आणि भाजप यांच्यात आर्थिक बाबींमध्ये अनेक साम्यस्थळं दिसतात, तसंच फरकही आहेत. उदारीकरण, भांडवलशाही, परकीय गुंतवणूक याबाबत अनुकूलता अशी अनेक साम्यस्थळं दाखवता येतील. मात्र योजनांमागील उद्दिष्टं, त्यांची अंमलबजावणी, यांबाबतच्या मूलभूत चिंतनात फरक जाणवतो. उदाहरणार्थ, ‘मनरेगा’सारखी महत्त्वाकांक्षी योजना राबवताना काही अनपेक्षित परिणाम दिसू लागले. ते म्हणजे गावातील लोकांना स्थानिक पातळीवर विनासायास रोजगार मिळण्याची संधी निर्माण झाली. कमी कष्टांत अर्थार्जनाची संधी सरकार उपलब्ध करून देत आहे, त्यामुळे मला अधिक श्रम करायची गरज नाही ही परावलंबी मानसिकता हळूहळू दृढ होऊ लागली. त्यामुळे पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी मनुष्यबळ तोकडं पडू लागलं. मात्र लोकांना रोजगार निर्माण करून देण्यासाठी कृत्रिम योजनांपेक्षा त्यांना अधिकाधिक श्रमशील, स्वयंरोजगारास कसं उद्युक्त करता येईल याबाबत विद्यमान सरकार विचार करत असल्याचं दिसतं. हा अगोदरच्या आणि आताच्या सरकारांमधील एक ठळक फरक सांगता येईल.

गेल्या सहा-सात महिन्यांत हे सरकार अनुदानअवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीनं सकारात्मक पावलं टाकत आहे. लोकांनी त्यांच्या क्रयशक्तीप्रमाणे बाजारपेठेच्या दरानुसार खरेदी करावी अशी मानसिकता तयार करण्याकडे विद्यमान सरकारचा कल आहे. त्याच्या जोडीला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अन्य रूपाने मदत करून समन्वय साधायचा प्रयत्न केला जात आहे. उदाहरणार्थ, घरगुती गॅस सिलेंडरवरील अनुदान थेट बँक खात्यात जमा करणं. (अर्थात पूर्वीच्या सरकारचा निर्णय विद्यमान सरकारनं अंमलात आणला.) जगाच्या बाजारात तेलाचे दर घसरल्यानं डिझेलवरील अनुदान या सरकारनं काढलं, हा या सरकारच्या नशिबाचा भाग म्हणायचा. ही तेलदराची घसरण सरकारच्या पथ्यावर पडली.

दोन्ही सरकारांच्या मूलभूत चिंतनात फरक नाही. मात्र अंमलबजावणीच्या बाबतीत विद्यमान सरकार धडाडीनं काम करत आहे. त्यासाठी अर्थातच त्यांच्याकडे लोकसभेत संख्याबळ आहे, राजकीय नेतृत्वाची धडाडी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे विद्यमान सरकारच्या विचारसरणीमुळे किंवा वैचारिक बैठकीमुळे ‘प्रत्येक गोष्ट परदेशाकडे पाहूनच शिकायला किंवा करायला हवी’ ही समजूत दूर व्हायला मदत होत आहे. भारतीय ज्ञानपरंपरा, विचार यांना अनुसरून तसंच पारंपरिक कलाकौशल्यांना वाव देऊन समाजघटकांची मानसिकता आणि विद्यमान सरकारची मानसिकता यांत मूलभूत फरक आहे. आपल्या देशात जे जे उत्तम आहे, जे पारंपरिक ज्ञान आहे, जी हस्तकौशल्यं आहेत त्याकडे अगोदरच्या सरकारचं दुर्लक्ष झालं होतं. मात्र या सरकारचा दृष्टीकोन नेमका विरुद्ध आहे. समाजातील दोषांचं निराकरण करून, आधुनिकता आणि पारंपरिक ज्ञान यांचा मेळ साधून व्यावसायिक संधी उपलब्ध करण्याकडे या सरकारचा कल दिसतो. उदाहरणार्थ, वाराणसीतील हातमाग कामगारांना ‘फ्लिपकार्ट’च्या माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करण्याचा निर्णय, एक लाख गावांमध्ये सेंद्रिय शेती करण्याची घोषणा इत्यादी.

**⁂ हितसंबंधांचे राजकारण, कामगार कायद्यासंदर्भात भूमिका**

**डॉ. फडणीस –** आपल्याकडे व्यवस्थेच्या आत असणारे आपलेच हितसंबंध जपण्यात गुंग असतात. त्यांना उर्वरित समाजाशी काहीच घेणंदेणं नसतं. शिवाय व्यवस्थेच्या आतले लोक संघटित असल्यानं त्यांना हवे तसे फायदे मिळवतात. शिवाय कामगार कल्याणाच्या नावाखाली जे कायदे होतात त्याचा गैरफायदा घेत

संघटित कामगार धरणंआंदोलनांच्या माध्यमातून उत्पादन ठप्प करतात. त्यामुळे श्रमदिन वाया जातात आणि उत्पादन शून्य होतं. याचा अर्थव्यवस्थेवरही अनिष्ट परिणाम होतो.

मी २००३-०९ दरम्यान भारतीय राज्यांचा आर्थिक पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या ४० निकषांवर अभ्यास केला होता. त्यात औद्योगिक वादविवादांमुळे पश्चिम बंगाल, केरळ आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांचे श्रमदिन सर्वात जास्त वाया गेल्याचं आढळलं. हितसंबंधांच्या राजकारणामुळे पश्चिम बंगालसारखे एकेकाळी देशात पहिल्या दहा क्रमांकांत असणारं राज्य मागे पडलं. त्यामुळे या सरकारनं हितसंबंधांच्या राजकारणाला फाटा देत कामगार कायद्यांत लवचीकता आणत उद्योगशीलतेला वाव देणं गरजेचं आहे.

**※ विद्यमान सरकारच्या 'मेक इन इंडिया' या घोषणेविषयी तुम्हाला काय वाटतं?**

**डॉ. फडणीस –** 'मेक इन इंडिया' म्हणजे केवळ परदेशी कंपन्यांनी भारतात येऊन रोजगारनिर्मिती करणे अशी धारणा आहे, मात्र 'मेक इन इंडिया'कडे मी भारतीयत्वाच्या दृष्टीनं पाहतो. या योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी सरकारइतकाच लोकसहभाग महत्त्वाचा आहे. माझ्या मते केंद्र आणि राज्य सरकारनं एकत्रितरित्या राज्यातील किमान पाच पर्यटनस्थळांचा सर्वांगीण विकास करावा. तसंच केवळ सांस्कृतिक दृष्टिकोनातून नव्हे तर व्यावसायिक दृष्टीनं कृषी, औद्योगिक पर्यटनाला चालना मिळावी. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील औरंगाबाद हे शहर. अजिंठा-वेरुळ लेण्यांमुळे आणि अन्य ऐतिहासिक वास्तूंमुळे पर्यटनाच्या दृष्टीनं हे शहर अतिशय महत्त्वाचं आहे. त्याच्या जवळ असलेल्या येवला शहरात पैठणीव्यवसाय प्रसिद्ध आहे. अशावेळी येणाऱ्या पर्यटकानं लेणी, वास्तू यांबरोबरच पैठणीउद्योगालाही भेट द्यावी, अशी क्लृप्ती योजावी लागेल आणि त्या दृष्टीनं सोयीसुविधा निर्माण कराव्या लागतील.

अशा प्रकारच्या एकात्मिक विकासातून स्थानिक पातळीवर प्रचंड रोजगारनिर्मिती होईल आणि आपोआपच स्वच्छता राखली जाईल. शिवाय याचे चांगले सामाजिक परिणाम दिसून येतील. व्यसनाधीनता कमी होईल. यात स्त्रियांना सामावून घेतल्यास त्यांनाही रोजगार मिळेलच, शिवाय त्यांच्या सक्षमीकरणालाही चालना मिळेल. अशा पद्धतीनं ३० राज्यांतील प्रत्येकी पाच याप्रमाणे १५० पर्यटनस्थळांचा सुयोग्य, नीटनेटका विकास झाला तर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल.

दुसरी गोष्ट म्हणजे आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे 'लार्ज स्केल प्रॉडक्शन' हळूहळू कमी होत जाणार आहे. थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञानामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याची गरज संपते आहे. आज एखाद्या वाहनाचे, विमानाचे काही भाग कारखान्यातून निर्माण न होता थ्री डी प्रिंटिंगद्वारे तयार केले जात आहेत. इंटरनेटवरून इच्छित प्रारूप पैसे भरून डाऊनलोड केल्यास हवे ते उत्पादन विकसित करता येणं शक्य होईल आणि याचा बोलबाला येत्या १५-२० वर्षांत भारतातही होईल. म्हणूनच माझ्या मते 'मेक इन इंडिया'चा संबंध केवळ मोठ्या प्रमाणावर उत्पादन याच्याशीच नसून एकेका क्षेत्रासाठी उद्यमशील बाजारपेठ, त्यात स्थानिक पर्यावरण, रोजगार यांचा विचार, लोकसहभाग याच्याशी निगडीत आहे. हे करताना आपण लोकांना उद्यमशील करावं, त्यांना व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख करावं. तरच आपण स्वयंसिद्ध आणि स्वयंपूर्ण होऊ.

**※ भारतात होणारी परकीय गुंतवणूक व त्याचे परिणाम याविषयी काय सांगाल?**

**डॉ. फडणीस –** भारतात आज थेट परकीय गुंतवणूक डोळसपणे व्हायला हवी. एखादी परदेशी कंपनी फक्त ४९ टक्के भाग भांडवलावर त्यांची कल्पना घेऊन भारतीय कंपन्यांच्या सहकार्याने उत्पादन करेल अशी समजूत करणं हे भाबडेपणाचं लक्षण आहे. त्यापेक्षा त्या परदेशी कंपनीला १०० टक्के गुंतवणुकीची परवानगी देऊन भारतातच उत्पादन होईल असं पाहावं. त्यामुळे कंपनीला होणारा नफा, करसंकलन यावर भारत सरकारचं लक्ष राहील.

थेट परकीय गुंतवणुकीचे वेगवेगळे टप्पे आहेत. सुरुवातीला परदेशी कंपनी आपले प्रातिनिधिक कार्यालय उभे करते. त्या कार्यालयाद्वारे कुठलेही आर्थिक व्यवहार केले जात नाहीत. फक्त बाजारपेठेचा अभ्यास करू शकते. नंतरचा टप्पा म्हणजे शाखा निर्माण करून व्यवहार करणं. तिसरा टप्पा म्हणजे उपकंपनी तयार करून निर्मिती करणं. आपल्याला या तिसऱ्या टप्प्याकडे डोळसपणे पाहायला हवं. त्यातील चांगल्या तरतुदीमुळे देशांतर्गत लहानमोठ्या उद्योगांना बळ मिळेल.

देशाच्या दृष्टीनं महत्त्वाच्या अशा संरक्षणक्षेत्रात १०० टक्के गुंतवणूक व्हावी, असं वाटतं. सरसकट एफडीआय (फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट) देण्यापेक्षा सरंक्षण आणि अन्य महत्त्वाच्या क्षेत्रांत दिली जावी.

**※ उद्योगजगत आणि सरकार यांच्यातील परस्परसंबंधांविषयी काय वाटतं?**

**डॉ. फडणीस –** उद्योगजगत आणि सरकार यांच्यातील सुसंवादाचा फायदा अर्थव्यवस्थेला होत असतो. आपल्याकडे उदारीकरणाच्या अगोदर कंपन्यांना, उद्योगसमूहांना खुजं ठेवण्याची एक मानसिकता होती. मात्र याबाबतत आपण जपान, कोरिया यांचा आदर्श घ्यायला हवा. या देशातील सरकारे त्यांच्या उद्योगांपाठी ठाम उभी राहिली. कंपन्या वाढू दिल्या. प्रत्येक क्षेत्रात एकेक महाकाय कंपनी निर्माण करण्यासाठी सर्वप्रकारे साहाय्य केलं. लक्षात घेण्यासारखी दुसरी एक बाब म्हणजे १९७८ साली भारत आणि दक्षिण कोरिया यांचं दरडोई उत्पन्न समान होते. मात्र गेल्या काही वर्षांत दक्षिण कोरियानं केलेल्या नेत्रदीपक प्रगतीमुळे तो एक विकसित देश झाला आहे. आज त्याच्या आणि भारताच्या दरडोई उत्पन्नात जवळजवळ २० पटींची तफावत आहे.

त्यामुळेच मला वाटतं की, कृत्रिम उपाययोजनांद्वारे रोजगारनिर्मिती करण्यापेक्षा समाजातील दुर्बल घटकांना कार्यकुशल, व्यवसायाभिमुख आणि उद्यमशील बनवल्यास अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

**❋ चुकीच्या धोरणांचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम?**

**डॉ. फडणीस –** अगोदरच्या सरकारच्या धोरणांमुळे वाढलेली वित्तीय तूट, त्याचं व्याज वाढलं आहे. शिवाय खतांच्या अनुदानापोटी दिले गेलेले कित्येक हजार कोटी, वीजमाफी यांसारख्या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर ताण पडला. आज आपल्याकडे शेती उत्तम स्थितीत का नाही? रासायनिक खतांचा बेसुमार वापर, भूजलाची घटती पातळी ययामुळे शेतीची समस्या जटील होत गेली. खतांचं अनुदान, वीजमाफी यांसारख्या उपायांमुळे शेती अशक्त होत गेली. शिवाय शेतमालाचे भाव, दलालांचं दुष्टचक्र यांबाबतीत सकारात्मक निर्णय न घेतल्यानं शेतीची अवस्था खालावत गेली. त्यामुळे आज गरज आहे ती पर्यावरणपूरक उपाय शोधून त्याची तातडीनं अंमलबजावणी करण्याची. विकासाचं कुठलंही प्रारूप राबवताना त्यात पर्यावरणसंरक्षणाचाही मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे, हे विसरता कामा नये.

**❋ येत्या काळात महाराष्ट्रात काय बदल अपेक्षित आहेत?**

**डॉ. फडणीस –** आज महाराष्ट्रात आणि विशेषत: मुंबईत जागांचे दर अवास्तव वाढले आहेत. त्यावर सरकारनं उपाययोजना करणं अपेक्षित आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक सुलभ, वेगवान व्हायला हवी. ज्याप्रमाणे आय.टी. हब तयार झाले त्यापद्धतीनं बिझनेस हब/मॅनेजमेंट हब तयार व्हायला हवेत. मोठमोठ्या परदेशी कंपन्यांची वाणिज्य कार्यालयं मुंबईत एकवटून सिंगापूर आदी शहरांसारखं महत्त्वाचं वाणिज्य शहर कसं होईल हे पाहायला हवं.

**❋ पुढे काय?**

**डॉ. फडणीस –** उत्तम आर्थिक विकास साधण्यासाठी केंद्र–राज्य सरकारांनी समन्वय साधायला हवा. त्याचबरोबर पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान–तंत्रज्ञान यांचा सुयोग्य मेळ घालून लोकसहभागातून हा विकास साधायचा आहे.

**– ओंकार पिंपळे**
९८३३१९१०७९
omkar.pimple21@gmail.com

**डॉ. अभिजीत फडणीस**
भ्रमणध्वनी : ९८२०४०२३४५
abhijitaishwarya@gmail.com

### अ) औद्योगिक विश्लेषण

- सरकारी धोरणांचा त्या त्या उद्योगांवर होणारा परिणाम.
- उत्पादनांची भविष्यातील मागणी आणि त्यांची गरज.
- प्रतिस्पर्ध्यांकडून होणारी स्पर्धा.
- उद्योगांमध्ये तांत्रिक आधुनिकता.
- या उद्योगांवर अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा किंवा मंदीचा होणारा परिणाम.
  (उदा. रुपयांच्या अवमूल्यनाचा निर्यातलक्ष्यी कंपन्याना लाभ होतो.)

### ब) कंपनी विश्लेषण

- कंपनीची आजवरची कामगिरी आणि विद्यमान दृष्टी.
- व्यवस्थापन क्षमता.
- व्यवसाय वृद्धीचे आडाखे.
- कंपनीची त्या उद्योग क्षेत्रातील प्रतिमा आणि प्रतिष्ठा.


## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : | मासिक |
| मुद्रकाचे नाव | : | इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |


मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१५

# लोकवाङ्मय गृह — नवी पुस्तके

## जागतिक वित्त भांडवलशाही : भांडवली पद्धतीचा अंतिम चरण!

### चंद्रकांत केळकर



जागतिकीकरणात श्रम ह्या मानवी स्वरूपात वावरणाऱ्या उत्पादन घटकाची झालेली फरपट आपण पाहत आहोत. मग ती फरपट म्हणजेच बहुसंख्यांचा विकास आहे की समाजाकरता विकासाची वेगळी पद्धती व उद्दिष्टे असू शकतात का, या दृष्टिकोनातून गेली ४०-४५ वर्षे प्राचार्य केळकरांनी चिंतन व लेखन केले आहे. त्याचेच दृश्य फळ म्हणजे हा लेखसंग्रह होय.

पाने : १८०
किंमत : ₹१८०

## दोन जुने अभिजात अर्थशास्त्रीय निबंध

### संपादक : नीरज हातेकर / राजन पडवळ


एकोणिसाव्या शतकातील अर्थविषयक विचार समजून घेण्यास उपयुक्त ठरतील अशी 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' आणि 'निरपेक्ष भांडवल' ही दोन पुस्तके एकत्रित स्वरूपात. या दोन्ही निबंधांचे संपादन करताना तत्कालीन भारतातील महत्त्वाच्या अर्थविषयक विचारवंतांच्या विचारांचा परामर्श नीरज हातेकर व राजन पडवळ यांनी प्रस्तावनेत घेतला आहे.



पाने : १४०
किंमत : ₹ १४०

## मार्क्स काय म्हणाला

### उदय नारकर





'मार्क्सचा विचार कामगार-कष्टकऱ्यांना समजेल अशा भाषेत त्यांच्यासमोर मांडावा, त्यावर विविध भाषांतून झालेल्या सोप्या पण चांगलं लिहिणाऱ्यांची आपल्या वाचकांशी भेट घडवून आणावी' असं सतत वाटत असणाऱ्या उदय नारकरांच्या वाचनात टेरी इगल्टन यांचे 'व्हाय मार्क्स वॉज राईट' हे पुस्तक आले. त्याचे सुबोध मराठीत व आपल्या संदर्भात केलेले हे पुनर्कथन.

पाने : २००
किंमत : ₹ २००

## प्राध्यापक लिमिटेड

### जयदेव डोळे

महाराष्ट्रातील उच्च शैक्षणिक वातावरण सुमार दर्जाच्या आणि केवळ व्यवस्थापकीय कौशल्य अंगी असणाऱ्या प्राध्यापकांमुळे निर्जीव झाले आहे. ग्रामीण भागात तर 'भयंकर बीभत्स गारठा' झोंबत असतो. हा गारठा निघून जावा, वैचारिक मंथनातून उष्णता यावी आणि महाराष्ट्र खरा पुरोगामी व्हावा या सदिच्छेतून जयदेव डोळे यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह.




पाने : १६४
किंमत : ₹ २००

BookGanga.com — येथेही उपलब्ध — newshunt.com

पिपल्स बुक हाऊस : १५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ✆ : ०२२-२२८७ ३७६८.
लोकवाङ्मय गृह : भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. ✆ : ०२२-२४३६ २४७४.
फॅक्स : २४३१ ३२२०. E-mail : lokvangmayagriha@gmail.com
लोकवाङ्मय गृह प्रा. लि. : ५६२, सदाशिव पेठ, पुणे -४११ ०३० ✆ : ०२०-२४४७ ८२६३

Website : www.lokvangmaygriha.com

# भारतीय बँकिंग प्रगतीचे स्टेटमेंट!

**राजीव जोशी**



ब्रिटिश कालखंडात रुजलेली बँकिंग व्यवस्था, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर काही काळ मात्र तशीच कार्यरत राहिली. एकीकडे देशाच्या अर्थव्यवस्थेला आकार देण्यासाठी नियोजन मंडळ, पंचवार्षिक योजना आपल्या सरकारने सुरू केल्या आणि देशातील जनतेला आर्थिक स्वातंत्र्य देण्यासाठी पावले उचलली गेली. तोवर देशी बँका म्हणजे श्रीमंत-धनिकांना सेवा देणाऱ्या म्हणून प्रसिद्ध होत्या. उत्पन्नाचे साधनच मर्यादित आणि दारिद्र्य अमर्याद असल्याने बचत, ठेवी व कर्ज ह्यांचा विचार तरी कसा करणार? श्रीमंताना अधिक सोयी देऊन आपल्या नफ्याकडे लक्ष देणाऱ्या बँका, त्यांना बाकीच्या जनतेची किंवा देशाच्या प्रगतीची काही चिंता नव्हती.

पार्श्वभूमी –ग्रामीण भागात दारिद्र्य तर होतेच आणि शेतीवर अवलंबून असलेल्या छोट्या शेतकऱ्यांना पोटापुरते मिळणेही दुरापास्त होते. परिणामी त्यांना आपल्या गरजा भागवण्यासाठी सावकाराकडेच जावे लागे. पिढ्यान्‌पिढ्या सावकारीपाशात अडकून पडत होत्या. पण काही ठोस उपाय दिसत नव्हता. १९५१ साली देशभरात सर्वेक्षण केले गेले– (All India Rural Credit Survey-1951) आणि प्रथमच अनधिकृत सावकारी-कर्जात बुडालेल्या गोरगरीबांची माहिती-आकडेवारी जमवली गेली. आणि काही उपाय करण्याची प्रक्रिया सुरू झाली. रिझर्व्ह बँकेतर्फे शेतकी कर्जासाठी पुर्नअर्थसाहाय्य (रिफायनान्स) दिले गेले. १९५५ साली स्थापन झालेल्या स्टेट बँकेने ग्रामीण व सेमी-अर्बन भागात मोठ्या प्रमाणावर बँकिंगचे जाळे उघडण्याचे ध्येय समोर ठेवले. दुसरीकडे सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाला पतपुरवठा मिळत राहिला.

त्यानंतर १९६९ साली भारत सरकारने क्रांतिकारक पाऊल टाकले ते १४ बँकांचे राष्ट्रीयकरण करून. त्याचा परिणाम म्हणजे सरकारी बँकांनी ग्रामीण शाखा उघडण्यावर भर दिला. १९७५ साली विभागीय ग्रामीण बँकांची संकल्पना अस्तित्वात आली आणि १९८२मध्ये नाबार्डचा जन्म झाला–ज्यामुळे शेती आणि ग्रामीण कर्जाबाबत संस्थास्तरावर वित्तपुरवठा सुरू झाला. शेती-बागायती पीक उत्पादन आणि कर्जपुरवठा ह्यातील तफावत कमी होऊ लागली.

पुढे प्राधान्य क्षेत्र (Priority Sector) ही संकल्पना अमलात आली आणि लघुउद्योग, निर्यात ह्यांना सवलतीच्या दराने कर्ज आणि अन्य सुविधा प्राप्त होऊ लागल्या. बँकांच्या एकूण कर्जवाटपातील ४०% इतका वाटा ह्या क्षेत्राला मिळू लागला. (अपेक्षित असलेल्या एकूण १८.५% शेती कर्जापैकी १३.५% हे थेट कर्ज-पद्धतीने दिले गेले पाहिजेत आणि उरलेले ५% हे अप्रत्यक्ष कर्जरूपाने दिले गेले पाहिजेत.)

**सरकारी योजना आणि रोजगारास प्राधान्य**

स्वयंरोजगार, ग्रामीण कारागिरी ह्यांना प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना कार्यान्वित होत्या. उदाहरणार्थ – स्वर्णजयंती, ग्रामस्वराज्य योजना कागदोपत्री छान होत्या, पण लाभार्थींना 'फळ' मिळत होते का? आता त्या त्रुटी दूर होणार आहेत का? शेती हा प्रधान व्यवसाय आणि प्रमुख उत्पन्नाचे साधन म्हणून टिकणार आहे का? पारंपरिक शेत-बागायती जमीनी बिल्डर्सना विकून नगरे वसवली जात आहेत, शेतमजुरांची संख्या कमी होते आहे अशा परिस्थितीत 'शेती' टिकणार आहे का? आजवर तर कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करत असूनही ठोस उपाययोजना नाहीत. हे विदारक आहे.

**आर्थिक सुधारणांचे वारे बँकिंग क्षेत्राला पोषक ठरले**

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र असे बदल झाले. काही उपकारक तर काही अपायकारक ठरले हा एक वेगळाच मुद्दा! केवळ सरकारी आणि निवडक सहकारी व खाजगी बँका असलेले बँकिंग क्षेत्र हे काहीसे अडसर बनत चालले होते. सरकारी बँकांची उदासीनता, व्यावसायिकतेचा अभाव, लाल-फितीतील यंत्रणा, सर्व-सामान्य ग्राहकांची कोंडी, मोठ्या कॉर्पोरेट कर्जाचे –थकित कर्जाचे महाकाय डोंगर आणि सुस्त प्रशासन अशा असंख्य दोषांनी ते बजबजले होते. एकीकडे कम्प्युटर युग अवतरत होते आणि परिणामी बँकांतील मनुष्यबळ संख्या ही अनुत्पादित ठरू पाहत होती. स्पर्धा नाही, विक्री आणि नफ्याची फिकीर नाही, अशाने वित्तपुरवठा आणि बचत प्रभावी होणार तरी कशी?

नवीन बँकांना लायसन्स देण्याचे धोरण आले आणि नव्या खाजगी बँका जन्माला आल्या – त्याही सोबत नवीन तंत्रज्ञान आणि नफ्याची जबरदस्त इर्ष्या घेऊन. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवनवीन साधने, उत्पादने ह्यांचा जणू चंगच बांधला. दुसरीकडे कमी भांडवल, भ्रष्टाचार, व्यावसायिकतेचा अभाव आणि राजकीय हस्तक्षेप ह्या विकारांनी सहकारक्षेत्र बरबटून गेले होते. काही बँका बुडाल्या की बुडवल्या गेल्या? सरकारी बँकांना




'एकीकडे इंटरनेट आणि दुसऱ्या बाजूने मोबाईलने बँकिंग व्यवहार सुकर केले. ह्यामुळे कित्येक वर्षे चालू असलेली 'ब्रिक आणि मोर्टार' म्हणजेच भिंती-इमारतीतील शाखा असे स्वरूप मागे पडून एटीएम आणि त्याहीपुढे जावून केवळ इंटरनेट आणि मोबाईलद्वारे व्यवहार होऊ लागले आहेत. त्या कारणाने नवीन समस्या निर्माण होत आहेत. अर्थात जगतील सर्व आधुनिक बँकांना इंटरनेट आणि मोबाईल बँकिंगबाबत समस्या भेडसावत आहेत. सुरक्षा, फ्रॉडस, लॉग-इन-पासवर्डबाबत खबरदारी आणि फिशिंगसारख्या गोष्टीना सामोरे जाणे हे एक आव्हान झालेले आहे.

अनुत्पादित कर्जाच्या डोंगराने मरणासन्न करून टाकलेले, अशा परिस्थितीत मोठ्या शहरात नव्याने उदयाला आलेला अधिक पगार कमावणारा नवमध्यमवर्ग नव्या बँकांकडे आकृष्ट झाला तर नवल नव्हे! पूर्वीचा गिरणी कामगार, उत्पादन कंपन्यांतील कामगारवर्ग आणि कामगार चळवळ ह्याच काळात संपुष्टात येत होती. नवीन सफेद कर्मचारीवर्गाला मिक्सर, टीव्ही, स्कुटर, मोटार आणि स्वत:च्या मालकीचा ब्लॉक आणि त्याबरोबरीने येणारी अत्याधुनिक राहणी आणि उंचावलेले जीवनमान आकर्षित करत होते. ह्याचा पुरेपूर फायदा नव्या बँकांनी आणि परदेशी बँकांनी घेतला. सरकारी बँका ह्या तीव्र स्पर्धेत मागे पडल्या. ही अनेक स्थित्यंतरे आपण डोळ्यांनी पहिली, अनेकदा इच्छा असताना वा नसताना त्यात सहभागीही झालो ही मात्र विदारक अशी वस्तुस्थिती आहे.

कम्प्युटर मागे पडेल अशी क्रांती इंटरनेटने केली आणि ऑन-लाईनचे युग प्रकटले. अर्थात बँकिंगनेही ते तंत्रज्ञान आत्मसात केले. स्पर्धा आणि नवनवीन येणारे तंत्र हे थांबून चालत नाही. 'भाग घ्या नाहीतर बाहेर पडा!' असे ते धोरण असते. 'एकीकडे इंटरनेट आणि दुसऱ्या बाजूने मोबाईलने बँकिंग व्यवहार सुकर केले. ह्यामुळे कित्येक वर्षे चालू असलेली 'ब्रिक आणि मोर्टार' म्हणजेच भिंती-इमारतीतील शाखा असे स्वरूप मागे पडून एटीएम आणि त्याहीपुढे जावून केवळ इंटरनेट आणि मोबाईलद्वारे व्यवहार होऊ लागले आहेत. त्या कारणाने नवीन समस्या निर्माण होत आहेत. अर्थात जगतील सर्व आधुनिक बँकांना इंटरनेट आणि मोबाईल बँकिंगबाबत समस्या भेडसावत आहेत. सुरक्षा, फ्रॉडस, लॉग-इन-पासवर्डबाबत खबरदारी आणि फिशिंगसारख्या गोष्टीना सामोरे जाणे हे एक आव्हान झालेले आहे. शिवाय सातत्याने येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकत वा भाड्याने घेणे हा मोठ्या खर्चाचा विषय आहे.

आज डेबिट कार्ड, एटीएम आणि मोबाईल हे शहर आणि खेड्यात पोचलेले आहे. सर्वसमावेशक बँकिंग म्हणजेच Financial Inclusion हे देशातील जास्तीत जास्त लोकांना बँक ग्राहक करण्यासाठी कटिबद्ध झालेले आहे. वरकरणी तरी 'जनधन योजना' बँक खाती उघडण्याचे उद्दिष्ट पूर्ण करत आहे. विविध लाभदायी योजनांचे पैसे रोखीने न देता थेट बँक खात्यात जमा करण्याने खाती वापरात राहतील आणि अफरातफर कमी होऊ शकेल. खाते उघडणे, पैसे ठेवणे वा काढणे हे साधे व्यवहार होतील, परंतु कर्जाचे काय? अर्थ-चक्र कार्यान्वित राहण्यासाठी आणि उत्पादन व उत्पन्ननिर्मितीसाठी निधी उपलब्ध करून देणे हेही बँकांचे कार्य आहे. तिथे इंटरनेट-मोबाईल तितके कामी येणार नाहीत, अनुभवी बँकर्सची गरज लागणार आहे.

आजदेखील बँका आजारी आहेत किंवा सक्षम नाहीत कारण अनुत्पादित कर्जाचे डोंगर डोक्यावर आहेत, कर्ज प्रकाराकडे अधिक गुणात्मक दृष्टीने पाहिले गेले पाहिजे. शेती, लघुउद्योग आणि निर्यात ह्यांना उत्पादनक्षेत्राप्रमाणे संधी-सोयी मिळायला हव्यात. बँकांनी व्यावसायिकता जपून राजकीय हस्तक्षेप टाळले पाहिजेत. सरकारी बँका जितक्या स्वतंत्र होतील तितकी कार्यक्षमता वाढेल. सहकारी बँकांना प्रोफेशनल व्हावे लागेल आणि वेळ पडल्यास खाजगी बँका म्हणून रूपांतर करण्याचा विचार करावा लागेल. खाजगी बँकांची अधिक नफ्याची हाव ही समतोल कारभार, गुणात्मक कर्ज-वाटप आणि सकस मनुष्यबळ ह्यांच्या तुलनेत पाहायला हवी. रिझर्व बँक आणि अन्य नियंत्रकांनी काळा पैसा Black Money, मनी-लॉण्डरिंग Money Laundering आणि व्यवहार सुरक्षित होणे व सायबर-क्राईम्सकडे विशेष लक्ष पुरवले पाहिजे. बँकांनी भांडवलवृद्धी, तंत्रज्ञान, नवीन सेवा, ग्राहकव्याप्ती आणि सर्व प्रकारच्या जोखमा Risks ह्याकडे जागरुकतेने पाहिले पाहिजे. केवळ रिटेलकडे लक्ष न देता बँकिंग परीघ हा अधिकाधिक विस्तृत आणि सशक्त होण्याची गरज आहे.

अलीकडेच रिझर्व बँकेने नवीन बँका आणि छोट्या व पेमेंट बँका निर्माण करण्यासाठी 'हिरवा कंदील' दिलेला आहे. अवाढव्य ग्रामीण जाळे असलेले पोस्ट ऑफिस 'बँक' म्हणून काम करण्यास उत्सुक आहे. पुढल्या दशकात जाण्यासाठी आपले बँकिंग क्षेत्र सज्ज आहे, मात्र खरी कसोटी आहे ती वास्तव कामगिरी करून दाखवण्याची आणि बँकिंगच्या साहाय्याने एकूण अर्थव्यवस्थेचा आलेख उंचावण्याची!

**– राजीव जोशी**
बँकिंग अभ्यासक प्रशिक्षक
भ्रमणध्वनी : ९३२४३७२३४८
rmjoshi52@yahoo.co.in

# नागरी सहकारी बँकांचे आधुनिकीकरण की खाजगीकरण?

## उर्वशी धराधर



बँकिंग क्षेत्र हे सेवा व्यवसायात येते. ग्राहक हा या सेवेचा केंद्रबिंदू आहे. आपण बँकांची बोधवाक्ये ही ग्राहकसेवेशी निगडित असलेली पाहतो. ग्राहकसेवेला त्यात प्राधान्य दिलेले असते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रापासून बँकिंग सुरू आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९' आला. बँकिंग क्षेत्राचे कामकाज योग्यरीत्या चालण्याची दखल त्यात घेतली आहे. १९६९ मध्ये चौदा बँकाचे राष्ट्रीयीकरण झाले, पण त्यानंतरच्या काही काळात बँकिंग क्षेत्रात विशेष क्रांती झाली नाही. कुठल्याही व्यवसायात जेव्हा स्पर्धा असते तेव्हा त्यात नक्कीच नवनवीन आव्हाने येतात व या आव्हानांना सामोरे जाणे, नित्यनवीन योजना आखणे, आपणच इतरांहून श्रेष्ठ आहोत हे प्रस्थापित करणे यात खरी चुरस असते. ही चढाओढ, स्पर्धा नेहमी प्रगती व सुधारणा घडवून आणते. राष्ट्रीयीकरणानंतरची सुरुवातीची काही वर्षे सोडली तर १९८० ते ९० या काळात बँकिंग क्षेत्रात विशेष बदल अथवा सुविधा आल्या नाहीत. एकूण ठरलेले व्यवहार बँका चालवत होत्या, पण त्यात चढाओढ नव्हती. कोणालाही वाटे की बँकेत नोकरी म्हणजे आराम आहे, पण हे चित्र लवकरच पालटले. ज्यावेळी १९९३ मध्ये दहा नवीन प्रायव्हेट बँकांनी पदार्पण केले तेव्हा तंत्रज्ञानाची उत्कृष्ट साथ या बँकांना मिळाली. मरगळलेल्या पूर्वस्थित बँकांना आपल्याला स्पर्धक आला, आता आपला टिकाव लागण्यासाठी आपण हातपाय हलवले पाहिजेत व आपली बँक कशी श्रेष्ठ आहे हे प्रस्थापित केले पाहिजे याची जाणीव झाली.

पूर्वीच्या बँकांमध्ये तंत्रज्ञानाचा अभाव होता. आता आपणास प्रायव्हेट बँकांच्या बरोबरीने काम करायचे असेल तर तंत्रज्ञानाचा पुरेपूर लाभ ग्राहकाला देता आला पाहिजे हे समजल्यामुळे बँकिंग क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले. या पूर्वीच्या बँकांनी तंत्रज्ञानाद्वारे आपले व्यवहार योग्य ते सॉफ्टवेअर व हार्डवेअर घेऊन सुधारले. 'Any branch banking' हे तत्त्व अमलात आले.

त्याचप्रमाणे परदेशस्थित बँकांना त्यांचे व्यवहार भारतात करण्याची परवानगी मिळाली व खऱ्या अर्थाने बँकिंग क्षेत्र विकसित होऊ लागले. त्याच वेळी, छोट्या ग्राहकांची काळजी घेणाऱ्या नागरी सहकारी बँका गेल्या शंभर वर्षांपासून अस्तित्वात आहेत. ग्रामीण बँका ह्या खेडोपाड्यातील जनतेला बँकिंग सेवा देण्याचे काम आज कित्येक वर्षे करत आहेत. या लोकांना आपली ग्रामीण बँक ही जिव्हाळ्याची बँक वाटते.

बँकिंग तंत्रज्ञान जसजसे विकसित होत गेले व बँकांच्या शाखा तंत्रज्ञानाने जोडल्या गेल्या तेव्हा बँकांची अधिपती 'रिझर्व्ह बँक' यांनी सर्व बँकिंग सेवा ही तंत्रज्ञानाने युक्त व एकत्रित जोडल्या जाण्याकडे आपली पावले उचलली. तेव्हा नागरी सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका व परदेशस्थित बँकांच्या शाखा या सर्व ग्राहकाला आकर्षित करून आपला व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी खूपच प्रयत्नशील झाल्या.

पूर्वी नागरी सहकारी बँकांना ठेवींवर राष्ट्रीयीकृत बँकांहून १ टक्का अधिक व्याज देण्याची परवानगी होती तेव्हा या बँकांना भरपूर ठेवी मिळत होत्या. पण जेव्हा जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) व उदारीकरण (लिबरलायझेशन) आले तेव्हा कर्ज आणि मुदत ठेवींवरील व्याजदर ठरवण्याचे अधिकार बँकांना प्राप्त झाले. बँकांचे व्यवहार खूप पारदर्शक झाले. ग्राहकवर्गही जास्त जागरूक झाला. ज्यावेळी काही नागरी सहकारी बँका त्यांच्या बँकिंग गैरव्यवहारामुळे बंद करण्यात आल्या तेव्हा ग्राहकदेखील आपल्या पैशांची गुंतवणूक जागरुकतेने करू लागला. बँकांमधील स्पर्धा अधिक प्रकर्षाने झाली. आपला टिकाव जर स्पर्धेत लागायचा असेल तर आपणास इतर बँकांसारखी किंबहुना त्याहून जास्त चांगली सेवा दिलीच पाहिजे हे सर्वांनी जाणले.

नागरी सहकारी बँकांना, विशेषत: ज्या तंत्रज्ञान सुविधांनी सुसज्ज आहेत, ऑडिट दर्जा उत्तम आहे, शाखाविस्तार व एकूण व्यवसायवाढ चांगली आहे व सतत प्रगतिपथावर आहेत, त्यांची बुडित कर्जे फार कमी आहेत, अशांना या बँकिंग स्पर्धेत खाजगी बँका, परदेशी बँका, राष्ट्रीयीकृत बँका यांच्याबरोबर खरी स्पर्धा करावी लागत आहेत. त्या बँका इतर तऱ्हेच्या बँकांप्रमाणे सर्व सुविधा देतात व त्या खऱ्या अर्थाने सेवेसाठी 'सहकारी' (को-ऑपरेटिव्ह) आहेत.

परंतु आज त्यांच्यावर असलेले रिझर्व्ह बँकेचे नियम व अटी या राष्ट्रीयीकृत व इतर बँकांप्रमाणे नसून, नागरी सहकारी बँकांसाठी हात थोडासा आखडताच घेतला जातो. बँका ह्या लोकांच्या ठेवीवर, विश्वासावर आधारित आहेत. तेव्हा ज्यावेळी एखादी छोटी नागरी सहकारी बँक त्यातील गैरव्यवहारामुळे अडचणीत येते व त्या बँकेचा परवाना रद्द होतो तेव्हा बिचाऱ्या ग्राहकवर्गाच्या तोंडचे पाणी पळते.



उत्कृष्ट दर्जाच्या मोठ्या नागरी सहकारी बँकांनी या बुडित बँका घेऊन त्यांच्या ठेवीदारांना दिलासा दिल्याचे आपण पाहतो. ठेवीदारांना आपले पैसे सुरक्षित आहेत याची खात्री वाटणे खूप महत्त्वाचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात जेव्हा अशा उत्कृष्ट नागरी सहकारी बँका इतर राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, परदेशस्थित बँकांबरोबर आपला व्यवसाय वाढवण्याचा आटोकाट प्रयत्न करतात, तेव्हा त्यांच्यासाठी असलेले निर्बंध हे या इतर बँकांप्रमाणे नसून थोडे जास्त असल्यामुळे त्यांचा व्यवसायवाढीवर परिणाम निश्चितच होतो. त्यामुळे प्रश्न येतो की या बँकांनी आता खाजगी बँकांत आपले रूपांतर करण्याची गरज आहे काय? रिझर्व्ह बँकेला काही नागरी सहकारी बँकांमुळे सर्वांना सरसकट नियम सारखे ठेवावे लागतात. पण हे कितपत योग्य आहे?
याचा विचार व्हायला हवा.

आपल्या ठेवी काढण्यासाठी त्यांचा कोण आटापिटा चालतो.

उत्कृष्ट दर्जाच्या मोठ्या नागरी सहकारी बँकांनी या बुडित बँका घेऊन त्यांच्या ठेवीदारांना दिलासा दिल्याचे आपण पाहतो. ठेवीदारांना आपले पैसे सुरक्षित आहेत याची खात्री वाटणे खूप महत्त्वाचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात जेव्हा अशा उत्कृष्ट नागरी सहकारी बँका इतर राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, परदेशस्थित बँकांबरोबर आपला व्यवसाय वाढवण्याचा आटोकाट प्रयत्न करतात, तेव्हा त्यांच्यासाठी असलेले निर्बंध हे या इतर बँकांप्रमाणे नसून थोडे जास्त असल्यामुळे त्यांचा व्यवसायवाढीवर परिणाम निश्चितच होतो. त्यामुळे प्रश्न येतो की या बँकांनी आता खाजगी बँकांत आपले रूपांतर करण्याची गरज आहे काय? रिझर्व्ह बँकेला काही नागरी सहकारी बँकांमुळे सर्वांना सरसकट नियम सारखे ठेवावे लागतात. पण हे कितपत योग्य आहे? याचा विचार व्हायला हवा.

नागरी सहकारी बँकांच्या खाजगीकरणानेच जर हा प्रश्न सुटणार असेल तर खाजगीकरण ही आवश्यक बाब बनेल. आज नागरी सहकारी बँका एक कोटीपर्यंत कर्ज हे कोलॅटरल सिक्युरिटी घेतल्याखेरीज देऊ शकत नाहीत. खाजगी व राष्ट्रीयीकृत बँकांना ही अट नाही. तेव्हा स्पर्धेच्या युगात ही सवलत नसल्यामुळे एक कोटीपर्यंत सुलभतेने कर्जदार मिळवणे फार मोठे आव्हान असते. नागरी सहकारी बँकांना कर्जदाराला प्रथम आपले सभासद करावे लागते. त्यामुळे कर्ज घेण्याअगोदरच बँकेच्या शेअर (भाग) साठी अर्ज करावा लागतो, तेव्हा ही अट राष्ट्रीयीकृत अथवा खाजगी बँकांना नसते. घरासाठी कर्जाची मर्यादादेखील नागरी सहकारी बँकांना सत्तर लाखांपर्यंतच आहे जी अट राष्ट्रीयीकृत अथवा खाजगी बँकांना नाही. त्यामुळे चांगल्या घरासाठीचे मोठ्या रकमेचे कर्ज नागरी सहकारी बँका देऊ शकत नाहीत. अशा कित्येक नियमांमुळे व्यवसायाची वृद्धी करण्याची स्पर्धा फार जाचक होते. पण जर उत्कृष्ट दर्जाच्या नागरी सहकारी बँकांना खाजगी बँकांचे काम करण्याचा परवाना मिळाला तर हे निर्बंध राहणार नाहीत.

आता आपण पाहतो की पेमेंट बँक स्थापन करण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडे मोबाईल, पोस्ट पेमेंट सोल्युशन्स, रिटेल चेन चालवणारे, पतसंस्था अशा ४१ कंपन्या-संस्थांनी अर्ज केले आहेत. याचे एकमेव कारण म्हणजे मोबाईल कंपन्यांचे नेटवर्क वितरक खेड्या-पाड्यापर्यंत पोचले असल्याने त्या पेमेंट बँकांचा विस्तार करू शकतील याची त्यांना खात्री वाटते. तद्वत, रिटेल चेनमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात उलाढाली होत असतात. त्यामुळे या कंपन्यांना अधिकाधिक ग्राहक जोडून पेमेंट बँकेच्या माध्यमातून पैसा खेळता ठेवता येईल. तसेच, पेमेंट सोल्युएशन कंपन्यांकडे मोबाईल वॉलेटच्या सुविधेमुळे तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आधीपासूनच आहे. त्यामुळे पेमेंट बँकेचे कामकाज ते चांगले करू शकतात. शिवाय बड्या कंपन्यांच्या मोबाईल व रिटेल क्षेत्रात उपकंपन्या आहेत. खरेदी-विक्रीचे व्यवहार कित्येक कर्मचाऱ्यांचे पगार, भागधारकांचे भाग-डिव्हिडंड हे सर्व व्यवहार त्यांना पेमेंट परवाना मिळाला तर सहज करता येतील.

तेव्हा यापुढे जर पेमेंट बँका अस्तित्वात आल्या तर बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा अधिकाधिक वाढेल. मग उत्कृष्ट सेवा, तत्परता, योग्य मार्गदर्शन व सुरक्षा हे निकष पाळणाऱ्या बँकांचाच त्यात टिकाव लागू शकेल. या बँकांसाठी भारतीय बँकिंग कोड व मानक बोर्ड (Banking Codes & Standards Board of India) ही 'ग्राहकांप्रती बँकेच्या जबाबदारीची संहिता'नामक एक इच्छानुवर्ती संहिता तयार करण्यात आली आणि ती भारतीय रिझर्व्ह बँकेकडून १ जुलै २००७ पासून लागू करण्यात आली आहे. ह्या कोडमध्ये काही किमान प्रमाणक निश्चित करण्यात आले आहेत आणि व्यक्तिगत ग्राहकांबरोबर बँकिंग व्यवहार करताना बँकांनी त्यांचे योग्य पालन करण्याची आवश्यकता आहे. ह्या संहितेमुळे ग्राहकांना सुरक्षितता मिळते आणि बँकांच्या व्यवहारांबाबत अधिक पारदर्शकता राखली जाते.

एकंदरीत बँकिंग व्यवसाय हा ग्राहक हिताय, ग्राहक सुखाय करण्याचा प्रयत्न आज सर्व बँका करत आहेत. कोअर बँकिंग, इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून जग आता खूपच जवळ आले आहे. या सर्व व्यवहारांची नीट माहिती ग्राहकाला बँका करून देत आहेत. तेव्हा ग्राहकांनो याचा फायदा घ्या!

**– उर्वशी आनंद धराधर**
जनरल मॅनेजर मार्केटिंग, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
भ्रमणध्वनी : ९८२०५०६०६३
ua.dharadhar@gmail.com

# सहकारी पतसंस्था आणि ग्रामीण अर्थकारण



**माधव प्रभुणे**

भारत एक कृषिप्रधान देश आहे. देशाच्या एकूण १३५ कोटी लोकसंख्येच्या ६० टक्के म्हणजे ८० कोटी लोक ग्रामीण भागात राहतात. त्यात मोठे शेतकरी, लहान शेतकरी व अल्पभूधारी शेतकरी असे वर्गीकरण त्यांच्या भूधारणांनुसार केले जाते. याशिवाय, शेतमजूर, कुटीरोद्योगातील कुशल व अकुशल कारागीर यांचा समावेश होतो. यापैकी, मोठ्या संख्येने लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठत आहेत. अशा सर्व लोकांच्या आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत संस्थात्मक अशी कार्ययंत्रणा अस्तित्वात नव्हती. दुष्काळ व रोगराईमुळे लोकांना अवास्तव व्याजदरांनी खाजगी सावकारांकडून कर्जे काढावी लागत असत. सावकारांच्या पाशातून मुक्त होण्यासाठी लोक एकत्र येऊन सहकार तत्त्वावर आधारित पतसंस्था स्थापन होण्यास सुरुवात झाली.

ग्रामीण क्षेत्रातील लोकांना बचतीची सवय लागून संकलित केलेल्या ठेवी त्याच क्षेत्रातील गरजूंना माफक व्याजदराने कर्जरूपाने देणे, ग्रामीण क्षेत्रात रोजगार निर्माण करणे, उत्पादकता वाढवणे व तळागाळातील गरीब लोकांना सामाजिक-आर्थिक न्याय मिळवून देणे या उदात्त हेतूने तत्कालीन सरकारने देशातील पहिला सहकारी कायदा सन १९०४ साली संमत केला. यानुसार, हिंदुस्थान सहकारी कृषी पतपुरवठा संस्था व पहिली शेतकी सहकारी पेढी कंगिनहल, जिल्हा धारवाड येथे स्थापन झाल्या. येथूनच सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. सन १९१२ साली सदर कायद्यामध्ये अनेक सुधारणा करून त्यांची व्याप्ती वाढवली गेली. यामुळे, नागरी क्षेत्रातसुध्दा बिगरशेती पतसंस्था मोठ्याप्रमाणावर स्थापन होऊ लागल्या व आज त्यांची संख्या १७००० च्या वर असून एकूण ठेवी २०००० कोटी रुपयांवर आणि कर्जे १५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत. सहकाराला पर्याय नाही हे सरकारने जाणले व आर्थिक योजनेत सहकाराचा अंतर्भाव करण्यात आला.

रिझर्व्ह बँकेची स्थापना सन १९३४ मध्ये झाल्यावर कृषीऋण विभाग व सहकारी संस्थांना पुनर्वित्त कर्ज पुरवठा सुरू केला. सन १९५२ मध्ये अखिल भारतीय ऋण सर्वेक्षण करून एकात्मिक ग्रामीण विकासासाठी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र वाढवणे, ठेव संकलनास उत्तेजन देणे, त्यांच्या कार्यात विविधता आणणे व जरूर त्या संस्थांना भागभांडवल पुरवणे अशा शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली. सन १९६९ साली १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्याने त्यांच्या शाखा मोठ्या संख्येने ग्रामीण क्षेत्रात उघडल्या गेल्या. लीड बँक योजना, क्षेत्रीय ग्रामीण बँकांची निर्मिती, सर्व्हिस एरिया संकल्पनेत खेडी दत्तक घेण्याची योजना, शेतकऱ्यांच्या सहकारी सेवा संस्थांची स्थापना इत्यादी योजना सुरू झाल्या.

सन १९८२ मध्ये ग्रामीण क्षेत्रास वित्तपुरवठा व निरीक्षणासाठी नाबार्ड बँक सुरू करण्यात आली. सन १९९० नंतर ग्रामीण पतसंस्थांचे पुनरूज्जीवन व आर्थिक सक्षमतेसाठी ए. वैद्यनाथन (२०००), कपूर (१९९९), व्यास (२००१), विखेपाटील (२००१), खुशरो (१९८९) इत्यादी समित्या स्थापण्यात आल्या व त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू झाली.

**सहकारी संस्थांपुढील समस्या**

१. उत्तम सुशासनाचा (गुड गव्हर्नंन्स) अभाव

संचालक मंडळावरील सदस्यांना बँकींगचे ज्ञान व अनुभव नाही. त्यामुळे, कर्जमंजुरी व वाटप हे कर्जदाराच्या गरजेपेक्षा जास्त दिले जाते. फक्त तारणांचा विचार होतो, परतफेड क्षमतेचा नाही. सरकारी कायद्यांतील तरतुदींबाबत ते अनभिज्ञ असतात. व्यावसायिक व प्रभावी नेतृत्वाचा फायदा संस्थांना मिळत नाही. थकित कर्जांच्या वसुलीबाबत अनास्था व हस्तक्षेप होत असतो. राजकीय पुढारी काही मंडळांवर पूर्ण ताबा ठेवतात. त्यामुळे लोकशाही पद्धतीने कारभार चालत नाही. मनमानी कार्यपद्धतीमुळे संस्थेच्या हिताला बाधा निर्माण होते. लेखापरीक्षणातील दोषांची दुरुस्ती केली जात नाही, कर्ज व ठेवींवरील व्याजदर ठरवण्याची शास्त्रशुद्ध माहिती नाही. संस्थेच्या स्वनिधीत त्यामुळे घट होते व लेखापरीक्षणाचा दर्जा 'क' किंवा 'ड' होतो. महत्त्वाचे म्हणजे, अनेक वेळा संचालक मंडळ बरखास्त होणे व प्रशासकाची नेमणूक हे नित्याचे असते. उदाहरणार्थ, राज्य सहकारी बँकांच्या ३० पैकी ९ तर जिल्हा मध्यवर्ती बँकेंच्या ३६८ पैकी १३४ बँकांची मंडळे वेळोवेळी बरखास्त करण्यात आली होती. एका प्रकरणात शेतकऱ्यांनी ०.५०% व्याजदराने सोने गहाण ठेवून सहकारी

**ग्रामीण सहकारी संस्थांचे योगदान**

ग्रामीण सहकारी कृषी बँक संरचना (मार्च २०१४ अखेर)

| तपशील | राज्य सहकारी बँका | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | प्राथमिक कृषी पत सहकारी संस्था | राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँका | प्राथमिक सहकारी ग्रामीण विकास बँका |
|---|---|---|---|---|---|
| कर्जप्रकार | अल्पमुदत | अल्पमुदत | अल्पमुदत | दीर्घमुदत | दीर्घमुदत |
| एकूण संख्या | ३२ | ३७२ | ९१८३३ | २३ | ७१४ |
| शाखा | १०८१ | १३६५६ | | ७७४ | ९५३ |
| वित्तपुरवठा | ८९९६१३४ कोटी रु. | १७१५१२७९ कोटी रु. | १२८५०६०५० कोटी रु. | १४७३७ कोटी रु. | १०७३०० कोटी |
| थकित प्रमाण | ६.०१% | २१.८८% | १८.२२% | ३६% | ३७.०१% |
| एकूण सभासद | ३३९८९६ | ३९१५४१७ | १३९१२३००० | – | १२ कोटी ६० लाख |
| एकूण राखीव निधी | १०४७२.७० कोटी रु. | २४७०४.४८ कोटी रु. | १३९२६.६६ कोटी रु. | – | – |
| एकूण ठेवी | ८९९०५१३ कोटी रु. | १९५७२६४३ कोटी रु. | ६२८७४१७ कोटी | ११२५ कोटी रु. | १९३० लाख |
| भागभांडवल | १३११९७० कोटी रु. | ८९४१०९ रु. | ७८९५७९ कोटी रु. | – | – |
| सेवक /कर्मचारी | १२०२७ | १२०२७ | १५९५०१ | ६३५३ | ८३६० (डेप्युटेशन वरून) |
| | आस्तींच्या दर्जात सुधारणा, नफ्यात वाढ | नफ्यात घट, ताळेबंदात घट, आस्तींच्या दर्जात सुधारणा (तरतुदी करूनही) | मागासवर्गीय जाती/जमाती सभासदांत वाढ झाली. प्रगती समाधानकारक होती. | ताळेबंदपत्रकाची सतत घसरण चालूच आहे. | स्वनिधीत वाढ, बाह्य कर्जात घट, ४१% संस्था तोट्यात (विशेषत: देशाच्या पूर्व भागातील) |

सन २००७–०८ मध्ये सहकारी पतसंस्थाच्या कर्जवितरणात घट झाली, परंतु लघु व मध्यम मुदतीच्या कृषी वित्तपुरवठ्यात त्या अग्रेसर राहिल्या हे पुढील सांख्यिकी माहिती २०१३–२०१४ नुसार स्पष्ट होते. (रुपये कोटीत)

सहकारी संस्था : ८७,९६३ (एकूण वाटा १७%),
ग्रामीण विकास बँका : ५४,४५० (११%),
सहकारी बँका : ३,६८,६१६ (७२%).
७ लाख कोटी रुपये

बँकांकडून कर्ज घेतले होते. एका खाजगी सावकारी फर्मकडे ते सोने परत गहाण ठेवून पैसे काढले. जेव्हा शेतकरी पैसे भरून सोने सोडवायला आला तर त्यास सदरच्या बँकेने १४% व्याज भरण्यास फर्मावले. शेवटी उच्च न्यायालयाकडून या प्रकरणी लिलाव थांबवण्यात आला. जिल्हाधिकारी व निबंधकांनीही काही दखल घेतली नाही.

२. कुशल सेवकांचा अभाव

प्रत्येक संस्थेचे यश हे त्या संस्थेतील सेवकांच्या कार्यनिपुणतेवरून ठरते. संस्थेत अशा पात्र लोकांचा अभाव आहे. जे कार्यकुशल सेवक आहेत त्यांना पदोन्नती नाही, वेतनात वाढ नाही. सबब, ते संस्था सोडून जातात. जास्त वयाच्या लोकांची भरतीही केली जाते. सेवकांना प्रशिक्षण नाही. यामुळे सेवकांत असुरक्षेची भावना असते. या सर्वांचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होऊन व्यवसायवृद्धी होत नाही.

३. कर्जवसुली व कर्जमाफी

संचालक निवडणुकीत पुन्हा निवडून येण्यासाठी संचालक कर्जवसुलीत हस्तक्षेप करत असतात. कर्जमाफीमुळे कर्जवसुली होत नाही. यामुळे, ढोबळ एन.पी.ए.चे प्रमाण वरच्या स्तरावर राहते. व्याज न मिळाल्यामुळे व तरतुदींमुळे संस्थेची नफाक्षमता व पर्यायाने स्वनिधी कमी होतो. यासाठी संचालकांचे उत्तरदायित्व नाही.

४. कार्यप्रणालीतील त्रुटी

संस्थांच्या विविध खाती, पुस्तके यांमध्ये जुळवणी बऱ्याच काळापासून प्रलंबित राहिल्याने त्यात घोटाळेही असू शकतात. जी प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत त्यात विलंब व खर्च होतो. जवळजवळ १५% संस्थांचे लेखापरीक्षण एक वर्षांहून अधिक काळ झालेले नाही.

५. विपणनाचा अभाव

नवनवीन सेवांची निर्मिती, त्यांचे दर, संस्थेची जागा, कार्यप्रणाली, कुशल सेवक, सेवांचा प्रचार-प्रसार, ग्राहकसेवा व अद्ययावत तंत्रज्ञान इत्यादींच्या अभावामुळे उद्दिष्टे गाठण्यात अडचणी येतात व त्यामुळे बाजारातील वाढत्या स्पर्धेत तोंड देण्याची क्षमता नाही.

६. दुहेरी नियंत्रण

'सहकार' हा राज्याच्या अखत्यारीतील विषय असल्याने संस्थांना राज्याच्या सहकार कायद्यात, संस्था नोंदणी, त्यांच्या निवडणुका व लेखापरीक्षण याबाबतच्या तरतुदींची अंमलबजावणी करावी लागते. बँकिंगचे कार्य हे रिझर्व्ह बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व बँकिंग रेग्युलेशन कायद्यान्वये पार पाडावे लागते. अशा दुहेरी नियंत्रणात सुसूत्रता व त्यांच्या कार्यात स्पष्टता आणण्याची आज गरज आहे. विविध समित्यांनीही दुहेरी नियंत्रण संपवण्याच्या शिफारशी केल्या आहेत.

७. सहकारी पतसंस्थांचे पुनरुज्जीवन करण्याची गरज

देशाच्या एकूण १३० कोटी लोकसंख्येपैकी जवळजवळ ९० कोटी लोक सहा लाख खेडेगावांत राहतात. त्यांच्या आर्थिक सेवांची गरज ९२,००० प्राथमिक सहकारी पतसंस्था भागवत आहेत. सहकाराचे हे व्याप्त क्षेत्र महत्त्वाचे असल्याने लघु व मध्यम मुदतीची कर्जे देणाऱ्या संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ करण्याच्या उद्देशाने त्यांच्या भांडवलासाठी केंद्र सरकारने ९,००२ कोटी रुपये व राज्य सरकारने ८५६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा ५३,२०२ संस्थांना केला असून यासाठी २५ राज्य सरकारांनी एक समझोता करारही नाबार्डशी केला आहे. भांडवल पर्याप्तप्रमाण ७% या बँकांना ३१.०३.२०१५ अखेर गाठायचे आहे. यासाठी दीर्घमुदतीच्या ठेवीसुद्धा भांडवल पर्याप्त प्रमाणासाठी धरल्या जाणार आहेत. भांडवलासाठी राज्य सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांना कमी व्याजाने सरकारने वित्तपुरवठा करावा अशी मागणी आहे. राज्य व जिल्हा बँकांवर कारवाईचे अधिकार रिझर्व्ह बँकेला आता बँकिंग रेग्युलेशन कायदा, १९४९ मध्ये दुरुस्ती करून देण्यात आले आहेत.

८. ग्रामीण बँकांना परवाना देणे

आर्थिक स्थैर्य मिळवणे व ते राखण्याच्या उद्देशाने एकूण ३१ पैकी १७ सहकारी बँकांना व ३७१ पैकी २९६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना परवाना देण्याचे निकष पुढीलप्रमाणे शिथिल करण्यात आले आहेत.

अ. भांडवल पर्याप्त प्रमाण कमीत कमी ४%

ब. गेल्या आर्थिक वर्षात रोखता प्रमाण व वैधानिक तरलता प्रमाण राखण्याची पूर्तता

३१ मार्च, २०१२ अखेर सर्व राज्य सहकारी बँकांना व ३७१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी ३४८ बँकांना परवाने देण्यात आले आहेत.



देशाच्या एकूण १३० कोटी लोकसंख्येपैकी ९० कोटी लोक सहा लाख खेडेगावात राहतात. त्यांच्या आर्थिक सेवांची गरज ९२००० प्राथमिक सहकारी पतसंस्था भागवित आहेत. सहकाराचे हे व्याप्त क्षेत्र महत्त्वाचे असल्याने या सहकारी पतसंस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न नियोजनपूर्वक होणे गरजेचे आहे.

**इतर धोरणे**

रिझर्व्ह बँकेने वरील बँकांना आर.टी.जी.एस./ ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब या बँकांनी सुरू केला असून ३१.०३.२०१४ अखेर एकूण ३२ राज्य सहकारी बँकांपैकी २८ व ३७१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी २९४ बँकांनी सी.बी.एस.ची पूर्तता केली आहे.

**क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनी सदस्यत्व**

सर्व बँकांना अशा संस्थांचे सभासदत्व घेणे आता सक्तीचे करण्यात आले असून कर्जदारांना कर्ज मंजूर करण्यापूर्वी त्याच्या आर्थिक व्यवहारांचा पूर्वेतिहास वरील संस्थेकडून मिळतो. त्यामुळे एकाच वेळी अनेक कर्जदारांची संस्थांकडून कर्जे उचलण्याची सवय आता संपुष्टात येऊन

थकबाकीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल व कर्जाचा दर्जाही सुधारेल.

**९७ वी घटनादुरुस्ती व सहकारी कायद्यातील सुधारणा**

१. संचालक समितीवर ज्यांना वित्तीय संस्थांतील व्यवस्थापनाचा अनुभव, सहकाराची ध्येये, उद्दिष्टे व कार्यामध्ये विशेषज्ञता आहे अशा दोन तज्ज्ञांची नेमणूक करावी लागेल.

२. क्रियाशील सभासदाची व्याख्या करण्यात येऊन त्यानुसार जो संस्थेत ठेव ठेवतो वा कर्ज काढून संस्थेच्या कार्यात भाग घेतो, त्यांच्या सेवासाधनांच्या किमान मर्यादेचा वापर करून संस्थेच्या वार्षिक सभेत ५ वर्षांत एकदा तरी उपस्थित राहतो अशाच सभासदास मतदानाचा अधिकार असेल व तो संचालक निवडणुकीसाठी पात्र ठरेल. एका सभासदास एकच मत असेल. दोन महिला, अनुसूचित जातीजमाती, इतर मागासवर्गीय व भटक्या-विमुक्त जाती-जमाती व विशेष मागासवर्गीयांसाठी प्रत्येकी एक जागा राखीव करण्यात आल्या आहेत.

३. पतसंस्थांच्या संचालक समितीचा आकार कमीतकमी १७ व जास्तीत जास्त २१ सदस्यांपर्यंत मर्यादित करण्यात आला आहे.

४. कुठल्याही सहकारी संस्थेच्या ९० दिवसांहून अधिक थकबाकीदार सभासदास मतदानाचा अधिकार नाही.

५. एकाच वेळेस एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांत संचालक म्हणून काम करता येणार नाही.

६. प्रत्येक संस्थेस सभासद, संचालक व सर्व सेवकांच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी निधीची तरतूद करावी लागेल.

७. संस्थेने निधीची गुंतवणूक ज्या बँकांचे लेखापरीक्षण वर्ग गेले सतत ३ वर्षे 'अ' आहे अशाच राज्य सहकारी/जिल्हा मध्यवर्ती बँकांत करता येईल.

८. संस्थांना सरकारमान्य यादीतूनच लेखापरीक्षकांची निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे, परंतु त्यांच्या फीमध्ये तडजोड करता येणार नाही.

**आर्थिक सर्वसमावेशक योजना**

नॅशनल सॅम्पल सर्वे २०००-०३ नुसार, ५१% शेतकरी संस्थांकडून कर्ज घेत नाहीत, मूलभूत बँकिंग सेवांपासून ते वंचित आहेत. प्रत्येक गावाच्या ४०% लोकांना बँकिंग सुविधा उपलब्ध नाहीत. या समस्या सोडवण्यासाठी,

आधार कार्डच्या मदतीने युनिक आयडेंटीटी नंबर सर्वांना देण्यात येत आहेत. यामुळे 'आपल्या ग्राहकांना ओळखा' (KYC) ची पूर्तता केली जाईल व संस्थांना नि:बँकिंग क्षेत्रापर्यंत पोचणे सहज शक्य होईल. तसेच, ग्राहकांनाही आपले खाते चालवता येईल.

केंद्र सरकारच्या सामाजिक सुरक्षा अंतर्गत सर्व आर्थिक लाभ (सबसिडीज) ग्राहकांच्या परस्पर खात्यात जमा होईल. त्यांना रूपे डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, खात्यांवर उचल देता येईल व जनरल विमा संरक्षण रुपये १ लाखांपर्यंत उपलब्ध होईल.

बँकांना त्यांच्या ३-४ किलोमीटर परिसरातील निवृत्त बँक कर्मचारी, शिक्षक, सरकारी नोकर, माजी सैनिक, किराणा दुकानांचे मालक/रेशन दुकानदार, पब्लिक कॉल ऑफिस ऑपरेटर, पोस्ट व विमा व्यवहार करणारे एजंट, स्वयंमदत समूह (SHG), पेट्रोल पंपाचे मालक आदी उद्योग प्रतिनिधी (बिझनेस करस्पाँन्डट) यांच्यामार्फत मर्यादित बँकिंग सेवा देता येतील. आर्थिक क्षेत्रापासून वंचित असलेल्या लोकांपर्यंत पोचण्यासाठी ए.टी.एम. माध्यमही प्रभावी ठरेल.

सभासदांच्या, सभासदांनी, सभासदांसाठी चालवलेल्या सहकारी संस्थांनी आपल्या उत्पन्नात वृद्धी, ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्यनिर्मूलन व ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करण्याचे कार्य हे राज्य व केंद्र सरकारने मान्य केले आहे. सर्व सहकारी संस्थांनी त्यांच्यापुढील वर नमूद केलेल्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. सुशासक व सामाजिक दायित्व त्यांनी यापुढेही निभावयाचे आहे. यासाठी सर्वंकष सुधारणा त्यांच्या कार्यात करून एक आर्थिकदृष्ट्या सक्षम व उत्कृष्ट व्यवस्थापनाने चालवलेल्या संस्था म्हणून नावलौकिक मिळवावा जेणेकरून जनसामान्यांच्या विश्वासास ते पात्र ठरतील व स्वत:चे अस्तित्त्वही राखता येईल. संस्था या जन्मत:च घडलेल्या नसतात, त्या घडवल्या जातात. (Societies are not born but are made).

**– माधव प्रभुणे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि मालाड सहकारी बँक लिमिटेड
भ्रमणध्वनी : ९९२००७०६६२
madhav_prabhune@rediffmail.com

### आपण गरीबच का राहतो ?

- क्रेडिट/डेबिट कार्डचा अनावश्यक वापर
- भावनेच्या भरातील खरेदी
- मित्र सहकारी, सहयोगी यांचा अनावश्यक प्रभाव
- सिगरेट, तंबाखू, दारू, तसेच अनावश्यक पर्यटनाच्या आहारी जाणे.
- चित्रपट, मॉल, बोलींगसारख्या खेळांच्या नादी लागणे.
- नसलेल्या गोष्टी – वस्तू दाखवण्याची वृत्ती
- करीयर, बचत, सेवानिवृत्ती आणि इतर खर्चांचे नियोजन नसणे.
- अजून एक कर्ज घ्यायला हरकत नाही 'अशी प्रवृत्ती.
- महागड्या मोबाईल्स आणि गॅजेट्सची अनावश्यक खरेदी.

# महिला शक्ती

## शामानंद सुखी



ग्रॅज्युएशन आणि बिझिनेस मॅनेजमेंट पूर्ण करता करता १९७२ साली माझी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या आर्थिक विभागाच्या, राष्ट्रीय बचत संघटना या खात्यात डिस्ट्रिक्ट ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली. आयुष्याची सुरुवात सरकारी अधिकारी म्हणून करत असल्यामुळे घरचे आम्ही सगळे खूश होतो.

आमच्या पहिल्या प्रशिक्षणात आम्हाला सांगण्यात आले की हा विभाग लोकांपर्यंत पोचून, त्यांना बचतीचे महत्त्व पटवून देणे, बचतीची सवय लावणे, उच्च आर्थिक स्तरांतील लोकांना भारत सरकारच्या बचत योजना समजावून त्यांना यामध्ये गुंतवणूक करण्याकरता प्रेरित करण्याचे काम करतो.

अशा या गुंतवणूकदारांसाठी भारत सरकारच्या विविध बचत योजना, पोस्ट ऑफिसे आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या द्वारे कार्यान्वित केल्या जातात. यासाठी हा विभाग विविध एजंटांची नेमणूक करतो. हे एजंट गुंतवणूकदारांच्या घरी जाऊन, त्यांना गुंतवणूक करायला राजी करून, बचतीची किंवा गुंतवणुकीची रक्कम गोळा करून, ती पोस्ट ऑफिस किंवा राष्ट्रीयकृत बँकेत जमा करतात.

अशा या एजंटांनी जमा केलेल्या रकमांच्या व्यवहारांवर लक्ष ठेवणे, पोस्ट ऑफिस आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या या बचत योजनांच्या व्यवहारांवर देखरेख करणे, या योजना सुरळीत कार्यान्वित करणे आणि या योजनांचा प्रचार करणे ही जबाबदारी या विभागाच्या अधिकाऱ्यांवर सोपवली गेली आहे.

राष्ट्रीय बचत संघटनेमध्ये डिस्ट्रिक्ट ऑफिसर ते रिजनल डायरेक्टर या कार्यकाळात गुंतवणूकदार एजंट, पोस्ट ऑफिसे आणि राष्ट्रीयकृत बँकांमध्ये सुसूत्रता साधण्याचे काम करता करता आम्ही अधिकारी एक सामाजिक जबाबदारीही पेलत होतो याची जाणीव पदोपदी होत होती.

आमच्या विभागासाठी जवळजवळ ५ लाख एजंट काम करतात. हे एजंट ३ गटांत विभागले आहेत– १. पब्लिक प्रॉव्हिडंट फंड, २. महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजना; ज्यात फक्त महिलांची नियुक्ती केली जाते आणि त्या महिला रिकरिंग डिपॉझिटची खाती हाताळतात आणि ३. बाकी सर्व बचत योजनांचे एजंट. यातील पब्लिक प्रॉव्हिडंट योजनेची एजन्सी आता बंद करण्यात आली आहे.

या विभागाकडे जवळजवळ २ लाख महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजनेचे एजंट आहेत. शहरांतील व ग्रामीण भागातील कमीत कमी बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या महिला हे काम स्वतंत्रपणे करू शकतात. त्यासाठी या विभागाकडे ज्या महिला रीतसर अर्ज करतात, त्यांची माहिती तपासून या महिलांची एजंट म्हणून नियुक्ती केली जाते वा या महिलांना त्यांचा फोटो असलेले लायसन्स दिले जाते. खरे तर यामधून भारत सरकारने महिलांना उत्पन्नाचे एक

२०१३ साली भारतीय पोस्ट विभागाने 'पोस्ट बँक ऑफ इंडिया' नावाची एक स्वतंत्र बँक सुरू करण्याचा प्रस्ताव वित्त मंत्रालयाकडे मांडला होता. त्यात त्यांनी १३०० कोटी रुपयांची मागणी केली होती, ज्यात ५०० कोटी रुपये, पूर्ण भरणा झालेले भागभांडवलच्या रूपात समावेश आहे. हे पूर्ण भरणा झालेले भागभांडवल, रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार लायसन्स मिळवण्यासाठी जरुरी आहे, परंतु हा प्रस्ताव धूळ खात पडला होता.

सध्याच्या विद्यमान केंद्र सरकारने ५ डिसेंबर २०१४ रोजी एक समिती स्थापन करून हा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सध्या भारतीय आणि खाजगी बँकांच्या मिळून भारतभर ९०,००० शाखा आहेत. याउलट पोस्ट ऑफिसच्या १,५४,००० शाखा दूरदूरच्या खेडोपाड्यांत, गावोगावी कार्यरत आहेत. जिथे या भारतीय बँका अद्याप पोचल्याही नाहीत. पोस्टांच्या शाखांचा समावेश केल्यामुळे ही शाखांची संख्या तिपटीने वाढणार आहे. यामुळे बँकिंग क्षेत्राचा विस्तार होऊ शकेल, अधिक नोकऱ्या उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे. या पोस्टल बँकेद्वारे ग्राहकांना छोट्या स्तरावरच्या वित्तीय सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आणि मोठी कर्जे देण्याची प्रक्रिया आता अस्तित्वात असलेल्या बँकाच करतील. या संपूर्ण बदलात महिलाप्रधान योजनेच्या रूपात महिलांना उपलब्ध करून दिलेली स्वयंरोजगाराची संधी टिकून राहील अशी अपेक्षा केंद्र सरकारकडून आहे.

स्वतंत्र साधन उपलब्ध करून दिलेले आहे.

या विभागातल्या माझ्या कार्यकाळात बऱ्याच आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या आणि गरीब कुटुंबांना या एजन्सी कमिशनचा फार मोठा आधार मिळाल्याची अनेक उदाहरणे मी पाहिली आहेत. अशा या एजंट कमिशनच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाची पूर्वीची कर्जे फेडून सुस्थितीत आल्याची अनेक उदाहरणे आहेत. या कमिशनवर असंख्य महिलांनी आपापल्या मुलामुलींना डॉक्टर, इंजिनीयर, आर्किटेक्ट, चार्टर्ड अकाउंटंट बनवून त्यांचे आयुष्य मार्गी लावल्याची उदाहरणे आहेत. कित्येक महिलांनी या उत्पन्नावर स्वत:च्या मुलामुलींची लग्ने व्यवस्थित पार पाडल्याचीही उदाहरणे आहेत. काही महिलांनी तर कमिशनच्या मिळकतीच्या जोरावर नवीन घर विकत घेतले आहे.

काही दिवसांपूर्वी मी टीव्हीवर एक जाहिरात पाहिली. ज्यात कु. गीता फोगोट या तरुणीने कुस्तीमध्ये २०१०च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक पटकवल्याचा सोहळा दाखवली आहे. परंतु त्याचबरोबर ''पहेलवानी हे बाईचे काम नाही'', ''बाई घरची लक्ष्मी असते'', ''ती घरातच शोभून दिसते'', ''तिने जर ही लक्ष्मणरेषा ओलांडली तर सर्व कुळाचा नाश करेल'' अशी विधाने तिच्या गावातील तथाकथित पोक्त आणि जबाबदार थोरल्यांकडून ऐकू येतात. असा हा त्रास सोसूनही, त्यावर मात करत कु. गीता फोगोट हिने हा मान पटकावला आणि भारताला हा गौरव प्राप्त करून दिला ही एक उल्लेखनीय बाब आहे.

आज जागोजागी असंख्य महिलांना अशाच दिव्यांतून जावे लागते. घरची परिस्थिती सुधारायला कोणीही मदत तर करत नाहीतच, याउलट त्या महिला स्वत:हून काही प्रयत्न करायला घराबाहेर पडल्या तर त्याला कट्टर विरोध होत असतो.

परंतु भारत सरकारने महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजनेद्वारे शहरांतील व ग्रामीण भागांतील महिलांना स्वत:च्या घरची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. ही योजना भारत सरकारची असल्यामुळे महिलांना आडकाठी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय, आपल्या सभोवारच्या परिसरातील कुटुंबांना अशा तऱ्हेने नियमित बचत करायला लावून त्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती जेव्हा सुधारताना दिसते तेव्हा त्या महिलेने स्वतंत्र व्यवसाय करण्यामागे असलेला विरोधही गळून पडतो. पर्यायाने हा विरोध करणारेच उलट तिचे कौतुक करू लागतात.



याउलट पोस्ट ऑफिसच्या १,५४,००० शाखा दूरदूरच्या खेडोपाड्यांत, गावोगावी कार्यरत आहेत. या भारतीय बँकांच्या ९० हजार शाखा अद्याप पोचल्याही नाहीत. पोस्टांच्या शाखांचा समावेश केल्यामुळे ही शाखांची संख्या तिपटीने वाढणार आहे. यामुळे बँकिंग क्षेत्राचा विस्तार होऊ शकेल, अधिक नोकऱ्या उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे. या पोस्टल बँकेद्वारे ग्राहकांना छोट्या स्तरावरच्या वित्तीय सुविधा उपलब्ध होतील.

महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजना ही एजन्सी फक्त स्त्रियांनाच दिली जाते. सध्या ही एजन्सी देण्याचे आणि नूतनीकरण करण्याचे काम त्या त्या राज्यातील अल्पबचत संचालनालय करत आहे. या एजन्सीतर्फे गुंतवणूकदारांचे पाच वर्षीय रिकरिंग डिपॉझिट खाती उघडता येतात. दरमहा महिला एजंट खातेदारांच्या घरी जाऊन, गोळा करून, त्या खातेदाराच्या पोस्ट ऑफिसमधल्या खात्यात जमा करते. ही रक्कम स्वीकारताना खातेदाराकडे ठेवलेल्या ASLAAS-5 पोचपावती कार्डावर तारीख टाकून सही करते व ही रक्कम पोस्ट ऑफिसच्या खात्यात जमा करून पासबुकमध्ये काउंटर क्लार्कची पैसे मिळाल्याची नोंद आणि पोस्टाचा तारखेचा गोल शिक्का व सही घेते. पुढल्या महिन्यात पैसे स्वीकारायला आल्यावर खातेदार पासबुकमधील नोंद तपासू शकतो. या खात्याची मुदतपूर्तीची रक्कमदेखील ही महिला एजंट खातेदाराला घरपोच आणून देते. खातेदाराला दिलेल्या याच सुविधेचे या महिलेला कमिशन दिले जाते. हे कमिशन खातेदाराने भरलेल्या मासिक हप्त्याच्या ८ टक्के इतके असते.

मात्र हे खाते कुठल्याही महिला एजंटतर्फे उघडताना, खातेदाराने त्या एजंटचे लायसन्स तपासावे आणि मुदतपूर्तीची रक्कम ती एजंट वेळेवर आणून देईल याची दक्षता बाळगावी. आता या महिला एजंटांना भारत सरकारच्या सुकन्या समृद्धी खाते उघडण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

ही योजना भारत सरकारने खास महिलांना

मासिक प्राप्तीचे साधन उपलब्ध व्हावे याकरता सुरू केली आहे.

कु. गीता फोगोट या तरुण महिलेसारखीच स्वत:ची कुवत सिद्ध करण्याची संधी भारत सरकारने सर्व भारतीय महिलांना प्राप्त करून दिलेली आहे.

मात्र भारत सरकारच्या ह्या प्रयासात संबंधित सरकारी यंत्रणेने, तितक्याच कर्तव्यदक्षतेने आणि तत्परतेने महिला एजंटांना या बचतीच्या कामात पूर्णपणे सहकार्य केले पाहिजे. खास करून पोस्ट ऑफिस, जिथे या महिला या खात्याचा व्यवहार करतात, आणि अल्पबचत अधिकाऱ्याचे कार्यालय जिथे या महिला दर तीन वर्षांनी आपल्या एजन्सीचे नूतनीकरण करून घेतात.

२०१३-२०१४ च्या आकडेवारीनुसार पोस्टाच्या सर्व बचत योजनांमध्ये मिळून २८.६६ कोटी बचत खाती उघडली गेली आणि त्यांत एकूण ७७३३.२ कोटी रुपये इतकी रक्कम जमा झाली.

या २८.६६ कोटी उघडल्या गेलेल्या बचत खात्यांपैकी, महिलाप्रधान क्षेत्रीय बचत योजनेच्या महिला एजंटांनी उघडलेल्या रिकरिंग डिपॉझिट खात्यांचा सिंहाचा वाटा आहे.

सरकारी यंत्रणेकडून असा सबळ पाठिंबा मिळाल्यास, या सर्व महिला एजंटही आपल्या स्वत:च्या घराप्रमाणे भारताच्या आर्थिक प्रगतीला भक्कम हातभार लावतील यांत शंकाच नाही.

**– शामानंद सुखी**
माजी संचालक, अल्पबचत संचालनालय
अर्थमंत्रालय (भारत सरकार)
shamanandsukhi@gmail.com

## के.ज. पुरोहित यांना विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' पुरस्कार

विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' हा पुरस्कार कथाकार के.ज. पुरोहित– शांताराम – यांना त्यांच्या घरी मुंबई येथे देण्यात आला. या कार्यक्रमासाठी वि.सा. संघाच्या वतीने सरचिटणीस शोभा उबगडे, प्रकाश एदलाबादकर आणि रवींद्र शोभणे हे आले होते. त्यांनी हा पुरस्कार (मानचिन्ह आणि रोख रुपये पंचवीस हजार) पुरोहितसरांना प्रदान केला. हा पुरस्कार प्रसिद्ध कादंबरीकार आणि पत्रपंडित ग.त्र्यं. ऊर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांच्या नावाने दिला जातो.

यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष मधु मंगेश कर्णिक, विजयाताई राजाध्यक्ष आणि अरुण साधू यांच्यासह 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल आणि त्यांच्या पत्नी अनुराधाताई, सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. तसेच वि.शं. चौघुले, सुरेखा सबनीस, अशोक बेंडखळे, उज्ज्वला मेहेंदळे, उषा आणि शशिकांत तांबे, नीला उपाध्ये, उषाताई देशमुख, वासंतीबाई गाडगीळ, गिरीजाबाई कीर उपस्थित होते. नीला उपाधे यांनी पुरोहितांची ग्रंथसंपदा व्यवस्थित एकत्र ठेवून झी टीव्हीकडून तिचे चित्रीकरण करून घेतले. झी टीव्हीने पुरोहितांची मुलाखतही घेतली.

या प्रसंगी उषा तांबे यांनी पुरोहित आणि त्यांच्या पत्नी प्रभाताई यांच्याविषयी अत्यंत जिव्हाळ्याने आणि जाणतेपणाने समर्पक माहिती दिली. पुरोहित तेव्हा भारावून गेले यात नवलच नव्हते.


पुरोहितांनी सत्काराला उत्तर देताना म्हणाले– ते विदर्भवादी निश्चितच आहेत. परंतु विदर्भ राज्यवादी कदापि नाहीत. इतरांनी विदर्भाचा मोठेपणा जाणला आणि उषा तांबे यांनी विशद करून सांगितला. तो मान्य करून पुरोहितांनी दोन गमतीदार ओळी म्हणून दाखवल्या– या विदर्भ देशी होती मोठी हाडे (माणसे), या विदर्भ देशी होती मोठी झाडे (वनसृष्टी).

पुरोहितांनी वि.सा. संघातले वातावरण उपस्थितांच्या पुढे उभे केले. पु.य. आणि विमलाताई देशपांडे, आ.रा. देशपांडे (ऊर्फ कवी अनिल) आणि त्यांच्या पत्नी प्रा. कुसुमावती, भाऊसाहेब माडखोलकर, वामनराव चोरघडे, डॉ. वि.भि. कोलते, प्रा. भ.श्री. पंडित, रा.पु. सगदेव, ना.रा. शेंडे इत्यादी लोकांच्या आठवणी सांगितल्या. त्यातली एक आठवण फार गमतीदार होती. पंडित आणि कोलते यांच्यात काही वैचारिक मतभेद निर्माण झाले असताना ते बोलून दाखवण्याऐवजी पत्ररूपाने लिहून एका पाकिटात घालून कोलत्यांनी गावाबाहेर राहत असणाऱ्या पंडितांच्या घरी जाऊन दिले. पंडितांनी ते पत्र वाचले, त्याचे उत्तर लिहून पाकिटात घातले पण ते पाकिट कोलत्यांना देण्याऐवजी कोलत्यांच्या घरी पोचते केले!

बहुतेक सगळे नामांकित लेखक आणि त्यांचे मित्र वि.सा. संघात जमत. फक्त दोघे येत नसत. शरच्चंद्र मुक्तिबोध येत नसत. याचे कारण वि.सा. संघात होणाऱ्या निवडणुका कॉलेजमधील त्यांच्या प्राध्यापक सहकाऱ्यांना विनासंकोच घेता याव्या म्हणून. दुसरे न येणारे होते भावे– प्रतिभावंत पुरुषोत्तम भास्कर भावे. ते येत नव्हते ते बरेच होते. कारण ते वामनराव चोरघड्यांना वुमनराव घोडीचोर म्हणत. माडखोलकरांना मांडीखोलकर म्हणत, भावड्या म्हणत, रा.पु. सगदेवांना बजरबट्टू म्हणत आणि गांधीवादी हरिजन सात्त्विक साहित्यिक ना.रा. शेंडे यांना म्हणत, गणेशपूरचा गांधीबुवा. असे हे भावे वि.सा. संघात येत नसत ते बरेच होते. त्यांचे मित्र गोविंदराव दोडके यांना ते गोंद्या म्हणत आणि गो.रा. दोडक्यांचे मा.नी. गळगलीकर, परांजपे इत्यादी मित्रांना पोरींच्या शाळेच्या आवारात लटकणारे दोडके, पडवळ म्हणत.

असे असले तरी भाव्यांना वि.सा. संघातील वातावरणाची आतून कदरच वाटे. तसे त्या लायकीचे वातावरण होते ते. त्याचा माझ्या तरुण मनावर फार मोठा परिणाम झाला. ज्यांचा नावाने हा पुरस्कार देण्यात येतो त्या माडखोलकरांना मी म्हटले, ''माझी पगारी नोकरी करून मी तुमच्यासारखा वर्तमानपत्रात काम करू इच्छितो.'' त्यांनी ताडकन नकार दिला. परंतु जेव्हा त्यांच्या संपादकात्वाखाली 'तरुण भारत' पत्र निघू लागले तेव्हा त्याच्या पहिल्या रविवार अंकात त्यांनी माझ्याकडून खास लेख लिहवून घेतला– 'माझं तांत्रिक दारिद्र्य'.लेखक म्हणून माझ्यावर त्यांचा विश्वास होता, आदर होता. अशा माडखोलकरांच्या नावाने मिळणारा पुरस्कार मिळालेला कळताच मी धन्य झालो. त्याबरोबर मिळणारी पंचवीस हजारांची रक्कम मी नजरेआड करू शकत नव्हतो. पण नजरेसमोर होता तो विदर्भ साहित्य संघ, यातला 'साहित्य' हा शब्द मला कानाला गोड वाटतो, जिभेलाही गोड वाटतो. कारण समारंभातले चहापाणी अत्यंत चविष्ट होते. त्याची व्यवस्था आमची सून माधवी आणि कन्या मनीषा मुंडल्ये यांच्याकडे होती. आणखी काय हवे होते? सगळेच अत्यंत आस्वाद्य आणि चिरस्मरणीय होते.

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने




भिन्नधर्मीय आईवडिलांच्या पोटी जन्म घेतलेल्या एका बुद्धिमान आणि संवेदनशील तरुणाने धर्म आणि संस्कृती यांचा अर्थ शोधण्यासाठी केलेल्या विचक्षण प्रवासाचे, मन हेलावणारे कथन

## इतिहासाचा अनभिज्ञ यात्री

### आतिश तसीर अनुवाद शारदा साठे

किंमत ३०० रुपये




ग्राफिक डिझाइनच्या मूलतत्त्वांची, संकल्पनांची, रचनातंत्राची कलेच्या चौकटीपलीकडे जाऊन दिलेली ही व्यापक ओळख! जाणकारांना ग्राफिक डिझाइनकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देता देता, डिझायनर्सना अधिक आत्मविश्वासाने डिझाइन साकार करण्यासाठी दिशाही देणारी....

## ग्राफिक डिझाइनचं गारुड

### यशोदा भागवत

किंमत ५०० रुपये आर्टपेपरवर संपूर्ण चार रंगात छपाई




माणसाच्या अनेक प्रकारच्या वेदनांचा अर्थ शोधत, माणसा-माणसांतील बंधांचा, प्रेमाचा–त्यांच्या मूलभूत संवेदनांचाही अन्वयार्थ मांडणारं ज्येष्ठ लेखक जी० ए० कुलकर्णी यांचं अखेरचं यूजीन ओनील या नाटककाराचं अनुवादित

## दिवस तुडवत अंधाराकडे

### यूजीन ओ'नील अनुवाद जी. ए. कुलकर्णी

किंमत २०० रुपये




ही कथा आहे स्वत: मृत्यूकडे निघालेल्या एका भावविभोर तरुण स्त्री डॉक्टरनं, आपल्या पेशंट्ससाठी, त्यांच्या जीवनासाठी केलेल्या अथक खटपटीची... ही गोष्ट आहे एका संजीवनीची...एका आनंददायिनीची...

## ...तुजविण संसारी

### आशा मुळगावकर

किंमत ३०० रुपये

मौज वितरण

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ ☎२३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

# बँक विलिनीकरण नवीन आव्हाने पेलताना...



## स्मिता जोगळेकर

राष्टीयीकृत बँकांच्या विलिनीकरणाच्या बातम्या प्रत्येक द्विपक्षीय कराराच्या वेळी जोर धरतात. परंतु या खेपेस ही हवा जास्तच जोरात वाहते आहे म्हणून त्याकडे जरा गांभीर्याने बघणे गरजेचे झाले आहे. विलिनीकरण आणि त्या संदर्भात आकडेवारी/योजना/तक्ते/दावे आणि प्रत्येकाच्या नजरेतून दिसणारे विलिनीकरण वरचेवर दिसू लागले आहे, या ठिकाणी कोणत्याही आकडेवारीत शिरण्याचे प्रयोजन नसून सर्वसामान्य बँक कर्मचार्याच्या मनाचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे .

१९७८ ते १९८६ या वर्षांमध्ये बँकांमध्ये प्रचंड प्रमाणावर कर्मचारी भरती झाली. आज हाच कर्मचारीवर्ग पन्नाशीच्या उंबरठ्यावर किंवा पन्नाशी पार केलेला आहे. हा वर्ग बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाच्या चढउतारांचा साक्षीदार आहे. एस्कोटा मशिनसच्या खडखडीतून बाहेर पडत, मोठाल्या लेजरना अलविदा म्हणत जेव्हा या वर्गाने संगणकाशी पहिल्यांदा हात मिळवला तेव्हा तो थरारून गेला होता. पुढे शाखांमधले अंतर्गत संगणक एकमेकांशी जोडले गेले हा एक नवा टप्पा आणि त्यापुढे तर प्रत्येक शाखा एकमेकांशी जोडली गेली आणि मोठे परिवर्तन घडून आले, परदेशातील पैसा अगदी सहज इथल्या खात्यांमध्ये जमा होऊ लागला, घरबसल्या बरेचसे व्यवहार होऊ लागले आणि एटीएम/क्रेडिट कार्डांनी एकूण बँकिंग सुटसुटीत करून टाकले.

या साऱ्या स्थित्यंतरांशी जुळवून घेणारा बँक कर्मचारी आता आणखी एका मोठ्या बदलासाठी तयार होत आहे. हे स्थित्यंतर म्हणजेच विलिनीकरण. सर्व राष्ट्रीयीकृत बँका आणि स्टेट बँकेच्या सबसिडीअरीज मिळून केवळ सहा किंवा सात बँका ठेवणे हे विलिनीकरणाचे मुख्य कलम आहे. या विलिनीकरणाचे फायदेतोटे हा सध्या चर्चेचा मुख्य विषय आहे. ज्यांना विलिनीकरण हवे आहे ते अर्थातच त्याच्या फायद्यांवर भर देत आहेत, तर विलिनीकरणाला विरोध करणारे घटक त्याच्या नकारात्मक बाजू समोर आणायच्या प्रयत्नात आहेत .

मांडल्या जाणाऱ्या मुद्यांमध्ये फायदे हे असे सांगितले गेले आहेत. बँकिंगची ताकद वाढेल, की पुढे जागतिक (ग्लोबल) बँक होण्याकडे हे पहिले पाऊल असेल. कॉल मनी मार्केटमधून केली जाणारी उचल कमी होईल, बँकाबँकांमधील घातक स्पर्धा कमी होईल ज्यामुळे या स्पर्धेच्या संदर्भात केल्या जाणाऱ्या अवैध गोष्टींना (unethical practices / regulatory violations ) आळा बसेल, बँकांची संख्या कमी झाल्यामुळे इंटरबँक ट्रान्झॅक्शन्समध्ये तसेच रिकन्सीलिएशनमध्ये वाया जाणारा वेळ वाचेल, बुडीत बँकांना पुन्हा पुन्हा पतपुरवठा करण्यापासून सरकारला मुक्तता मिळेल, बँकांच्या अनावश्यक शाखा तसेच कंट्रोलिंग/प्रशासकीय शाखा बंद केल्यामुळे ऑपरेटिंग प्रॉफिट वाढेल. हे करताना वरची पदे बरीच कमी होतील आणि त्यावरचा खर्च सुद्धा. प्रत्येक बँकेत स्वतंत्रपणे नेमले जाणारे सरकारी नॉमिनी किंवा रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी यावरचा खर्च कमी होईल, बँकांकडचे फंड्स वाढतील, स्वेच्छानिवृत्ती मागणाऱ्या कर्मचाऱ्यांना आकर्षक पॅकेज मिळू शकेल, कर्मचारीसेवा एका निश्चित (standard) दर्जावर येऊ शकेल, कर्मचाऱ्यांना बदलीसाठी, हॉलिडे होम्ससाठी जास्त विकल्प उपलब्ध होतील. ग्राहकांना एकाच बँकेत अनेक बँकांच्या सेवा सहज मिळू शकतील. युनियनच्या दृष्टीने भाषिक वर्चस्व कमी होऊ शकेल. नव्याने बांधणी झालेल्या बँकांमध्ये सर्वस्वी नवी कार्यक्षम यंत्रणा राबवता येऊ शकेल. व्यवस्थापनास जलद निर्णय घेणे शक्य होईल. एकूण बँकिंग क्षेत्रात स्थैर्य आणि भरभराट येईल .

तर विरोधी स्वर लावणाऱ्याचे मुद्दे आहेत– विलिनीकरण ही एक दीर्घ आणि विचारपूर्वक करायची प्रक्रिया आहे, त्याचे नेमके स्वरूप समजल्याशिवाय त्यावर भाष्य करणे धार्ष्ट्याचे ठरेल. विलिनीकरणामुळे एकाच गटातील बँकांच्या जवळजवळ असलेल्या शाखा आणि एटीएम सेन्टर बंद करावी लागतील किंवा त्यांचे स्थलांतर करावे लागेल. प्रचंड प्रमाणावर स्वेच्छानिवृत्ती होऊ शकेल आणि त्या प्रमाणात नवी भरती न झाल्यास, सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यावरचा भार वाढेल. दुसरीकडे बेकारीचा प्रश्न आणखी अवघड होईल. आज ज्या खात्यांवर डी–मॅट किंवा ईसीएस जोडलेले आहेत त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार करावे लागतील. आज बँकांची प्रमुख/प्रधान कार्यालये सोयीच्या ठिकाणी आहेत ती त्या गटातील प्रत्येक बँकेला सोयीची असतीलच असे नाही. प्रत्येक बँकेची उद्दिष्टे, प्राथमिकता, ध्येयधोरणे निराळी असतात त्यात तडजोडी कराव्या लागतील. आज विलिनीकरणाची गुलाबी चित्रे

उभी केली जात आहेत; पण हेच विलिनीकरण फसले तर काय याचाही तटस्थपणे विचार व्हायला हवा. छोट्या बँकांची अशक्त प्रकृती मोठ्या बँकेच्या व्यवहारांवर दुष्परिणाम घडवू शकेल. कर्मचाऱ्यांना एकमेकांशी जुळवून घेणे त्रासदायक होऊ शकेल. एक फार मोठा धोका म्हणजे या प्रचंड परिवर्तनाच्या प्रक्रियेदरम्यान महत्त्वाची माहिती (data) पुसला जाण्याची गहाळ होण्याची शक्यता आहे. कमी केल्या गेलेल्या महत्त्वाच्या पदांसाठी, युनियनच्या मुख्य पदांसाठी मोठी चुरस होईल. बँकांचा आकार मोठा झाल्यानंतर रिझर्व्ह बँकेची पकड ढिली होऊ शकेल, मोठ्या अनियमिततांवर (irregularities) नियंत्रण राहणार नाही. नव्या यंत्रणांमध्ये नवी शक्तिस्थाने निर्माण होण्याचा धोका दुर्लक्षता येणार नाही. एकाच बँकेच्या अनेक शाखा झाल्यामुळे त्यांच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे अवघड होईल. ज्या बँकेकडे पालकत्व असेल ती स्वामित्व गाजवू शकेल. तसेच पदोन्नतीच्या वेळी या बँकेच्या कर्मचाऱ्यांना झुकते माप मिळू शकेल. सरफेसी किंवा सूट फाईल्ड/ एनपीए खात्यांचा गंभीरपणे विचार न झाल्यास मोठी अनागोंदी पसरेल. विलिनीकरणानंतर आकाराने मोठ्या झालेल्या बँकांचे तोट्याचे आकडे बँकिंग इंडस्ट्रीला हलवून टाकू शकतील. या सर्व प्रक्रियेमध्ये ग्राहकांचा/शेअर होल्डर्सचा विचार किंवा त्यांचा मताचा कितपत आदर होईल हे स्पष्ट झालेले नाही.

तर हे झाले विलिनीकरणाच्या बाजूने आणि विरोधात ऐकू येणारे विचार परंतु आज सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मनात नेमके काय चालू आहे हे जाणून घेणे ही महत्त्वाचे आहे. आज मोठ्या प्रमाणावर कर्मचारी पन्नाशीच्या पलीकडे आहे, तो विलिनीकरणाच्या घोषणेने धास्तावला आहे . खरे तर विलिनीकरणाचे पडघम गेली अनेक वर्षे वाजत आहेत. परंतु आता हा आवाज अगदी कानापाशीच येऊ लागल्या कारणाने प्रत्येक घटकाने त्याला सामोरे जाण्याची तयारी सुरू केली आहे.

प्रत्येक बँकेने विद्यार्थ्यांची खाती, जनधन योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर खाती उघडत, आपला डेटाबेस वाढवायला कधीच सुरुवात केली आहे. बँकांमध्ये संगणकीकरण झाले तेव्हासुद्धा युनियन्सनी त्याला कडाडून विरोध केला होता. असेच संप झाले, भयाचे वातावरण पसरले, मात्र सरकारने जे करायचे तेच केले आणि नंतर सर्वांच्याच लक्षात आले की संगणकीकरणाचा जेवढा बागुलबुवा उभा केला गेला होता तेवढे ते भयंकर नव्हते, किंबहुना त्याची मधुर फळेही नंतर चाखायला मिळालीच.

तर विलिनीकरण म्हणजे फक्त चार किंवा पाच बँकांचे एकत्रीकरण नव्हे. ज्याप्रमाणे लग्न हे दोन व्यक्तींचे नसते तर दोन कुटुंबांचे असते त्याप्रमाणे विलिनीकरणात समाविष्ट होणाऱ्या सर्व बँकांचा साकल्याने विचार होणे गरजेचे आहे. अन्यथा मालक-नोकर भावना दृश्यअदृश्य रूपात डोकावत राहण्याचा धोका संभवतो. इंडियन बँकेने बँक ऑफ थंजावूर घेतली किंवा आयसीआयसीआयने सांगली बँक घेतली, त्यानंतरही पालक बँकेची मग्रुरी पदोपदी जाणवत राहिलीच, आजही जाणवते आहेच. विलिनीकरण म्हणजे टेकओव्हर नव्हे हे मान्य करूनही कोणी सशक्त कोणी अशक्त ही भावना राहणार आहेच. कागदोपत्री करायच्या औपचारिकता कदाचित सोपेपणी पार पडतील परंतु खरे दिव्य नंतर असेल. चार माणसे एकत्र आली तरी चार तऱ्हा दिसून येतात, तेव्हा चार संस्था एकत्र आणणे म्हणजे पोरखेळ नव्हे. प्रत्येक बँकेचे आपले विचार, स्वतःची अशी तत्त्वे, कार्यप्रणाली असते, कर्मचाऱ्यांची कामाची पठडी असते, मानसिकता असते. एखाद बँकेची ग्राहकसेवा नावाजलेली तर अन्य कोणाची सेवा बदनाम असते, अशा दोन बँका एकत्र येण्याच्या कल्पनेने कर्मचारी आताच अस्वस्थ झालेला दिसतो आहेत.

नव्या वातावरणात आपला कसा निभाव लागेल या कल्पनेने कर्मचारी धास्तावला आहे. मुदतपूर्व निवृत्तीचे विचार त्याच्या मनात घोळू लागले आहेत. कधीकधी वाटते, घडणाऱ्या गोष्टी केवळ नकारात्मकच असतील असा विचार का करावा, जेव्हा सरकार/ रिझर्व्ह बँक एवढे मोठे पाऊल उचलायला निघाले आहे तेव्हा त्यांचीही काही ठोस भूमिका असेल, सकारात्मक विचार असेल, परिणामांचा खोल अभ्यास असेल. आज जी योजना कागदोपत्री आणि अंधुक स्वरूपात दिसते आहे उद्या तिची उत्तम फळे मिळणार असतील.



विलिनीकरण म्हणजे फक्त चार किंवा पाच बँकांचे एकत्रीकरण नव्हे. ज्याप्रमाणे लग्न हे दोन व्यक्तींचे नसते तर दोन कुटुंबांचे असते त्याप्रमाणे विलिनीकरणात समाविष्ट होणाऱ्या सर्व बँकांचा साकल्याने विचार होणे गरजेचे आहे. अन्यथा मालक-नोकर भावना दृश्यअदृश्य रूपात डोकावत राहण्याचा धोका संभवतो.

माणूस मुळातच कोणत्याही स्थित्यंतरासाठी नाराज असतो. आपण आखलेल्या चौकटीत राहणे त्याला अधिक पसंत असते. नव्या चौकटीचे सुख चाखेपर्यंत तो त्याला नकार देत राहतो. आज सेवेत असलेले बहुतांश कर्मचारी तसेच युनियन नेते येत्या चार-सहा वर्षांत मोठ्या प्रमाणावर निवृत्त होणार आहेत. विलिनीकरणानंतरचा बँकिंगचा चेहरा सर्वस्वी नवा असेल. पलीकडच्या चित्राची कोणतीच कल्पना नसताना केवळ भीतीचे डोलारे उभे करण्यापेक्षा पलीकडे लख्ख उजेड असेल या आशावादासोबत पुढे का जाऊ नये? हे आव्हान समर्थपणे पेलण्याची तयारी का दाखवू नये? बँकिंग क्षेत्रातील आणखी एका महत्त्वाच्या स्थित्यंतराचे भक्कम साक्षीदार का होऊ नये? नव्या बँकिंगचे उद्याचे स्वरूप निश्चितच नवी आव्हाने घेऊन येणारे असेल, परंतु ही आव्हाने समर्थपणे झेलल्यानंतर मिळणाऱ्या समाधानाचे वाटेकरी आपण का होऊ नये?

वाघ म्हटले तरी खाणार आणि वाघोबा म्हटले तरी खाणार, मग त्याला तूच मोठा रे वाघोबा असे म्हणत त्याच्यावर खुशाल स्वार का होऊ नये. त्याच्या चेहऱ्यावर, त्याच्या मिशांच्या आत एक हास्य का उमटवू नये. न जाणो हाच वाघोबा आपल्याला नव्या जगाची सुंदर सफर घडण्यासाठी नेणार असेल.

तेव्हा नव्या वातावरणाला, नव्या जगाला खुल्या मनाने, सकारात्मक नजरेने सामोरे जावे  हेच खरे.

**– स्मिता जोगळेकर**
भ्रमणध्वनी : ९८९२५५१९५०
smita_dj@hotmail.com

- कमीतकमी आयकर दायित्वासह जास्तीत जास्त कौटुंबिक उत्पन्न वाढवा.
- उत्पन्न शिर्षके आणि अन्य स्रोताद्वारे उत्पन्न समजून घ्या.
- स्वतंत्र बँक खात्यांचा वापर करा.
- भांडवल निर्मितीसाठी शेअर्सची भेट/बक्षिस द्यावे.
  उदा. पत्नीस शेअर्सची भेट. लाभांश करमुक्त असेल.
- आयकर कायद्यानुसार निर्देशीत जवळचे नातलग जाणून घ्या.
- आयकर विवरणपत्र भरावे.

ग्रंथाली **मुद्रण सुविधा केंद्र**




# स्वप्न

**हर्षला प्रवीण पाटील**

**मूल्य ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**

आईवरची हळवी कविता, वृक्षांबद्दलचे प्रेम, सण आणि उत्सवांबद्दलची आत्मीयता, बेकारीबद्दलची चिंता अशा विषयांभोवती या कवितांची गुंफण आहे.
काही कवितांना 'गेयता'हे वरदान लाभले आहे. हर्षला या कविता गाऊन, वाचून दाखवेल तर त्यांचा अधिक प्रसार होईल.

**– विजया वाड**
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ




# तुझे दोन डोळे

**विजय आत्माराम सावंत**

**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७० रु.**

सावंत यांचा आशावादी दृष्टिकोनच त्यांना त्यांच्या सामाजिक भाव असलेल्या कवितांमधून व्यक्त करावासा वाटतो. त्यांची सर्वात ताजी, २०१४ साली लिहिलेली कविता माळीण गावच्या दुर्घटनेवर आहे. पुणे जिल्ह्याच्या आळेगाव तालुक्यातील ते गाव डोंगरकडा कोसळून गडप झाले. सावंत त्या घटनेचे विदारक चित्र रंगवतात आणि म्हणतात, की गावचे तरुण नव्या जगाचे स्वप्न निर्माण करण्यासाठी शहरांकडे गेले आणि ती स्वप्नभूमी निर्माण करण्याच्या नादात त्यांची जन्मभूमीच स्मशानभूमी होऊन गेली या जीवनातील विसंगतीकडे लक्ष वेधतात. त्या आधीच्या मुंबईतील बॉम्बस्फोट, भूकंप या वेळोवेळीच्या दुर्घटनांवर देखील सावंत यांनी रचना सादर केल्या आहे. त्यापैकी काही 'नवाकाळ' दैनिकात त्या त्या वेळी प्रसिद्धही झाल्या आहेत. मुंबईत नित्य घडणाऱ्या रेल्वे लोकलच्या अपघाताच्या घटना सावंत यांना व्यथित करतात व 'चूक'सारखी कविता त्या घटनांमधील वास्तव मांडते. सावंत गर्दी, वेग यांची अपरिहार्यता दाखवून देतात.

**– दिनकर गांगल**


'रोहन प्रकाशन'ची व्यवसायविषयक पुस्तकं...
तुम्हाला देतील दृष्टिकोन, दिशा व प्रेरणा उद्योगधंदा-नोकरीतील प्रगतीसाठी
रोहन प्रकाशन
उद्योग तुमचा... पैसा दुसऱ्याचा
व्यवसाय करण्यासाठी पैसा नव्हे, वृत्ती हवी!
सुरेश हावरे
बॅलन्स शीट व फायनान्स समजून घेताना
व्यवसायाशी संबंधित प्रत्येकासाठी!
अनिल लांबा
केवळ 'आयटी'तच...!
I.T.
भारतातील एका 'बूमिंग' उद्योगाचा विलक्षण प्रवास
अतुल कहाते
IT HAPPENS ONLY IN I.T.
Fascinating Story of the Indian 'I.T.' Industry
Atul Kahate
नावीन्यपूर्ण बदल घडवताना...
पोरस मुन्शी
गमक यशाचे...
सामान्यत्वाकडून असामान्यत्वाकडे!
अतुल गगूल
अनुवाद : डॉ. अरुण मांडे
सल्ले लाखमोलाचे
५५ नामवंतांचे जीवन बदलून टाकणारे मौलिक सल्ले
बिझनेस टुडे टीम
सुसंवाद सहकाऱ्यांशी
रूपांतर : अविनाश भोमे
विख्यात व्यवस्थापनतज्ज्ञ
सुब्रोतो बागची
लिखित
३ पुस्तकं...
मैत्री व्यावसायिकतेशी
'प्रोफेशनल' वृत्ती जोपासून विकास साधण्यासाठी अनुभवाचे बोल
सुब्रोतो बागची
The High Performance Entrepreneur
तुम्हीही व्हा... धडाडीचे उद्योजक
सुब्रोतो बागची
MBA @ 16
सुब्रोतो बागची
उल्का राऊत
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
पुणे २४४८०६८६ मो. ८१४९११२०२१०
मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com
अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com

# विमाउद्योगातून रोजगारनिर्मिती किती आणि कशी?



**नीलेश साठे**

१९५६ साली २४५ खाजगी विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाची (LIC) निर्मिती झाली. त्यानंतर दहा वर्षांनी साधारण विमा (Non-life Insurance) व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण होऊन न्यु इंडिया, ओरिएंटल, युनायटेड आणि नॅशनल अशा चार सरकारी कंपन्यांची निर्मिती झाली. अशा रीतीने सरकारी विमा व्यवसाय २००० सालापर्यंत अबाधितपणे सुरू होता. या ४० ते ५० वर्षांच्या कालावधीत जीवन विमा व साधारण विमा या दोन्ही व्यवसायांत भरघोस वाढ दिसून आली, पण जागतिकीकरणाच्या रेट्याला भारताला थांबवता आले नाही आणि २००० सालानंतर विमाक्षेत्रात पुन्हा एकदा खाजगी क्षेत्राचा शिरकाव झाला. या घटनेलाही आता १४ वर्षांचा कालावधी लोटला आहे. आजमितीस भारतात २४ कंपन्या आयुर्विमा क्षेत्रात, २६ कंपन्या साधारण विमाक्षेत्रांत तर २ कंपन्या हेल्थ इन्शुरन्समध्ये कार्यरत आहेत. विमाक्षेत्रातील बदलावर भाष्य करताना २००० सालापूर्वीचा कालखंड, २००० ते २०१४ पर्यंतचा कालखंड आणि २०१४ नंतर भविष्यातील १०-१५ वर्षांचा कालखंड अशा तीन टप्प्यांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

१९५६ ते २००० चा कालखंड : रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सरकारी विमा कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर युवकांना रोजगार उत्पन्न करून दिला. खाजगी क्षेत्राची या कालावधीत संकुचित वाढ झाल्याने विमा कंपन्यांकडे मोठ्या प्रमाणावर बौद्धिक क्षमतेवर आधारित रोजगार उपलब्ध झाले. एलआयसीमध्ये २००० साली एक लाख वीस हजाराच्यावर कर्मचारी तैनात होते तर जीआयसी व तिच्या उपकंपन्यांमधे ८० हजार कर्मचारी नोकरीत होते. याशिवाय विमा एजन्सीच्या माध्यमातून जवळपास ७ लाख जणांना स्वयंरोजगार प्राप्त झाला होता. सरकारी कंपन्यांना नोकरीत आरक्षण ठेवणे आवश्यक असल्याने एकूण कर्मचारीसंख्येच्या २० ते २५ टक्के कर्मचारी अनुसूचित जाती, जनजातीचे विमा कंपन्यांच्या नोकरीत होते. त्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर संगणकीकरण झाल्याने व्यवसायवृद्धीचे प्रमाणात कर्मचाऱ्यांची संख्या जरी वाढली नाही तरी किमान कर्मचारी कपात झाली नाही हे महत्त्वाचे आहे.

पुढील तक्त्यावरून आयुर्विमा महामंडळाची व्यवसायवृद्धी आणि कर्मचाऱ्यांच्या संख्येतील वृद्धी दिसून यईल.

| | **प्रिमियम (कोटी रुपये)** | **कर्मचाऱ्यांची संख्या** |
|---|---|---|
| १९६० | ९७ | ४०२४४ |
| १९७० | २६० | ५१३३८ |
| १९८० | ८७५ | ५५१२९ |
| १९९० | ४४९० | ८८२४३ |
| २००० | १८५९८६ | १२२८६७ |
| २०१४ | २३६७९८ | १२०३८८ |

साधारण विमा महामंडळ आणि तिच्या ४ उपकंपन्यांमध्येसुद्धा अशीच दिशा दिसून येते. त्या दरम्यान कर्मचारी कपातीच्या भीतीने कम्युनिस्टप्रणित कर्मचारी संघटनांनी संगणकीकरणाला मोठ्या प्रमाणावर विरोध करूनही विमा कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर संगणकीकरण केले. कालौघात संघटनांना देखील संगणकीकरणाचे फायदे दिसून आले आणि थोड्याबहुत पगारवाढीसमोर मान तुकवून त्यांचा विरोध मावळला. कर्मचारी संघटनांनी काळाची पावले ओळखून वेळीच आपल्या विरोधाची धार कमी केली याबद्दल त्यांचे अभिनंदनच करायला हवे. व्यवस्थापनानेही कर्मचारी संघटनांना घाबरुन न जाता चिकाटीने संगणकीकरणाचा कार्यक्रम राबवला म्हणून चांगले झाले अन्यथा या सरकारी विमा कंपन्यांना टाळे लागले असते व मुंबईतील गिरणी कामगारांसारखे विमा कर्मचारीसुद्धा देशोधडीस लागले असते. आज खाजगी विमा कंपन्यांना समर्थपणे तोंड देणे सरकारी विमा कंपन्यांना मोठ्य प्रमाणावर संगणकीकरण झाल्याने शक्य झाले.

२००० ते २०१४ चा कालावधी : उदारीकरणाचे धोरण भारताला आंतरराष्ट्रीय दबावामुळे शेवटी राबवावेच लागले. विमा व्यवसायाची बाजारपेठ खाजगी कंपन्यांना खुली करून दिल्याने २००० सालानंतर एका नवीन अध्यायास सुरुवात झाली. अनेक नामांकित आंतरराष्ट्रीय विमा कंपन्यांनी देशी कंपन्यांच्या भागीदारीत विमा व्यवसायात प्रवेश केला. सुरुवातीला २६% परदेशी भागभांडवल गुंतवणुकीची मर्यादा ठेवण्यात आली होती. विमाक्षेत्र विस्तारल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी इथल्या युवावर्गाला यादरम्यान उपलब्ध झाल्या. लिपिक, प्रशासकीय अधिकारी, विक्री अधिकारी, अकाउंटंट्स, गुंतवणूक अधिकारी, ॲक्च्युअरी अशी अनेक नवीन पदे निर्माण झाली. आजमितीस २४ खाजगी आयुर्विमा कंपन्यांत किमान १ लाख नोकरभरती झाली आहे. तेवढीच



स्वयंरोजगाराची संधी विमा एजन्सीमार्फत फार मोठ्या प्रमाणावर उपल्ब्ध झाली आहे. एलआयसीच्या १२ लाख एजंटांएवढीच फौज इतर विमा कंपन्यांनी उभी केली आहे. आजमितीस जवळपास २२ लाख एजंटांना विमा कंपन्यांनी स्वयंरोजगार प्राप्त करून दिला आहे. सर्व विमा कंपन्यांनी मिळून कर्मचारी, ब्रोकर, कॉरपोरेट एजंट, बँका असे वितरक व त्यातील कर्मचारी या सर्वांचा विचार केला तर किमान ३० लाख लोकांचा उदरनिर्वाह विमाक्षेत्रावर अवलंबून आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोजगार/स्वयं रोजगार निर्माण करणाऱ्या आयटी, रेल्वे आणि बँकांच्या बरोबरीने विमाक्षेत्राने समाजहिताचे काम केले आहे.

नोकरभरती खाजगी साधारण विमा कंपन्यांमधे झाली. अशा रीतीने सरकारी विमा कंपन्यांत असलेले २ लाख  कर्मचारी आणि जवळपास तेवढेच कर्मचारी खाजगी आयुर्विमा कंपन्यांमधे कार्यरत आहेत. खाजगी विमा कंपन्यांनी विमा व्यवसाय सुरू केल्यावर अशा रीतीने मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली.

खाजगी विमा कंपन्यांनी विमा विक्री विविध वितरकांमार्फत सुरू केली. बँक ॲशुरन्स, ब्रोकर्स, कॉर्पोरेट एजंट, सेल्फ हेल्प  ग्रुप्स अशा विविधांगी प्रकारांनी विमा विक्री सुरू झाली. अशा वितरकांकडेसुद्धा रोजगाराच्या मोठ्या संधी उपल्ब्ध झाल्या. आजमितीस जवळपास सर्व बँका विमा विक्री करतात. बँक कर्मचाऱ्यांना यात मदत करायला हजारो कर्मचारी तैनात झाले आहेत. तसेच आज पाचशेच्या वर ब्रोकर विमा विक्री करतात. ५० हजारांच्या वर कर्मचारी या ब्रोकर्सनी नियुक्त केले आहेत. प्रत्येक विमा कंपनीचे कॉल सेंटर आहे ज्यात हजारो कर्मचारी कार्यरत आहेत.

स्वयंरोजगाराची संधी विमा एजन्सीमार्फत फार मोठ्या प्रमाणावर उपल्ब्ध झाली आहे. एलआयसीच्या १२ लाख एजंटांएवढीच फौज इतर विमा कंपन्यांनी उभी केली आहे. आजमितीस जवळपास २२ लाख एजंटांना विमा कंपन्यांनी स्वयंरोजगार प्राप्त करून दिला आहे. सर्व विमा कंपन्यांनी मिळून कर्मचारी, ब्रोकर, कॉरपोरेट एजंट, बँका असे वितरक व त्यातील कर्मचारी या सर्वांचा विचार केला तर किमान ३० लाख लोकांचा उदरनिर्वाह विमाक्षेत्रावर अवलंबून आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोजगार/स्वयं रोजगार निर्माण करणाऱ्या आयटी, रेल्वे आणि बँकांच्या बरोबरीने विमाक्षेत्राने समाजहिताचे काम केले आहे.

२०१४ नंतर? : खाजगी विमा कंपन्यातील परदेशी गुंतवणुकीची मर्यादा अध्यादेशाद्वारे नुकतीच २६% वरून ४९% करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधींची मान्यता मिळून सहा महिन्यांच्या आत याचा कायदा होईल आणि या निर्णयास बळकटी मिळेल.  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या भारतभेटीपूर्वी अध्यादेश जारी करून भाजपा सरकारने उदारीकरणाच्या धोरणास चालना देण्याचा आपला मानस जाहीर केला आहे. अर्थातच जगभरातील अनेक मोठ्या विमा कंपन्या आपला विमा व्यवसाय भारतात सुरू करण्यास उत्सुक आहेत आणि भारताच्या धोरणाने त्यांच्या मनातील संभ्रमाचे सावट दूर झाले असेल. नजीकच्या काळात विमा व्यवसायात परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात संभवते. भागभांडवल वाढीबरोबरच व्यवसायवृद्धीचा आराखडा घेऊनच विमा कंपन्या  कामाला लागतील. सकल आर्थिक उत्पन्नाच्या तुलनेत विमा हप्त्याचे (प्रीमियमचे) प्रमाण भारतात अजूनही अत्यल्प आहे. केवळ २४% व्यक्तींना विमासंरक्षण प्राप्त आहे. मानवी जीवनमूल्यांचा विचार करता फारच अल्प व्यक्तींनी आपली विम्याची गरज पूर्ण केलेली आढळते. भारतात विमा व्यवसायवृद्धीसाठी अमर्याद बाजारपेठ उपलब्ध असल्याने पुढील १० वर्षांत किमान २० नवीन विमा कंपन्या आपला व्यवसाय इथे सुरू करतील असा अंदाज आहे. सध्या विमाक्षेत्रावर ३० लाख व्यक्ती अवलंबून आहेत (कर्मचारी आणि एजंटांसारखे वितरक). ही संख्या पुढील १० वर्षांत दुप्पट होईल. विमानियंत्रक, आयआरडीएनेसुद्धा  विमाक्षेत्र विस्ताराच्या  दृष्टीने अनेक स्वागतार्ह बदल केले आहेत, ज्याचे  दूरगामी परिणाम व्यवसायवृद्धीच्या रूपाने निदर्शनास येतील.

इथे एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे की केंद्रात सरकार कॉंग्रेसचे असो वा भाजपाचे, उदारीकरणाच्या धोरणाला दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांचा पाठिंबा असल्याने विमाक्षेत्रच काय पण इतरही क्षेत्रात परदेशी गुंतवणूक नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणावर होईल. रिटेल, इंफ्रास्ट्रक्चर, रेल्वे, वाहनउद्योग अशा विविध क्षेत्रांमधे गुंतवणुकीची संधी परदेशी कंपन्यांना उपलब्ध होईल.  स्वाभाविकच भारतात मोठ्या प्रमाणावर रोजगारच्या संधी उपलब्ध  होतील  आणि या विकासचक्रामधे विमाउद्योगही मागे राहणार नाही याची खात्री वाटते.

**– नीलेश साठे**
कार्यकारी संचालक
आयुर्विमा महामंडळ, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८९२५२६८५१
nbsathe@gmail.com

# शेअर बाजारातील गुंतवणुकीत ग्रामीण क्षेत्राचा सहभाग

**अजय वाळिंबे**



'शेअर बाजारातील गुंतवणुकीत ग्रामीण क्षेत्राचा सहभाग' हा विषय पाहिल्यावर प्रथम मनात आलं ते भारतातील सामान्य माणसांचं गुंतवणुकीचं प्रमाण आणि त्यातील शेअर बाजारातील किंवा म्युचुअल फंडातील गुंतवणुकीचं प्रमाण पाहावं. हे संशोधन करण्यासाठी मी साहजिकच 'गूगल' आणि या क्षेत्रातील काही जाणकारांची मदत घेतली. सध्या आपल्या देशाची लोकसंख्या सुमारे १२२ कोटींच्या आसपास असून शेअर बाजारासाठी आवश्यक असलेलं डीमॅट खातं केवळ २.३० कोटी लोकांचं आहे. म्युचुअल फंडासाठी डीमॅट खाती जवळपास दुप्पट म्हणजे ४.५० कोटी लोकांची आहेत. म्हणजेच आपल्या एकूण लोकसंख्येपैकी २% लोकही शेअर बाजारात गुंतणूक करत नाहीत. या एकूण गुंतवणुकीची शहरी आणि ग्रामीण अशी विभागणी करायची ठरवली तर तीत ग्रामीण भागाचा गुंतवणुकीचा हिस्सा एक टक्क्यांहून कमी असेल. खरं तर बचत सगळेच करतात, अगदी एखाद्याकडे बँक खातं नसलं तरीही घरात रोख रक्कम बचत करणारे आहेतच की. अर्थात बचत आणि गुंतवणूक यांत फरक असतो हे बऱ्याचजणांना अजूनही माहीत नसल्यानं बचत म्हणजेच गुंतवणूक अशा गैरसमजात अनेक शहरी भागातील सुशिक्षितही आहेत. सगळीच रक्कम बचत करणे म्हणजे तोटा किंवा नुकसानीची गुंतवणूक, हे किती जणांना माहीत आहे?

गुंतवणुकीची सुरुवात बचतीतून होते. मात्र बचतीतून संपत्ती निर्माण करण्यासाठी तुमचा परतावा चलनवाढीच्या दरापेक्षा जास्त हवा. म्हणजेच गेल्या काही वर्षांतील चलनवाढीचा सरासरी दर १०% असेल तर आपण केलेल्या गुंतवणुकीवरचा परतावा वार्षिक किमान १२% तरी हवाच. पारंपरिक गुंतवणूक म्हणजे बँकेतील मुदतठेवी साधारण ८.५०% ते ९% वार्षिक दरानं व्याज देतात. तर काही कंपनी मुदतठेवी १२% व्याज देत असल्या तरीही आजही एल्डर फार्मा किंवा प्लेथिको फार्मा यांसारख्या कंपन्या जेव्हा जनतेच्या मुदतठेवी परत करू शकत नाहीत तेव्हा गुंतवणुकीचा हा मार्ग देखील धोकादायक आहे हे लक्षात येतं. संपत्ती निर्माण करण्यासाठी किंवा भविष्याची तरतूद करण्यासाठी वार्षिक २०-२५% परतावा मिळाला तर उत्तमच! झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापायी केबीसी आणि शेरेगर यांसारख्या अनेकांनी आकर्षक आणि फसव्या योजना जाहीर करून राज्यभरातील गोरगरिबांना आणि मध्यंमवर्गीयांना लुबाडले आहे. एमू, सागवान वृक्ष लागवड, गोट फार्मिंग, एमएलएम अशा विविध प्रकारांनी गंडवूनही अजूनही अनेक सुशिक्षित शहरी गुंतवणूकदार अशा किंवा अशा प्रकारच्या योजनांना बळी पडत आहेत आणि आपली फसवणूक मूग गिळून सहन करत आहेत. १५-२०% असा परतावा केवळ शेअर बाजारातूनच मिळू शकतो हे हळूहळू का होईना परंतु आताशा बऱ्याच गुंतवणूकदारांच्या लक्षात येऊ लागलं आहे. अर्थात तरीही बँक, पोस्ट ऑफिस, सोने, पतपेढ्या आणि चिट फंड्ज अशा पारंपरिक गुंतवणुकीच्या तुलनेत शेअर बाजार किंवा म्युचुअल फंडांतील गुंतवणूक नगण्य आहे.

ग्रामीण भागात गरिबीचं प्रमाण जास्त आहे असा एक समज आहे. परंतु तसं नसावं. खरं तर ग्रामीण जनतेला पैशांचा विनियोग कसा करायचा हेच माहिती नाहीये. मायक्रो फायनान्स कंपन्या निमशहरी आणि ग्रामीण भागात कार्यरत असल्या तरीही त्यांचा कल कर्जवाटपाकडे जास्त असतो. ते साहजिकच आहे. कुठल्याही खाजगी कंपनीला तिचा IRR महत्त्वाचा.

**भारतीयांची मानसिकता**

पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारतीयांमध्ये बचतीचं प्रमाण अधिक असलं तरीही तिला फायद्याची गुंतवणूक म्हणता येत नाही. याची अनेक कारणं आहेत आणि त्यापैकी एक महत्त्वाचं म्हणजे, आम्हा भारतीयांची मानसिकता. आपण कायम सुरक्षित, डोळ्यांसमोर दिसणारी आणि अडीअडचणीला उपयोगी पडेल अशा गुंतवणुकीच्या शोधात असतो. अर्थात यात चूक काहीच नाही. परंतु तुम्हाला परतावा जास्त मिळण्यासाठी थोडासा धोका पत्करायलाच हवा. बँक आणि पोस्ट यांच्या पलिकडची गुंतवणूक म्हणजे सट्टा असं लहानपणापासूनच मनावर बिंबवलं जातं. सुदैवानं इंटरनेटच्या माध्यमानं जग खूप जवळ आल्यानं तसंच शिक्षणानं आता ही मानसिकता बदलू लागली आहे, पण ती फक्त मोठ्या शहरांत. अर्थात शेअर बाजाराला सट्टा समजायची वैध कारणंही आहेतच. हर्षद मेहताच्या कालावधीपासून जवळपास १०-१२ वर्षं शेअर बाजारात केवळ सट्ट्याचंच वातावरण होतं. निरनिराळे घोटाळे याच काळात झाले. फार थोड्या लोकांनी पैसे कमावले तर

बऱ्याचजणांनी घालवले. सेबीचे उपाय अमलात यायला थोडासा उशीरच झाला. तोपर्यंत शेअर बाजारात आकर्षित झालेला मध्यमवर्गीय आपले हात पोळल्यानं पुन्हा जुन्या म्हणजे पारंपरिक गुंतवणुकीकडे वळला होता. मात्र गेल्या दहा वर्षांत बरेच काही बदलले. सेबीच्या अनेक उपाययोजना तसंच त्याला शेअर बाजारांची साथ आणि इंटरनेट यामुळे सर्व व्यवहारात पारदर्शकता आली. लिस्टिंग ॲग्रीमेंटमधील कलम ४९ मुळे देखील सर्वच कंपन्यांना चांगलाच वाचक बसला. आता सर्व काही आलबेल आहे असे वाटत असतानाच सीआरबी कॅपिटल, सत्यम घोटाळा बाहेर आले आणि गुंतवणूकदार पुन्हा घाबरले. परंतु सत्यममध्ये सरकारनं वेळीच हस्तक्षेप केल्यानं गुंतवणूकदार बाहेर पडला नाही; परंतु सावध मात्र नक्कीच झाला. अर्थात या कलावधीतदेखील थोडेफार गुंतवणूकदार होते ते मोठ्या शहरांतीलच. नवीन अभ्यासक्रमात आता सेबी, भांडवल बाजार, गुंतवणुकीचे नवीन पर्याय इत्यादीचा समावेश झाल्यानं नवीन पिढी शेअर बाजाराला एक गुंतवणूक पर्याय म्हणून बघू लागली आहे. बीएसई आणि राष्ट्रीय शेअर बाजारातही (एनएसई) आता शेअर बाजारविषयक अनेक कोर्सेस सुरू झाल्याने त्याचा फायदा नवीन गुंतवणूकदारांना घेता येऊ लागला. मात्र ग्रामीण गुंतवणूकदार या सर्वच सोयीपासूनही वंचितच राहिला. अजूनही मुंबई, पुणे अशा मोठ्या शहरांखेरीज शेअरबाजारविषयक प्रशिक्षण कार्यक्रम दिसत नाही. अजूनही जमीनदारी, सावकारी, पतपेढ्या आणि सहकारी बँका यांचंच प्राबल्य असल्यानं तरुणवर्गही गुंतवणुकीच्या बाबतीत दिशाहीन झालेला दिसतो. खरं तर बऱ्याच गावांतून एसईझेड किंवा एमआयडीसी आल्यानं सरकारला शेतजमिनी ताब्यात घ्याव्या लागल्या आणि त्यांचा मोठा मोबदला देखील शेतकऱ्यांना मिळाला. मात्र हा मिळालेला पैसा नक्की कुठे गुंतवला गेला, मुळात तो गुंतवला जातो की असाच उडवला जातो, या प्रश्नांची उत्तरं शोधणं आवश्यक आहे. भारतात दुर्दैवानं अजूनही आपण शेतीसाठी संपूर्ण निसर्गावर अवलंबून आहोत. अवकळी पाऊस, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचं अतोनात नुकसान होतं आणि केवळ शेतीवर पोट असणारा शेतकरी हतबल होतो. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या होतात. केवळ आर्थिक साक्षरता नसल्याने इच्छा असूनही ग्रामीण भागांतील अनेक गुंतवणूकदारांना शेअर बाजार किंवा म्युचुअल फंडांत गुंतवणूक करणं जमत नाही.

**ग्रामीण भागांतील गुंतवणूक कशी वाढवता येईल?**

ग्रामीण भागांतील शेअर बाजारातील गुंतवणूक किती आहे हे पाहण्याआधी मुळात ग्रामीण भागात गुंतवणूक किती आणि कोठे आहे ह्याचा अभ्यास करणं आवश्यक आहे. आधी म्हटल्याप्रमाणे आर्थिक साक्षरतेच्याअभावी बहुतांश गुंतवणूक ही सोनं, चांदी, जमीन, सहकारी बँका किंवा पतपेढ्यांत आहे. अनेकदा मिळालेला पैसा कसा वाढवायचा ह्याचं ज्ञान नसल्यानं हा पैसा धार्मिक कार्यं, लग्नसराई किंवा चक्क महागडे मोबाइल फोन किंवा गाड्यांवर उडवला जातो. त्यामुळे माझ्या मते, सर्वात मोठी गरज आहे ती जनजागृतीची, बचतीचं नि गुंतवणुकीचं महत्त्व समजावून देण्याची आणि आर्थिक नियोजनाची. हतबल शेतकऱ्याला सतत मदत करून परावलंबी बनवण्यापेक्षा सरकारनं शिक्षणावर भर दिला तर निदान पुढची पिढी स्वयंपूर्ण होऊ शकेल. ह्याच



आर्थिक साक्षरतेच्याअभावी बहुतांश गुंतवणूक ही सोनं, चांदी, जमीन, सहकारी बँका किंवा पतपेढ्यांत आहे. अनेकदा मिळालेला पैसा कसा वाढवायचा ह्याचं ज्ञान नसल्यानं हा पैसा धार्मिक कार्यं, लग्नसराई किंवा चक्क महागडे मोबाइल फोन किंवा गाड्यांवर उडवला जातो. त्यामुळे माझ्या मते, सर्वात मोठी गरज आहे ती जनजागृतीची, बचतीचं नि गुंतवणुकीचं महत्त्व समजावून देण्याची आणि आर्थिक नियोजनाची. हतबल शेतकऱ्याला सतत मदत करून परावलंबी बनवण्यापेक्षा सरकारनं शिक्षणावर भर दिला तर निदान पुढची पिढी स्वयंपूर्ण होऊ शकेल. ह्याच शेतकऱ्यांना जर आपण आर्थिक साक्षर करून नियोजन शिकवलं तर त्याचा मोठा सकारात्मक परिणाम झालेला दिसेल.

शेतकऱ्यांना जर आपण आर्थिक साक्षर करून नियोजन शिकवलं तर त्याचा मोठा सकारात्मक परिणाम झालेला दिसेल. शेअर बाजारातील गुंतवणुकीआधी, मला वाटतं, गरज आहे ती आर्थिक साक्षरतेची. एकदा गुंतवणुकीचं आणि आर्थिक नियोजनाचे महत्त्व समजलं की गुंतवणुकीच्या योग्य संधी गुंतवणूकदार शोधून काढतो. शेअर बाजारातील गुंतवणूक ही पारंपरिक गुंतवणुकीपेक्षा फायद्याची वाटत असली तरीही कुठलीही गुंतवणूक ही गुंतवणूकदाराच्या मानसिकतेवर अवलंबून असते. आपल्या आजूबाजूला इतके सुशिक्षित लोक असूनही किती लोक शेअर बाजारात गुंतवणूक करतात? शेअर बाजाराकडे प्रत्यक्ष गुंतवणूक वळायला शहरी जनतेला इतका वेळ लागू शकतो तर ग्रामीण जनतेचं काय? मला वाटतं, ग्रामीण गुंतवणुकीचा ओघ शेअर बाजाराकडे वळवण्यासाठी पहिलं पाऊल म्हणजे आर्थिक साक्षरता आणि गुंतवणुकीचं महत्त्व जनतेला पटवून देणं. तसंच नियोजनपूर्ण गुंतवणुकीचे फायदे समजावून सांगणं. शालेय शिक्षणातून तसंच प्रौढसाक्षरता वर्गांतूनदेखील गुंतवणुकीचं महत्त्व पटवून देणं आवश्यक आहे.

शेअर बाजारातील गुंतवणूक आता घरबसल्या सहज शक्य आहे. परंतु किती गावांत इंटरनेटची सुविधा आहे? बरं सुविधा असल्यास त्याचा स्पीड किती आहे? अजूनही मुंबई- पुण्यासारखी मोठी शहरं वगळता इतर शहरांतून पायाभूत सुविधांची वानवा आहे तिथे ग्रामीण भागाचं काय घ्या? तसंच डिपॉझिटरी आणि शेअर दलाल यांची कार्यालयं किंवा शाखा ग्रामीण भागात मिळणं दुरापास्तच. म्हणूनच सर्वप्रथम आवश्यकता आहे ती पायाभूत सुविधांची आणि शेअर बाजाराच्या जनसंपर्क मोहिमेची. आपल्याकडे बीएसई किंवा एनएसई या दोन्ही शेअर बाजारांनी जागृतीचा प्रयत्न किती केलाय हे त्यांना आणि सेबीलाच माहीत! यांचे शैक्षणिक कोर्सेसदेखील फक्त मुंबई-पुण्यात. इतर भागांतील लोकांना शेअर बाजार जाणून घ्यायचा असेल तर त्यांना फक्त पुस्तकी ज्ञानावर अवलंबून राहावं लागते. प्रॉफेशनल कोर्सेस करणाऱ्यांनीही शेअर बाजाराचं कामकाज कसं चालतं याचं ज्ञान दिलं जात नाही तर इतर कोर्सेसबद्दल न लिहिलेलंच बरं.

नवीन कंपनी-कायद्याप्रमाणे आणि सेबीच्या नियमांप्रमाणे सर्व कंपन्यांना हक्क न मागितलेली लाभांशाची रक्कम किंवा व्याज (unclaimed interest/ dividend) गुंतवणूकदारांसाठी शैक्षणिक निधीमध्ये हस्तांतरित करणं बंधनकारक आहे. ह्या निधीचा विनियोग नक्की कसा होतो हे तपासून पाहणं आवश्यक आहे. ह्याच निधीचा उपयोग गावागावांतून आर्थिक साक्षरतेसाठी केला तर त्याचा फार मोठ्या प्रमाणात फायदा ग्रामीण जनतेला होईल.

नवीन सरकारनं प्रत्येक नागरिकाला बँक खातं उघडण्यासाठी प्रोत्साहन दिलं आहे याचा फायदा होईलच, शिवाय मायक्रो फायनान्स कंपन्या, खाजगी बँका आणि अर्थात राष्ट्रीयीकृत बँका यांनाही आर्थिक साक्षरतेमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावता येईल.

शेअर बाजारातील गुंतवणुकीला चालना मिळावी म्हणून दोन वर्षांपूर्वी अर्थसंकल्पात राजीव गांधी इक्विटी सेविंग्स स्कीम सुरू करण्यात आली. ज्या गुंतवणूकदारांनी आजपर्यंत शेअर बाजारात गुंतवणूक केली नाही अशाकरता ही योजना आखण्यात आली. परंतु या योजनेतील किचकट तरतुदींमुळे या शेअर बाजाराला चैतन्य देणाऱ्या योजनेला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. या योजनेत फक्त बीएसई-१०० किंवा सीएनएक्स-१०० मध्ये समाविष्ट असणाऱ्या शेअर्समध्येच गुंतवणूक करत येते. तसंच पहिल्या वर्षात गुंतवणूकदाराला शेअर बाजारात ट्रेडिंग करायला मनाई असल्यानं या योजनेचं उद्दिष्ट फक्त गुंतवणूक करून बसून राहा असंच वाटतं.

स्टॉक एक्स्चेंजमध्ये शेअर्सखेरीज डिबेंचर्स किंवा बॉण्ड्सचंही ट्रेडिंग होतं. मात्र शेअर्सच्या तुलनेत डिबेंचर्स आणि बॉण्ड्सना कायम सापत्न वागणूक मिळालेली दिसते. डेट फंडाचंही तेच. तुम्ही शेअर्समध्ये किंवा इक्विटी फंडांत गुंतवणूक केलीत तर तुम्हाला लाभांशाच्या स्वरूपात कर मुक्त उत्पन्न मिळू शकतं तसंच किमान एक वर्षाच्या कालमर्यादेनंतर शेअर्सवर भांडवली कर लागत नाही. परंतु डिबेंचर्स आणि बॉण्ड्सवरील व्याज मात्र करपात्र आहे. तसंच त्यांचं ट्रेडिंग देखील भांडवली कराला पात्र ठरत असल्यानं त्यातील गुंतवणूक आकर्षक वाटत नाही. डेट फंडाच्या व्याजवर लाभांशवाटप कर कापावा लागत असल्यानं युनिट धारकाचं उत्पन्न कमी होतं.

नुकत्याच वाचलेल्या एका बातमीप्रमाणे, गेल्या पाच वर्षांत भारतातील शेअर बाजारातील रिटेल गुंतवणूक ४० बिलियन डॉलर म्हणजे साधारण २४७,००० कोटी रुपये इतकी आहे. म्हणजेच सरासरी वार्षिक गुंतवणूक सुमारे ४९,००० कोटी रुपये होती. ह्यात प्रत्यक्ष शेअर बाजारातील गुंतवणूक तसंच म्युचुअल फंडातील गुंतवणूक या दोघांचा समावेश आहे. गेल्या वर्षी शेअर बाजारानं ३०% परतावा दिल्यानं यंदादेखील रिटेल गुंतवणूक चढीच राहील अशी आशा आहे. मात्र यात ग्रामीण भागाचा वाटा वाढवण्यासाठी गरज आहे ती सरकारी इच्छाशक्तीची, शिक्षणाची आणि जनजागृतीची. अन्यथा गुंतवणुकीतील ही विषमता अशीच वाढत राहील आणि अच्छे दिन दूरच राहतील.

**- अजय वाळिंबे**
भ्रमणध्वनी : ९८१९९०८८९४
ajay.walimbe@phoenixarc.co.in

- आर्थिक उद्दीष्टे ओळखून त्या उद्दीष्ट पूर्तीसाठी तुमच्या गुंतवणूकीवर लक्ष केंद्रित करा.
- तुमच्या गुंतवणूकीवर लक्ष केंद्रीत केल्याने योग्य आणि वेळेवर झालेल्या गुंतवणूकीतून तुम्ही संपत्ती निर्माण करता.

आजच सभासद व्हा

५०० रुपये भरा

तीन महिने
मनसोक्त वाचा

आणि

६०० रुपयाची
पुस्तके भेट



रसिक
वाचन योजना

☎ : ९२२५६२७१४५/०२०२४४५११२९

# फसव्या गुंतवणूकयोजना व त्यामागील गुपित



## उदय तारदाळकर

आपली मूळ गुंतवणूक शाबूत ठेवून आपल्या गुंतवणुकीवर जास्तीत जास्त परतावा मिळवण्याच्या प्रयत्नात गुंतवणूकदार आपली सदसद्विवेकबुद्धी गहाण ठेवतो. हे कालचक्र वर्षानुवर्षं चालत आहे आणि ह्यातून ग्रामीण आणि शहरी ह्या दोन्ही भागांतील गुंतवणूकदार बळी ठरलेले आहेत.

गेल्या कित्येक वर्षांचा इतिहास बघता पुढच्यास ठेच मागचा शहाणा ही म्हण गुंतवणूकदारांना लागू पडत नाही असा निष्कर्ष सहज काढता येईल. प्रवर्तक गुंतवणूकदारांना उच्च परतावा मिळण्याची हमी देतात आणि अशी संभाव्य उच्च हमी देणारी आमिषे हे ह्या फसव्या गुंतवणुकीचे प्रमुख कारण आहे. त्याशिवाय अशा गुन्हेगारांविरुद्ध ठोस उपाययोजनांचा अभाव हे आणखी एक महत्वाचे कारण म्हणता येईल. महागाई निर्देशांकापेक्षा जास्त परतावा मिळवताना गुंतवणूकदारांनी काही अवाजवी अपेक्षा ठेवणे आणि त्या मागचे अर्थकारण आणि समाजकारण आपल्याला समजून घेणे निकडीचे आहे. ह्या बाबतीत होणारी कायदेशीर दिरंगाई आणि संवेदनशून्यता ही कित्येकदा गुंतवणूकदारांच्या किंवा ठेवीदारांच्या जिवाशी खेळ करते. बऱ्याचदा अशा योजनांची तुलना बाजारातील कोणत्याही परंपरागत योजनेशी करता येत नाही. ह्याचा फायदा प्रवर्तकांना नवे गुंतवणूकदार आकर्षित करण्यास होतो. परिस्थितीचे निरपेक्ष आकलन करता ह्या प्रकरणी सेबी, रिझर्व्ह बँक किंवा तत्सम सरकारी संस्थाना दोष देणे उचित होणार नाही.

ग्रामीण किंवा निमशहरी भागातील गुंतवणूक, ही गुंतवणुकीच्या साधनांचा अभाव अथवा त्याविषयीची उदासीनता अशा फसवणुकीला कारणीभूत ठरते. शिवाय अशा गुंतवणुकीबद्दल बहुधा गुप्तता बाळगण्याकडेच जास्त कल असतो. पारदर्शकता आणि तरलता हे कोणत्याही गुंतवणुकीचे दोन स्तंभ समजले जातात. आपल्याला मिळणारा परतावा हा अवाजवी आहे हे जाणूनही आपल्या गुंतवणुकीचा निर्णय लपवण्याकडे कल असतो. जास्त किंवा अवाजवी परतावा देऊन ऑपरेटर नवीन गुंतवणूकदारांना आकर्षित करतात. काही गुंतवणूकदार नंतर निस्वार्थीपणे आपल्या मित्रांना व नातेवाईकांना ह्या योजनेत सामील होण्यासाठी प्रोत्साहित करतात. तर काहीजण स्वत:, आपले कुटुंब आणि मित्र ह्यांना दलाल बनवून काही आर्थिक लाभही मिळवतात (महाराष्ट्रातील केबीसी घोटाळा). अशा काही योजना पिरॅमिड ह्या प्रकारात मोडतात. सुरुवातीला प्रवर्तक आपल्या भागाचा नफा काढून घेतात. नवे गुंतवणूकदार आकर्षित करतात आणि जुन्या गुंतवणूकदारांना परतावा देतात. अशा तऱ्हेने विश्वास संपादन केल्याने जुने गुंतवणूकदार ही साखळी वाढवण्याचा प्रयत्न करतात. नव्या गुंतवणूकदारांची नोंदणी थांबली की हा डोलारा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतो आणि एकदा का हे पिरॅमिड कोसळले की अर्थात येणारा परतावा थांबतो आणि शेवटी गुंतवणूकदार आपली मूळ रक्कम गमावून बसतो.

शहरी गुंतवणूकदारांची बात काही औरच आहे. अशा फसव्या योजनांमधील त्यांनी केलेल्या गुंतवणुकीमागची मानसिकता समजणे उद्‌बोधक ठरेल. काही निम्न-मध्यमवर्गीय हे मुंबईतील शेरेकर किंवा कलकत्त्यामधील शारदा यांसारख्या घोटाळ्यात अडकलेले सापडतात. अशा योजना काही ठरावीक काळात गुंतवलेली रक्कम दुप्पट किंवा तिप्पट करणारया असतात. अशा गुंतवणुकीमागे घेतलेल्या निर्णयाची मानसिकता समजणे कठीण असते. बँक किवा कंपन्यातील मुदत ठेवी सुमारे ९ ते ११ टक्क्यांच्या आसपास व्याज देत असताना अशा फसव्या योजना महिन्याला तीन ते चार टक्के व्याज कसे देऊ शकतील असा सारासार विचार मनात येऊनही भोळ्याभाबड्या आशेपायी आणि बहुधा झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापायी गुंतवणूकदार आपला विवेक आणि मुद्देमाल हे दोन्ही गमावून बसतो.

सिटी बँक प्रकरणात संबधित पोर्टफोलिओ व्यवस्थापन योजनेत दर महिन्याला २-३ किंवा वर्षाला २४ ते ३६ टक्क्यांचे आश्वासन दिले होते. पोर्टफोलिओ व्यवस्थापन ह्या योजनेत असे आश्वासन जरी शक्य असले तरी त्यासाठीचे सातत्य अनाकलनीय वाटते. तेव्हा शहरी भागातील आणखी काही योजनांचा विचार करता काही वेळा झटपट श्रीमंत होण्याचा हव्यास हा गुंतवणुकीमागे एकमेव उद्देश आहे असे वाटते.

सिटी लिमोझिन प्रकरणात गुंतवणूकदारांना सुरुवातीला

९७,००० रुपये जमा करण्यास सांगितले होते. ही रक्कम त्यांच्या नावे मारुती व्हॅन खरेदी करण्यासाठी वापरली जाईल असे सांगितले होते. वाहने भाड्याने देऊन त्यावर होणाऱ्या नफ्यातून गुंतवणूकदारांना महिन्याला ४००० रुपये देण्यात येतील असे आश्वासन दिले गेले. बाजारात अशा प्रकारची कोणतीही योजना अस्तित्वात नसताना गुंतवणूकदार आकर्षित झाले त्यात काहीच नवल नाही.

'मृग सोन्याचा जरी असंभव तरीही तयाला भुलले राघव' असे आधुनिक वाल्मीकी गदिमा दैवाचे वर्णन करताना सांगून गेले. भांडवल बाजारात आपले नशीब अजमावताना दैवाला दोषी ठरवणारे कमी नसावेत. केबीसी योजनेअंतर्गत गुंतवणूक केलेली मूळ रक्कम सहा, आठ आणि तीस महिने अशी तीन वेळा सभासदांना परतावा म्हणून देण्यात येईल अशी धडाकेबाज घोषणा करण्यात आली.

मती गुंग करणाऱ्या ह्या योजनेत दलाल मालेमाल झाले, कारण त्यांना २० ते ३० टक्के कमिशन आणि भरघोस इनामे जाहीर करण्यात आली होती. त्यातील काही आमिषे तर इतकी फसवी होती की गुंतवणूकदार आपले मानसिक संतुलन हरवून बसला होता असे वाटते. दलालांना मिळणारे काही फायदे असे होते-

सात सभासद बनवा - मुंबईची सहल, छत्तीस सभासद बनवा - गोव्याची सहल, १८० सदस्य बनवा - महिन्याला ५००० रुपये अधिक फायदा, २५० सदस्य बनवा - महिन्याला ५००० रुपये अधिक फायदा, १२५०० सदस्य बनवा - एक बंगला आणि अतिरिक्त फायदा म्हणून रुपये ५१ लाख, २५५०० सदस्य बनवा - रोख बक्षीस रुपये १ कोटी आणि अतिरिक्त लाभ!



गेल्या कित्येक वर्षांचा इतिहास बघता पुढच्यास ठेच मागचा शहाणा ही म्हण गुंतवणूकदारांना लागू पडत नाही असा निष्कर्ष सहज काढता येईल. प्रवर्तक गुंतवणूकदारांना उच्च परतावा मिळण्याची हमी देतात आणि अशी संभाव्य उच्च हमी देणारी आमिषे हे ह्या फसव्या गुंतवणुकीचे प्रमुख कारण आहे. त्याशिवाय अशा गुन्हेगारांविरुद्ध ठोस उपाययोजनांचा अभाव हे आणखी एक महत्वाचे कारण म्हणता येईल. महागाई निर्देशांकापेक्षा जास्त परतावा मिळवताना गुंतवणूकदारांनी काही अवाजवी अपेक्षा ठेवणे आणि त्या मागचे अर्थकारण आणि समाजकारण आपल्याला समजून घेणे निकडीचे आहे. ह्या बाबतीत होणारी कायदेशीर दिरंगाई आणि संवेदनशून्यता ही कित्येकदा गुंतवणूकदारांच्या किंवा ठेवीदारांच्या जिवाशी खेळ करते.

एकंदरीत ह्या योजनेत दलालांनी सदस्य बनवणे (नोंदणी करणे) म्हणजे 'अशी ही बनवाबनवी'चा एक खेळच होता असे त्याचे विश्लेषण केल्यास उचित होईल. मुख्य प्रवर्तक भाऊसाहेब चव्हाण ह्यांनी आलेले पैसे जमीन, हॉटेल व्यवसाय आणि भांडवली बाजारात गुंतवले आणि अक्षरशः प्रचंड प्रमाणात सदस्यांना बनवले.

२०१३ साली उघडकीला आलेला आणखी एक घोटाळा म्हणजे 'नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लिमिटेड'चा. फायनान्शियल टेक्नॉलॉजीज यांनी स्थापन केलेले नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लिमिटेड, (National Spot Exchange Limited- NSEL) हे वादाच्या भोवऱ्यात सापडले त्या गोष्टीला आता सुमारे दीड वर्ष झाले. जवळपास १३००० गुंतवणूकदार ५५०० करोड रुपयांना फसवले गेले ते गोदामात कमॉडिटीस अस्तित्वात नसताना केलेल्या व्यवहारांमुळे. ह्या योजनेत परतावा हा सुमारे १३ ते १५ टक्के इतकाच असल्याने गुंतवणुकीतील जोखीम नगण्य आहे असा गुंतवणूकदारांचा समज झाला. शिवाय हा व्यवहार कमॉडिटी मार्केटअंतर्गत असल्याने गुंतवणूकदार त्याला बळी पडले. एखादे एक्स्चेंज बंद पडण्याचा हा प्रसंग अतर्क्य आणि गुंतवणूकदारांना धक्का देणारा होता. त्याचबरोबर एक्स्चेंजवर होणाऱ्या प्रत्येक व्यवहाराची हमी देणारा आणि जोखीम घेणारा सेटलमेंट गॅरंटी फंड हा गायब झाला. हा ऐरणीचा मुद्दा सेबीला एक धडा शिकवून गेला. अर्थात राष्ट्रीय स्पॉट

एक्स्चेंज लिमिटेडवर कोणाचेच नियंत्रण नसल्याने अशा घटनांवर कोणाचाच अंकुश नव्हता. त्या पार्श्वभूमीवर सेबीने स्टॉक एक्स्चेंजसाठी एक नवीन नियमावली करून असा फंड वृद्धिंगत करण्यास सुरुवात केली आहे.

कोलकात्यातील 'शारदा' आणि महाराष्ट्रातील 'केबीसी घोटाळा' ह्या दोन मोठ्या घोटाळ्यांनंतर आता सेबीला नियमन करण्याचे अधिकार मिळाले. नुकतेच एका पत्रकाद्वारे सेबीने सुमारे दोन डझन कंपन्यांना/सस्थांना दोषी ठरवून त्यांना बाजारातून भांडवल जमा करण्यास मनाई केली आहे. शिवाय सेबीने ह्या कंपन्यांना त्यांनी ४ लाख ठेवीदरांकडून गोळा केलेले १००० कोटी रुपये तीन महिन्यांत परत करण्याचे आदेश दिले. ह्या सर्व कंपन्यांना ह्यापुढे ठेवी जमा करण्यास मनाई करत सेबीने ह्या कंपन्यांच्या प्रवर्तकांना ह्यापुढे भांडवल बाजारात कोणताही व्यवहार करण्यास मज्जाव घातला आहे.

वर्षानुवर्षे होत असलेले चिट फंड घोटाळे लक्षात घेता बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांवर अंकुश ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने काही चांगली पावले उचलली. बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांचा वाढता प्रभाव आणि कारभार बघता रिझर्व्ह बँकेने काही कडक नियमावली लागू केली. सर्वात प्रथम रिझर्व्ह बँकेने बिगरबँकिंग कंपन्यांची नोंदणी अनिवार्य केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ह्या आदेशामुळे बेसुमार ठेवी गोळा करणाऱ्या कंपन्यांवर अंकुश ठेवण्यास मदत होईल. शिवाय, नवीन निर्बंधांमुळे व्यावसायिक बँकांप्रमाणे बुडीत खात्यांसंबंधीचा (NPA) तीन महिन्यांचा नियम बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांना लागू होईल. हे टप्प्याटप्प्याने होणार असले तरी सर्व बिगरबँकिंग कंपन्यांवर जरब बसवण्यास नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. अशा निर्बंधांमुळे अपेक्षा उंचावल्या असल्या तरी सर्व काही आलबेल होईल ह्याची हमी देणे मात्र कठीण आहे. ह्या समस्यांवर सजग राहणे ही काळाची गरज आहे. कायद्यांची अंमलबजावणी करण्यास सरकार कसे प्राधान्य देते हे पाहणे जरुरीचे आहे. ह्यापुढे अशा गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होईल, परंतु गुंतवणूकदार अशा प्रलोभनांना बळी पडणार नाही असे सरसकट सांगणे हे धाडसाचे ठरेल.

**– उदय तारदाळकर**
भ्रमणध्वनी : ९९२०८०५८२२
tudayd@gmail.com

मराठी भाषेविषयी आस्था असणा-या प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायलाच हवा असा ग्रंथ.
मुंबई मराठी साहित्य संघाचे अष्टदशकपर्वातील प्रकाशन.

**इये मराठीचिये नगरी.**

संपादनः अशोक बेंडखळे,डॉ.उज्ज्वला मेहेंदळे
प्रस्तावनाःमधू मंगेश कर्णिक
संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत एकनाथ,मुस्लिम संत,
स्वा.सावरकर,ब्रिटिश राजवट,कुसुमाग्रज,बहिणाबाई
आणि शिलालेख यांचे मराठी भाषेला योगदान.




सहभागी लेखकः विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर,
डॉ.निशिकांत मिरजकर, डॉ. कुमुद गोसावी,
डॉ. यु.म. पठाण, डॉ.सुधाकर देशपांडे,
डॉ.अरुण टिकेकर, ज्यो.जयंतराव साळगावकर,
डॉ.द.ता.भोसले आणि प्रा. म.रा.जोशी.


मूल्यः१६०रुपये

प्रकाशकः मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोनः२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६

तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली...

# गांधींनंतरचा भारत

## जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा इतिहास




## रामचंद्र गुहा

अनुवाद :

## शारदा साठे

**पृष्ठे : ९२० | मूल्य : ₹ ७००**

**भारताच्या निर्माणाची करुण तसेच संघर्षमय कहाणी त्यातील सर्व गर्हणीय तसेच उदात्त इतिहासक्षणांचा वेध घेत रामचंद्र गुहा यांनी इथे सांगितली आहे. आधुनिक भारताच्या जडण–घडणीची कथा जितकी उद्विग्न करणारी तितकीच रसपूर्णही आहे. भारतात वेळोवेळी झालेल्या निरनिराळ्या संघर्षाच्या वर्णनातून स्वतंत्र भारताच्या घडणीचा अद्ययावत व अर्वाचीन पट आपल्या डोळ्यांसमोर या पुस्तकातून नाट्यमय रीतीने उलगडत जातो.**

मॅजेस्टिक
पब्लिशिंग हाऊस

प्रमुख विक्रेते : **मॅजेस्टिक बुक स्टॉल**। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ **मॅजेस्टिक बुक डेपो**। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ **मॅजेस्टिक ग्रंथदालन**। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९

Website : www.majesticprakashan.com | E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी

Click करा-
www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755

# गृहकर्जक्षेत्राचा अखंड विस्तार

**महेश सरलष्कर**



स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरणाला वेग आला. शहरं वसत गेली. बिगर शेतीवर जगणाऱ्या लोकांचा टक्का वाढत गेला. खेड्यातील पूर्वापार बांधलेलं वडलोपार्जित मोठं घरं सोडून लोक छोटी कुटुंबं बनवून गाव सोडून नोकरी करायला, व्यवसाय करायला शहरात आली. इथं त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न उद्‌भवला. प्लॉट पाडले गेले आणि इमारती उभारून फ्लॅट तयार केले गेले. शहरं वाढत गेली, तशी फ्लॅटची संख्याही वाढत गेली. घर छोटं असो वा मोठं, सर्वसामान्यांसाठी हे स्वप्न नेहमीच आवाक्याबाहेर राहिलं. मध्यमवर्गासाठी दरमहा पगारात लाखो रुपयांचं घर विकत घेणं अवघडच असतं. त्यांना कर्ज काढून घरखरेदी करण्याशिवाय पर्याय असत नाही. त्यांची ही गरज भागवण्याची आवश्यकता होती. गरज निर्माण होते तिथं त्याची बाजारपेठ तयार होते. त्यानुसार गृहकर्जपुरवठा करणारं स्वतंत्र क्षेत्र विकसित होत गेलं. लोकांना राहायला घरं हवीत आणि त्यांना ती घेता यावीत यासाठी त्यांना कर्जानं पैसा पुरवायला हवा हे सत्तरच्या दशकापासून प्रकर्षानं जाणवू लागलं. केंद्र आणि राज्य सरकारांना घरांच्या प्रश्नाकडे विशेषत्वानं लक्ष देणं भाग पडलं. त्यातून खऱ्या अर्थानं गृहकर्जक्षेत्राचा विकास आणि विस्तार होत गेला. देशात घरांची मागणी वाढली की त्याच्याशी निगडीत क्षेत्रांच्या विकासाची आपोआप गती वाढत जाते. गृहनिर्माणक्षेत्रावर दोनशेहून अधिक क्षेत्रं अवलंबून आहेत. त्यामुळेच आता हे क्षेत्र म्हणजे देशाच्या विकासाची गती मोजणारा एक महत्त्वाचा निकष बनलेला आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच शहरी भागांत अधिकाधिक घरे बांधली जावीत यादृष्टीनं विचार सुरू झाला. पण, सत्तरच्या दशकात केंद्र सरकारनं जाणीवपूर्वक धोरण राबवायला सुरुवात केली. त्याअंतर्गत १९७०मध्ये निवासी आणि नागरी विकास महामंडळाची म्हणजेच हुडकोची स्थापना केंद्र सरकारनं केली. हुडकोच्या माध्यमातून गृहनिर्माणाच्या प्रकल्पांना अर्थसाह्य केलं जाऊ लागलं. त्यातून निवासी बांधकामक्षेत्राच्या विकासाला सुरुवात झाली. पुढे देशभर खासगी विकासकांची फळीच उभी राहिली. आता विदेशी गुंतवणूकदार बांधकामक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आलेले दिसतात. घरं उभी राहायला लागली, पण ही घरं विकत घ्यायला लोकांच्या हाती पैसा तर हवा? मग त्यांना अर्थसाह्य करण्याची संस्थात्मक सुविधाही हवी. १९७७ मध्ये खासगी क्षेत्रात त्याची पायाभरणी झाली ती हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशनच्या (एचडीएफसी) रूपानं. इंडिस्ट्रअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ही एचडीएफसीची प्रवर्तक संस्था होती. हीच संस्था पुढे आयसीआयसीआय बँक बनली आणि देशातील अग्रगण्य खासगी बँक म्हणून नावारूपाला आली. एचडीएफसीची निर्मिती ही भारतीतील गृहकर्जक्षेत्राचा प्रारंभ मानता येईल. एचडीएफसी ही एका अर्थानं वित्तीय क्षेत्रातील क्रांतीच होती!


नोकरदार-मध्यमवर्गाला घर विकत घेण्यासाठी अधिकृतपणे, हप्त्यावर, कुठलीतरी खासगी वित्तीय संस्था कर्जाऊ पैसे देतेय हे स्वतंत्र भारतात पहिल्यांदाच घडत होतं. विकत घेतलेलं घर गहाण टाकून त्या बदल्यात कर्ज मिळवण्याचा सोपा मार्ग एचडीएफसीनं रूढ केला. ही संस्था आजघडीला गृहकर्जक्षेत्रातील सर्वात यशस्वी बिगर बँकिंग कंपनी ठरलेली आहे. एचडीएफसीनं गृहनिर्माण प्रकल्पाची सत्यता आणि योग्यता पाहून उच्च मध्यमवर्गालाच नव्हे तर निम्न वर्गालाही कर्ज द्यायला सुरुवात केली. त्यातून या कंपनीबद्दल समाजात विश्वासार्हता निर्माण होत गेली.

पण, एचडीएफसी देखील नव्यानं उदयाला आलेली कंपनी होती. गृहकर्जं किती आणि कशी द्यायची, त्याची वसुली कशी करायची, त्याचा व्याज दर कसा ठेवायचा, या अर्थसाह्य करताना विचारात घ्याव्या लागणाऱ्या बाबी एचडीएफसीलाही ठरवाव्या लागणार होत्या. त्यामुळे सुरुवातीच्या काळाच एचडीएफसी आताप्रमाणे कोट्यवधींची कर्जं देत नसे. पाच ते दहा लाखांची कर्जं दहा वर्षांच्या मुदतीनं दिली जात होती. त्यानंतर कर्जाची आणि मुदतीची व्याप्ती हळुहळू वाढवण्यात आली. वीस लाखांपर्यतची कर्जं पंधरा वर्षांच्या मुदतीसाठी, पुढे वीस वर्षांच्या, तीस वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात येऊ लागली. कर्जंही पन्नास लाख, पंचाहत्तर लाख वा त्याहून अधिक रकमेचीही दिली जाऊ लागली. आता कर्ज फेडण्याच्या तुमच्या क्षमतेनुसार कितीही कर्ज मिळू शकतं. वीस लाखांपर्यंतचं कर्ज असेल तर रकमेच्या ९० टक्क्यांपर्यंतही कर्ज मिळण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध झालेली आहे, इतका गृहकर्जक्षेत्राचा विकास झालेला आहे. त्याचं सगळं श्रेय एचडीएफसीलाच जातं.

गृहकर्जाच्या क्षेत्रात एचडीएफसीचं महत्त्व आणि उपयुक्तता वाढत गेली, टिकूनही राहिली. पण एवढ्या मोठ्या देशात अत्यंत वेगानं वाढणाऱ्या मध्यमवर्गाच्या गृहकर्जाच्या गरजा भागवण्यासाठी एफडीएफसी ही एकमेव वित्तीय संस्था कुठे पुरणार होती? काळाची गरज लक्षात घेऊन गृहकर्जाची बाजारपेठ विकसित होणं स्वाभाविक होतं. बँकिंग क्षेत्रात, विशेषतः सरकारी बँकांचा विस्तार झपाट्यानं होत होता. मोठ्या व्यापारी कर्जांव्यतिरिक्त छोट्या ठेवीदारांच्या गरजा पूर्ण करण्यावरही बँकांचा भर होता. स्टेट बँक आणि अन्य सरकारी बँकांनीही घर तारण ठेवून गृहकर्ज देण्याचा बिझनेस विकसित केला. त्यात नंतरच्या काळात म्हणजे खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर आलेल्या आणि झपाट्यानं विस्तारत गेलेल्या खासगी बँकाही सहभागी झाल्या. आयसीआयसीआय बँकेनं अत्यंत वेगानं ग्राहकांना गृहकर्जांचं वाटप केलेलं आहे!

मात्र बँकिंग क्षेत्राकडून गृहकर्जांचं मोठ्या प्रमाणावर वाटप सुरू होण्याआधीच एचडीएफसीप्रमाणे बिगर बँकिंग क्षेत्रातील वित्तीय कंपन्यांनाही गृहकर्जांची बाजारपेठ खुणावू लागली. त्यातून गृहकर्ज पुरवणाऱ्या वित्तीय कंपन्या उदयाला आल्या. उदाहरणार्थ, दिवाण हाऊसिंग फायनान्स, इंडिया बुल्स, रेप्को होम्स, कॅन फिन होम्स वगैरे. गृह फायनान्स ही एचडीएफसीची उपकंपनी कार्यरत झाली. बँकांनीही फक्त गृहकर्जक्षेत्रासाठी वाहिलेल्या वित्तीय कंपन्या काढल्या. जशा- आयडीबीआय होम फायनान्स, पीएनबी हाऊसिंग फायनान्स वगैरे. लोकांची घर विकत घेण्याची गरज इतकी वाढली की अधिकाधिक वित्तीय संस्थांची गरज लागणारच होती. एलआयसी, जनरल इन्श्युरन्स यासारख्या विमाक्षेत्रातील सरकारी कंपन्यांनी एलआयसी हाऊसिंग फायनान्स, जीआयसी हाऊसिंग फायनान्स या गृहकर्ज पुरवठा करणाऱ्या उपकंपन्या काढल्या. या सर्व कंपन्यांना बाजारात प्रचंड ग्राहक होता आणि तो वाढताना दिसतोय. या बिगर बँकिंग क्षेत्रातील गृहकर्ज पुरवठादार कंपन्या बँकांकडून पैसा उभ्या करत होत्या वा थेट भांडवली बाजारातूनही. सवलतीतील रोखे विक्रीला काढले गेले. लोकांच्या ठेवींच्या माध्यमातूनही या कंपन्यांनी निधीउभारणी केली. या व्यवहारांवर नियंत्रण राहिलं ते नॅशनल हाऊसिंग बँकचं. ही बँक रिझर्व्ह बँकेची पूर्ण मालकी असलेली उपकंपनी आहे. गृहकर्जक्षेत्र वेगानं विस्तारू लागल्यानं त्याचं योग्य नियमन करण्याची गरज केंद्र सरकारला वाटू लागली होती. या क्षेत्रातील वित्तीय संस्थांना अर्थसाह्य करणे आणि त्यांच्या व्यवहारांवर नजर ठेवणं यासाठी कायदा करण्यात आला आणि १९८७मध्ये नॅशनल हाऊसिंग बँक अस्तित्वात आली. गृहकर्जक्षेत्रातील कंपन्यांच्या रोख्यांना हमी याच बँकेनं दिली. निम्न आर्थिक वर्गातील लोकांना स्वस्तात कर्ज मिळावं या उद्देशानं पुढची सात वर्षं गृहकर्जाच्या व्याजदरांवर याच बँकेचं नियंत्रण होतं. पुढे २५ हजारांहून अधिक रकमेच्या कर्जावर कंपन्यांना बाजारभावाप्रमाणे व्याजदर आकारता येऊ लागले. त्या काळात १५ वर्षांपर्यंत कर्ज मिळत असे आणि तेही स्थिर व्याजदरानं. या क्षेत्रातील काही वित्तीय कंपन्यांनी थोडे व्याजदर आकारून वीस वर्षांसाठी कर्ज द्यायला सुरुवात केलेली होती. या कंपन्या बाजारातून अधिकाधिक प्रमाणात निधी उभारणी करू लागल्यानं त्यांना स्थिर व्याजदर परवडेनासा झाला. त्यामुळे बदलत्या व्याजदरानं गृहकर्ज देण्याची पद्धत रूढ होऊ लागली.

गृहकर्जक्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे सहकारी बँका. विशेषतः महाराष्ट्रात त्यांचं योगदान मोठं आहे. राज्य सहकारी बँक म्हणजेच शिखर बँक, त्याअंतर्गत येणाऱ्या



लोकांना राहायला घरं हवीत आणि त्यांना ती घेता यावीत यासाठी त्यांना कर्जानं पैसा पुरवायला हवा हे सत्तरच्या दशकापासून प्रकर्षानं जाणवू लागलं. केंद्र आणि राज्य सरकारांना घरांच्या प्रश्नाकडे विशेषत्वानं लक्ष देणं भाग पडलं. त्यातून खऱ्या अर्थानं गृहकर्जक्षेत्राचा विकास आणि विस्तार होत गेला. देशात घरांची मागणी वाढली की त्याच्याशी निगडीत क्षेत्रांच्या विकासाची आपोआप गती वाढत जाते. गृहनिर्माणक्षेत्रावर दोनशेहून अधिक क्षेत्रं अवलंबून आहेत. त्यामुळेच आता हे क्षेत्र म्हणजे देशाच्या विकासाची गती मोजणारा एक महत्त्वाचा निकष बनलेला आहे.

जिल्हा बँका आणि पतपेढ्या अशा तीन स्तरांवर सहकारी बँकांची कार्यपद्धती असल्यानं या बँकांकडून तुलनेत जास्त दरानं कर्जं घ्यावी लागतात. पण गावोगावी सहकारी बँका पोचल्या असल्यानं खेड्यांचं अर्थकारण त्यांच्या भोवती फिरतं. त्याचा लोकांची पुरेपूर फायदाही करून घेतलेला दिसतो. शहरांमध्ये नागरी सहकारी बँकांचंही जाळं फैलावलं. सारस्वत बँक, कॉसमॉस, श्यामराव विठ्ठल अशा काही नागरी बँका अत्यंत कार्यक्षमपणे चालवल्या जात आहेत. गृहकर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था वा बँकांनी फक्त वैयक्तिक कर्जवाटप केलं नाही तर गृहनिर्माण प्रकल्पांनाही केलं. त्याचप्रमाणे गृहनिर्माण सहकारी सोसायट्यांनाही अर्थसाह्य करणारी यंत्रणा अस्तित्वात आली. नॅशनल कॉ–ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशनकडून राज्य स्तरावर अर्थसाह्य केलं जाऊ लागलं. फेडरेशननं एलआयसी, नॅशनल हाऊसिंग बँक, नागरी गृहविकास महामंडळ, राज्य सरकारांच्या ठेवी, बँका, डिबेंचर्स अशा विविध माध्यमांतून निधी उभारला.

अशा रीतीनं गृहकर्जक्षेत्राचा तीन स्तरांवर विकास–विस्तार होत गेला. बिगर बँकिंग, बँकिंग आणि सहकारी क्षेत्र एकत्रितपणे लोकांच्या घरांचं स्वप्न पूर्ण करत आहेत. अन्य वित्तीय क्षेत्रांत जशी स्पर्धा असते तशी याही क्षेत्रात आहे. प्रत्येकाला नवनवे ग्राहक मिळवायचे असतात, त्यासाठी चढाओढ चाललेली असते. २००८च्या आधीच्या काही वर्षांत बँका, बिगर बँकिंग कंपन्या आक्रमकपणे आपला बाजारपेठेतील हिस्सा वाढवण्याचा प्रयत्न करत होत्या. लोकांना स्वतःहून विचारणा करून गृहकर्जं दिली जात होती. त्यामुळे लोकांना गृहकर्ज घेणंही सोपं झालेलं होतं. व्याजाचे दरही कमी होते, स्थिर व्याज दरानेही गृहकर्ज देण्यास बँका तयार असत. पण, २००८नंतर जगभरच मंदीचं वातावरण निर्माण झालं. बाजारात रोखतेचं प्रमाण कमी झालं. कर्ज वसूल होणं अवघड झालं. व्याजाचे दरही वाढत गेले. त्यामुळे बदलत्या व्याजदरांवर गृहकर्ज मिळू लागलं, त्याचा फटका लोकांना बसला. शिवाय, बँका वा या क्षेत्रातील कंपन्या कर्ज देताना अधिक चाणाक्ष बनल्या. घर तारण ठेवणं पुरेसं होईना, त्याच्या बरोबरीनं घराच्या किमतीएवढा विमा काढणंही अनिवार्य बनलं. देशातील आणि देशाबाहेरील आर्थिक स्थिती बदलते त्यानुसार वित्तीय क्षेत्रातही बदल होत असतात, गेल्या सहा वर्षांत गृहकर्जक्षेत्रातही हे पाहायला मिळालं.

गेल्या वर्षात नव्या घरांची मागणी कमी झाल्यानं गृहकर्जाची मागणीही कमी झाली. पण नव्या वर्षात ही स्थिती बदलण्याची चिन्हं आहेत. वित्तीय कंपन्या, बँकांकडून पुन्हा एकदा ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू झालेला दिसतो. गृहकर्जाची मागणी वाढावी यासाठी काही बँकांनी स्थिर व्याजदरानं कर्जवाटप सुरू केलं आहे. स्टेट बँक तसंच अन्य बँकांनी महिला कर्जदारांसाठी व्याजदरात सलवत देण्यास सुरुवात केलेली आहे. गेल्या वर्षभरात रिझर्व्ह बँकेनंही ग्राहकाभिमुख निर्णय घेतलेले आहेत. प्री–पेमेंट करताना शुल्कआकारणी करण्यास बँकांना मनाई करण्यात आलेली आहे. या सकारात्मक घडामोडींमुळे नव्या वर्षात पुन्हा एकदा गृहकर्ज क्षेत्राच्या विस्ताराला वेग आलेला पाहायला मिळेल.

**– महेश सरलष्कर**
भ्रमणध्वनी : ९८६७२१५०६५
mahesh.sarlashkar@gmail.com

ग्रंथाली




**डॉक्टरांच्या जगात**

**डॉ. वर्षा दंडवते**

**मूल्य १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**

अशा पुस्तकांचे नेमके स्थान कोणते? ही पुस्तके वैद्यकाचे ज्ञान देण्यासाठी निर्माण झालेली नाहीत. डॉक्टर आणि रुग्ण ह्यांच्यामध्ये संवादाचा पूल बांधण्याचे काम ती करतात. गैरसमजुती, अल्पविश्वास आणि संशय ह्या सगळ्यांच्या फेऱ्यात डॉक्टर–रुग्ण हे नाते सापडले आहे. डॉक्टर–रुग्ण हे नाते अक्षयी विश्वासाचे असणे गरजेचे आहे आणि प्रस्तुत पुस्तक अशा नात्याची पायाभरणी करते.

– डॉ. संजय ओक

काम करणाऱ्या स्त्रियांना आणि स्त्री डॉक्टरांना अनेक पातळ्यांवर लढा देत जगावे लागते. शोभेची बाहुली बनायचे का? घरचे काम दोघांनी करायचे की एकटीने? स्त्रियांनी आर्थिक भार पेलायचा की नाही? आपण स्त्रीदुय्यमतेकडून स्त्री–पुरुष समानता आणि कधी कधी बेदरकारपणाच्या पुढच्या टप्प्यावर तर जात नाही ना? यासारखे प्रश्न मांडून सद्य परिस्थितीत स्त्रियांना स्व–परिक्षणाची गरज आहे आणि आत्मभान सावरणे गरजेचे आहे असा निष्कर्ष लेखिका काढते. अतिशय प्रांजळपणे पण तितक्याच तटस्थपणे लिहिलेले हे अनुभव आपल्याला वाचायला मिळतात.

– डॉ. माया तुळपुळे

एका वेगळ्या सामाजिक संवेदनेने, जाणिवांच्या सशक्त प्रकाशात केलेले हे लेखन असल्यामुळे ते केवळ ‘डॉक्टरांच्या जगात’ले ‘जग’ नसून ते समाजमनातील आतले काजळकप्पे व्यक्त करणारे लेखन आहे. ते केवळ डॉक्टर आणि रुग्ण
किंवा शरीरव्याधींवरील उपचाराचे लेखन नसून रुग्ण आणि त्यांच्यासमवेत ओघाने आलेल्या त्यांच्या नातेवाईकांच्या भीषण मानसिकतेचे दर्शन घडवणारे; वाचता वाचता समाजाची ढासळती इयत्ता व आंतरिक मूल्यांची पडझड व्यक्त करणारे लेखन आहे.

– प्रवीण दवणे

# संस्कृती प्रकाशनाची अर्थकारणाची उपयुक्त पुस्तके




काळा पैसा ही भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेली कीड समूळ नष्ट करण्यासाठी स्वीस बँकातील ७२ लाख ६८ हजार कोटी रुपये भारतात आणून विकास कार्यासाठी वापरावे म्हणून अनेक आंदोलने उपोषणे झाली. या गौडबंगालाचे चिकित्सक विवेचन आणि रिझर्व्ह बँकेच्या कार्याचे मूल्यमापन व्यासंगी अर्थतज्ञ **पी.एन.जोशी** यांनी केले आहे.

**लेखक : पी.एन.जोशी । ₹ १०० । पाने ११२**




मुक्त अर्थव्यवस्थेतील उदारीकरणाचे धोरण, राष्ट्रीय बँकिंग धोरणाची आवश्यकता, खाजगी बँकांचे भवितव्य, बँकांची सामाजिक बांधिलकी व हरवलेला ग्रामीण चेहरा, व्याजदर, एन्. पी. ए., बेवारस ठेवी, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, केंद्र सरकारचे अर्थसंकल्प, रिझर्व बँकेचे पतधोरण, परकीय चलनाचा साठा, अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक अशा अनेक गोष्टींचा परामर्ष आहे.

**लेखक : पी.एन.जोशी । ₹ २५० । पाने ३१२**




या ग्रंथात एका अनुभवसंपन्न व जाणकार बँकर पी.एन.जोशी यांनी आपल्या सिध्दहस्त लेखणीतून चार दशकाहून जास्त काळातील बँकिंग क्षेत्रातील दूरगामी स्थित्यंतरे समर्थपणे रेखाटली आहेत. अत्यंत सोप्या परंतु रोचक भाषेत त्यांनी १९६० नंतरच्या बँकिंग जगतातील क्रांतीकारी घटनांचा उहापोह केला आहे.

**लेखक : पी.एन.जोशी । ₹ २५० । पाने ३०२**




प्रत्येक खातेदाराने नित्यनेमाने जसे आपण देवदर्शनास जातो त्याचप्रमाणे आठवड्यातून, पंधरवड्यातून एकदा तरी आपले खाते व नोंदी तपासून पाहणे आवश्यक झाले आहे. बँक, खातेदार व ठकबाज या त्रिकोणातील बँक व खातेदार यांनी बँकेने घालून दिलेले नियम तंतोतंत पाळले तर ही ठकबाजी मोठ्या प्रमाणावर रोखण्यास मदत होऊ शकते.

**लेखक : डॉ.प्रकाश राजनकर । ₹ १५० । पाने १२८**




या ग्रंथात वि.श्री. उर्फ बाबासाहेब दामले या बँकींग व्यवसायातील एका अग्रगण्य व्यक्तिमत्त्वाने साक्षीरुपाने मांडलेला स्वतःच्या आयुष्याच्या वाटचालीचा लेखाजोखा आहे. या निरलस सेवाभावी, अनुभव संपन्न, सृजनशील व समाजाभिमुख व्यक्तीने मूल्याधिष्ठीत जीवन प्रवास जगतांना, अतिशय पारदर्शक प्रामाणिकपणे स्वतःची प्रतिमा स्पष्ट, खरीखुरी व निरपेक्षपणे दाखविली आहे.

**लेखक : वि.श्री.दामले । ₹ ३५० । पाने ३६८**

**संस्कृती प्रकाशन** ६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, नू.म.वि. समोर, पुणे ३०.
मोबा. ९८२३० ६८८२९२ • फोन ०२०-२४४९७३४३
प्रकाशक : सुनिताराजे पवार sanskrutiprakashan@yahoo.com www.sanskrutiprakashan.com

# गुंतवणूकदारांची मानसिकता शहरी आणि ग्रामीण



**सुप्रिया देवस्थळी**

कोणत्याही समाजाची मानसिकता, विचारधारा ही त्या समाजाच्या भाषेतूनही प्रतिबिंबित होत असते. थेंबे थेंबे तळे साचे अशी एक म्हण मराठीत प्रचलित आहे.

जागतिक स्तरावर विचार केला तर घरगुती स्वरूपाच्या बचतीचे (saving) आणि गुंतवणूक करण्याचे प्रमाण भारतात इतर अनेक देशांपेक्षा जास्त आहे. एका टप्प्यावर भारतात घरगुती बचतीचे (household savings ) प्रमाण हे देशाच्या निव्वळ घरगुती उत्पादनाच्या (GDP ) जवळजवळ २५% इतके होते. त्यात आता घट झाली असली तरी घरगुती बचतीचे प्रमाण भारतात खूप जास्त आहे हे नक्की. इथे एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की बचत आणि गुंतवणूक या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्यांचा एकमेकांशी जवळून संबंध असला तरी त्या सारख्या नाहीत. बचतीची मानसिकता असेल पण ती बचत चांगल्या ठिकाणी गुंतवण्याची मानसिकता असेलच असे नाही .

सर्वसाधारणतः बचत कशासाठी केली जाते? तर भविष्यातल्या सुरक्षिततेसाठी. कुठल्याही भारतीय कुटुंबाच्या काही गरजा आणि जबाबदाऱ्या असतात. मुलांचे शिक्षण, त्यांची लग्नं, आरोग्यावर होणारे खर्च इत्यादी. लग्न हा आपल्या सामाजिक जीवनातला मोठ्ठा इव्हेन्ट कायमच राहिला आहे, त्यामुळे सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याची आपली सामाजिक परंपरा आहे. अजूनही सोन्याच्या आयातीचे प्रमाण पाहिले तर सोने हा गुंतवणुकीचा मार्ग म्हणून लोकप्रिय असल्याचे दिसते. मुली असतील तर त्यांना लग्नात द्यावे लागेल म्हणून सोने घ्यायचे आणि मुली नसतील तरीही वेळ आल्यास सोने गहाण ठेवून पैसे उभे करता येतात, ही आपल्या समाजाची मानसिकता आहे. अगदी सर्व चित्रपटांमधून, पैशांची गरज भासते तेव्हा मोठ्या मनाने दागिने गहाण ठेवायला देणाऱ्या आई, बायको, बहिणी आपण पाहिलेल्या आहेत. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही ठिकाणी सोने हा गुंतवणुकीचा मार्ग म्हणून वापरला गेला आणि अजूनही वापरला जातो. सध्या गुंतवणुकीचे इतर अनेक पर्याय उपलब्ध आहेत, financial asset मध्ये गुंतवणुकीचे पर्याय आता मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत तरीही सोन्याची लोकप्रियता फारशी कमी झालेली नाही.

गुंतवणूक कुठे आणि किती प्रमाणात केली जाते याचा संबंध गुंतवणुकीचे किती पर्याय उपलब्ध आहेत, किती सहज ते उपलब्ध आहेत आणि ते पर्याय सुरक्षित आहेत का याच्याशी आहे. ग्रामीण आणि शहरी गुंतवणूकदारांमध्ये आणि त्यांच्या गुंतवणुकीमागच्या मानसिकतेमध्ये जो थोडाफार फरक दिसतो त्याचा संबंध या तीन कारणांशी आहे. बँकेमध्ये मुदत ठेव हा शहरी मध्यमवर्गासाठी गुंतवणुकीचा महत्त्वाचा पर्याय १९८०-१९९० च्या दशकांमध्ये होता त्याची दोन कारणे होती. एक म्हणजे, बँका बुडत नाहीत हा विश्वास आणि दुसरे म्हणजे बँकेमध्ये खाते उघडता येणे. ग्रामीण भागामध्ये मात्र त्या काळात बँकांचे जाळे पसरलेले नव्हते आणि म्हणून तिथल्या गुंतवणूकदाराला गुंतवणुकीचे मर्यादित पर्याय उपलब्ध होते. शहरी नोकरदार वर्गामध्ये National Saving Certificate, Provident Fund, PPF खाते, इंदिरा विकास पत्र, किसान विकास पत्र अशा सुरक्षित पर्यायांमध्ये पैशांची गुंतवणूक करण्याचा ट्रेंड होता. ग्रामीण भागातल्या शिक्षणाचे प्रमाण नगण्य असणाऱ्या, कायमस्वरूपी आणि नियमित उत्पन्न नसणाऱ्या वर्गासाठी मात्र हे पर्याय नव्हते. गुंतवणुकीचे पर्याय नसले तरी गुंतवणुकीची मानसिकता होती. आणि म्हणूनच सोन्यासारखा पर्याय वापरला जात होत. ग्रामीण भागामध्ये बचत गटांचे जाळे पसरायला लागल्यावर बँकेतल्या गुंतवणुकीचा पर्याय तिथल्या लोकांना उपलब्ध झाला.

'भविष्याबद्दल सुरक्षितता' या मानसिकतेचा भाग म्हणून विमा गुंतवणूकही शहरी मध्यमवर्गाने मोठ्या प्रमाणावर केली. १९७० पासून पुढे विमा पॉलिसीमधली गुंतवणूक हा प्रत्येक मध्यमवर्गीय, नोकरदार घराच्या गुंतवणूक प्लानचा एक महत्त्वाचा भाग होता. पण याच काळात शेतकरी किंवा कामगारवर्गाला सोयीचे वाटतील असे विम्याचे पर्याय मर्यादितच होते. विमा क्षेत्र खाजगी कंपन्यांना खुले होण्यापूर्वी सार्वजनिक उपक्रम स्वरूपाच्या कंपन्याच विमा क्षेत्रात होत्या. या कंपन्यांबद्दल सर्वसामान्य माणसाला विश्वास होता आणि गरजेच्या वेळी विमा पॉलिसीमधले पैसे मिळत होते. त्या काळात विम्याशी संबंधित पर्याय मात्र मर्यादित होते. खाजगी कंपन्या या क्षेत्रात उतरल्यानंतर आरोग्य विमा सर्वसामान्य माणसांमध्ये लोकप्रिय झाला


भारतातल्या गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर कायमच सुरक्षित

गुंतवणुकीच्या पर्यायांचा प्रभाव राहिलेला आहे. म्हणूनच मध्यमवर्ग शेअर बाजारातल्या गुंतवणुकीपासून थोडा लांब राहिलेला दिसतो. २००० च्या दशकामध्ये जेव्हा मोठ्या प्रमाणावर कंपन्यांचे IPO आले, बँकिंग क्षेत्रातल्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिमॅट खात्याचा पर्याय उपलब्ध झाला तेव्हा या IPO बूमचा फायदा उठवणारा वर्ग शहरी होता आणि तोही मर्यादितच होत. डिमॅट खात्यामुळे गुंतवणूकदाराला स्वतःच शेअर्सचे ट्रेडिंग करण्याची संधी मिळाली. पूर्वी शेअरमधल्या गुंतवणुकीसाठी ब्रोकरवर आणि त्याच्या सल्ल्यावर अवलंबून राहावे लागायचे. इंटरनेट आणि नेट बँकिंगमुळे गुंतवणुकीसंबंधी माहिती सहज उपलब्ध व्हायला लागली. पण या सगळ्याचा फायदा उठवणारा वर्ग हा शहरी तर होताच पण त्यातही इंटरनेटची सुविधा उपलब्ध असणारा आणि ते वापरता येणारा तरुणवर्ग जास्त होता. ह्याच दशकात I T च्या क्षेत्रात क्रांती झाली. सेवाक्षेत्र नव्याने उदयाला आले आणि याचा लाभ होऊन नव्याने श्रीमंत झालेला वर्ग देशभरात निर्माण झाला. या वर्गाकडे गुंतवणुकीसाठी उत्पन्न होते आणि गुंतवणुकीची त्यांची मानसिकता होती .

याच काळात म्युच्युअल फंडांचा पर्याय उपलब्ध झाला. त्याला मात्र थेट शेअर बाजारातील गुंतवणुकीपेक्षा अधिक चांगला प्रतिसाद मिळाला कारण यामध्ये असणारी रिस्क मर्यादित होती. परत शेअर बाजारातल्या गुंतवणुकीवर लक्ष ठेवावे लागते, किमतीमधले चढउतार पाहावे लागतात, तसे कुठलेही प्रयत्न म्युच्युअल फंडातल्या गुंतवणुकीमध्ये करावे लागत नाहीत म्हणून मध्यमवर्गाला म्युच्युअल फंडांचा पर्याय अधिक सोयीचा वाटला. प्रत्यक्ष शेअर बाजारातल्या गुंतवणुकीपेक्षा इथली गुंतवणूक अधिक सुरक्षित वाटली आणि मध्यमवर्गाने याला चांगला प्रतिसाद दिला.

१९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत जे बदल झाले, जी वेगवान आर्थिक प्रगती झाली त्याचाच एक भाग म्हणून पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर उभ्या राहायला लागल्या. रोटी–कपडा–मकान या तीन मूलभूत गरजांमधली मकान ही गरज भागवणे अधिकाधिक महाग होऊ लागले. निम्न आर्थिक स्तरातल्या लोकांसाठी स्वत:ची जागा घेणे हा आयुष्यातला मोठा प्रश्न होता, त्याचबरोबर राहायला जागा आहे पण गुंतवणूक म्हणून जागेमध्ये रस असणारा वर्गही याच वेळी उभा राहत होता. महाराष्ट्रात पुण्यामध्ये किंवा पुण्याच्या जवळच्या परिसरामध्ये अनेकांनी निवृत्तीनंतर राहण्यासाठी जागेमध्ये गुंतवणूक केली. पण ही गुंतवणूक करणारा वर्ग हा उच्च मध्यमवर्गातला होता. याच वर्गाने मग नुसता प्लॉट घेणे अशा प्रकारच्या गुंतवणुकासुद्धा स्वीकारल्या. पण गुंतवणुकीच्या पर्यायांमधली विविधता ही एका विशिष्ट सामाजिक आणि आर्थिक स्तरापुरती मर्यादित राहिली.

कुठल्याही गुंतवणुकीचे एक तत्त्व असे की गुंतवणूक ही विविध पर्यायांमध्ये करावी (Diverse Portfolio) कारण एकाच बास्केटमध्ये सगळी अंडी ठेवली तर धोका जास्त. अशी diverse स्वरूपाची गुंतवणूक ग्रामीण भागामध्ये आपल्याला दिसणार नाही त्याची अनेक कारणे आहेत. ग्रामीण भागातला मोठा वर्ग हा नियमित उत्पन्न नसणारा आहे. गुंतवणुकीसाठी जी कागदपत्रे किंवा इतर



कुठल्याही गुंतवणुकीचे एक तत्त्व असे की गुंतवणूक ही विविध पर्यायांमध्ये करावी (Diverse Portfolio) कारण एकाच बास्केटमध्ये सगळी अंडी ठेवली तर धोका जास्त. अशी diverse स्वरूपाची गुंतवणूक ग्रामीण भागामध्ये आपल्याला दिसणार नाही त्याची अनेक कारणे आहेत. ग्रामीण भागातला मोठा वर्ग हा नियमित उत्पन्न नसणारा आहे. गुंतवणुकीसाठी जी कागदपत्रे किंवा इतर औपचारिकता पार पाडाव्या लागतात त्या त्यांच्यासाठी कठीण आहेत आणि सर्वात महत्त्वाचे कारण हे आहे की या वर्गाला सोयीच्या असणाऱ्या गुंतवणूक पर्यायांची कमतरता आहे. म्हणूनच या वर्गाचा बचतीकडे कल असला तरी गुंतवणुकीची तयारी अजूनही मर्यादित आहे. ही मानसिकता बदलायला वेळ लागेल. गुंतवणुकीबद्दल अत्यंत सावध असणारा समाज गुंतवणुकीचा कुठलाही पर्याय पारखूनच घेणार.

औपचारिकता पार पाडाव्या लागतात त्या त्यांच्यासाठी कठीण आहेत आणि सर्वात महत्त्वाचे कारण हे आहे की या वर्गाला सोयीच्या असणाऱ्या गुंतवणूक पर्यायांची कमतरता आहे. म्हणूनच या वर्गाचा बचतीकडे कल असला तरी गुंतवणुकीची तयारी अजूनही मर्यादित आहे. ही मानसिकता बदलायला वेळ लागेल. गुंतवणुकीबद्दल अत्यंत सावध असणारा समाज गुंतवणुकीचा कुठलाही पर्याय पारखूनच घेणार. ग्रामीण समाज असो किंवा शहरी असो, आपल्या गुंतवणुकीवर उत्तम लाभ झाला तर तो प्रत्येकाला हवा आहे. पण समाज उदाहरणांमधून शिकत असतो. शेअर बाजारातले चढउतार आणि तिथे मिळणाऱ्या लाभाची अनिश्चितता आपण पाहतो आणि म्हणून त्यापासून लांब राहतो. १९९० च्या दशकात गुंतवणुकीच्या काही नवीन योजना आल्या होत्या. उदाहरणार्थ, तुम्ही गुंतवलेल्या पैशांमधून झाडे लावली जातील आणि त्या झाडांचा उद्योगधंद्यामध्ये कच्चा माल म्हणून उपयोग होईल. आपण गुंतवलेली रक्कम काही वर्षांत दुप्पट-तिप्पट होईल अशा त्या योजना होत्या. या योजनांना सुरुवातीला उत्साही प्रतिसाद मिळाला, पण यातल्या बहुतेक योजना फसल्या आणि अनेक गुंतवणूकदारांचे आर्थिक नुकसान झाले. यामुळे मग अशा प्रकारच्या योजनांपासून लांब राहण्याची मानसिकता निर्माण झाली. आपल्या देशामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून १९९१ पर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये सामाजिक उपक्रमांचा प्रभाव होता, खाजगी उपक्रम हे नफेखोर असतात आणि फसवणूक करणारे असतात अशी आपली मानसिकता अजूनही आहे. काही खाजगी कंपन्यांनी हा विश्वास सार्थही केला आहे. सरकारी क्षेत्रातले पैसे बुडणार नाहीत असे अजूनही आपल्यापैकी अनेकांना वाटते. खाजगी कंपन्यांकडे गुंतवणुकीसाठी वळणारा वर्ग हा अधिक उत्पन्नगटातला, अधिक सुशिक्षित आणि धोका पत्करण्याची अधिक तयारी असणारा आहे. गुंतवणुकीचे वेगवेगळे पर्याय जेव्हा उपलब्ध होतील आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल लोकांना विश्वास वाटेल तेव्हाच मोठ्या प्रमाणावर लोक गुंतवणुकीचे वेगवेगळे पर्याय स्वीकारतील. अनेक वेळा प्राप्तीकर वाचवण्यासाठी काही योजना येतात. या योजनांना उत्तम प्रतिसाद मिळतो. पायाभूत सुविधा उभ्या करणाऱ्या प्रकल्पांसाठीचे भांडवल उभे करण्यासाठी सर्वसामान्य माणसाला गुंतवणुकीचे पर्याय देत येऊ शकतात असे काही प्रयत्न पूर्वी यशस्वी झाले, पण उभा राहणारा प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, त्याचे काम योग्य पद्धतीने चालू होणे या गोष्टी झाल्या नाहीत तर तिथे केलेल्या गुंतवणुकीवर लाभ गुंतवणूकदाराला होणार नाही आणि अशा पर्यायांपासून तो दूर राहील. तंत्रज्ञानाची प्रगती, माहितीची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता यामुळे गुंतवणूकदारांची मानसिकता, मग तो शहरी असो वा ग्रामीण, बदलायला लागली आहे. या दोन्ही गटांतल्या मानसिकतेमधला फरक कमी होऊ लागला आहे. पण तो पूर्णतः जाणार नाही कारण या दोन्ही समाजगटांच्या गरजा वेगवेगळ्या आहेत. विविध गरजा असणाऱ्या गटांना गुंतवणुकीचे विविध सोपे आणि सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देण्याचे आव्हान आपल्या आर्थिक व्यवस्थेपुढे आहे.

**- सुप्रिया देवस्थळी** (ICAS)
संचालक (वित्त)
वायदा बाजार आयोग
भ्रमणध्वनी : ७७३८५९१२२२
supsdk@gmail.com

## शेअर निर्देशांकातील गुंतवणूक

| वर्ष | निर्देशांक | गुंतवणूक रुपये |
|---|---|---|
| १९७९ | १०० | १ लाख |
| २०१४ | २६,५००* | २.०५ करोड |

**गेल्या ३५ वर्षात मुंबई शेअर बाजार निर्देशांकाने अंदाजे २०% उत्पन्न दर दिला**

**खालील आपत्ती येऊनही गुंतवणुकीवर प्रदीर्घ काळात झालेला लाभ...**

- २ युद्धे
- ३ मोठे आर्थिक घोटाळे
- अमेरीकेतील मंदी
- २ पंतप्रधानांवर प्राणघातक हल्ले
- ३ मंदीचे काळ
- अमेरीकेतील ९/११ हल्ला
- १० वेगवेगळी सरकारे
- नैसर्गिक आपत्तीचे हाहाकार




१ मार्च २०१५ रोजी सर्जन डॉ. रोहित दंडवते व डॉ. वर्षा दंडवते यांच्या नालासोपारा येथील सुश्रूत हॉस्पिटलला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने बालाजी बँक्वेट हॉलमध्ये एक हृद्य सोहळा पार पडला. त्यांना ज्या गुरूंमुळे हे यश मिळाले त्या शिक्षकांची समाजाला ओळख करून देऊन, त्यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. यात डॉक्टरांचे सर्जरी विषयाचे शिक्षक डॉ. अमित मायदेव, डॉ. पांडे, डॉ. माया तुळपुळे व संगीतशिक्षक सौ. पंडित, श्री. व सौ. आपटे यांचा समावेश होता. त्यानंतर डॉ. वर्षा दंडवते यांनी लिहिलेल्या 'डॉक्टरांच्या जगात' या पुस्तकाचे प्रकाशन पद्मश्री डॉ. अमित मायदेव यांच्या हस्ते झाले. गेल्या २५ वर्षांच्या वैद्यकीय व्यवसायातील अनुभवांवर आधारित हे पुस्तक समाजमनाचा आरसा आहे स्त्री-पुरुष विषमता, डॉक्टर-रुग्णसंबंध, रुग्णांची जबाबदारी, डॉक्टरांच्या मर्यादा, डॉक्टर एक माणूस अशा विविध विषयांवर ह्या पुस्तकाने वाचकाला विचारप्रवृत्त केले आहे. कार्यक्रमात हॉस्पिटलच्या कर्मचारीवर्गाचा सत्कार व त्यानंतर पुण्यातील डॉक्टरांच्या सांगीतिक सादरीकरणाने हा अनोखा रौप्यमहोत्सव संपन्न झाला.

---

ग्रंथाली




## आंदकोळ – किसन चव्हाण

सांगून थांबत नाही तर व्यवस्थेशी लढायला शिकवतो आणि म्हणूनच हे आत्मकथन फक्त लेखकापुरते मर्यादित रहात नाही तर व्यवस्थेनं वर्षानुवर्षे दाबलेल्या, पिचलेल्या बहुसंख्य शोषितांचं व उपेक्षितांचं होतं. जीवन जगावं कसं? रडत-रडत, कुढत-कुढत की लढत-लढत असं जीवन जगण्याचं तत्वज्ञान मांडणारं हे आत्मकथन रडगाणं ठरत नसून जीवनगाणं ठरतं.

किसन चव्हाण याचं हे आत्मकथन संक्रमित व कालक्रमिक असून भारदस्त व प्रसंगनिष्ठ आहे त्यासाठी वापरलेली सत्यनिष्ठ, वाचकप्रिय आणि परिवर्तनवादी भाषा समिक्षकांनाही अंतर्मुख करणारी ठरेल. तथागत गौतमबुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि महापुरूषांना अभिप्रेत असणाऱ्या पुरोगामी विचारालाही हे आत्मकथन निश्चितच प्रेरक ठरेल यात शंका नाही.

**मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.**

---

**ग्रंथाली वाचकदिन १५ मार्च २०१५**

**स्थळ : बालगंधर्व कलादालन, पुणे**

**वेळ : दुपारी ४.३० ते रात्री ८.३०**

पुस्तक प्रकाशन – **आंदकोळ** आणि **तिचे दोन डोळे**

**दि.बा. मोकाशी यांच्या साहित्यावर आधारीत परिसंवाद**

सहभाग – **ज्योती कानेटकर, डॉ. रेखा इनामदार, डॉ. गजानन अपिने, प्रा. रूपाली शिंदे**

चित्रकार – **सुहास बहुळकर** लिखित **'बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले'**

प्रकाशन हस्ते – प्रसिद्ध व्यंगचित्रकार **शि.द. फडणीस** ● मुलाखतकार **आनंद हर्डीकर**

# जमीन अधिग्रहण आणि लोकसंख्या

**धनंजय गांगल**



'अनलेस यू मेजर यू कॅन नॉट मॅनेज' हे पाश्चात्य व्यवस्थापनाचे मूलभूत सूत्र. त्यामुळे सतत मोजत राहणे हेच छंद असल्यासारखे जोपासले जाते. फक्त दोन रुपयांच्या दूरध्वनी संभाषणात कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांचे ३-४ प्रकल्पांवर जुजबी बोलणे झाले असेल तरी त्या त्या प्रकल्पाच्या खर्चात ते दोन रुपये विभागून टाकण्याकडे कल असतो. बऱ्याचदा या लेखाजोख्याचा खर्चच प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त असतो! पण मूलभूत सूत्र - सतत मोजमाप करत राहणे! मग त्यात अमूर्त गोष्टीही आल्या. ज्यांचे मोजमाप सहज शक्य नाही. त्याचाच एक भाग म्हणजे स्वॉट ॲनालिसिस. अनेक कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या विभागांनी आपापला SWOT मांडणे अपेक्षित असते. SWOT म्हणजे स्ट्रेंग्थ, विकनेस, ऑपॉर्च्युनिटीज आणि थ्रेट्स. आपल्या विभागाचे सामर्थ्य, बलस्थाने काय आहेत, उणिवा काय आहेत, पुढील वर्षभरात कुठकुठल्या संधी आहेत आणि कुठल्या कुठल्या संकटांची भीती कशापासून आहे याचा एक तक्ता. खरे तर ह्या अमूर्त गोष्टी. पण याही जमेल तेवढ्या मोजमापात बसवण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यातून काही हाताला गवसते का याचा लेखाजोखा घेतला जातो. वर्षभरातून एकदा हा सोहळा साजरा होतो. त्याची तयारी करण्यात आधीचे दोन आठवडे सर्वांचा जीव जातो. मुख्यतः गोंधळ असतो तो कुठली गोष्ट कुठल्या कप्प्यात टाकायची हे ठरवण्याचा? मांजर कशीही टाकली तरी पायांवरच पडते तसा कुठलाही मुद्दा सामर्थ्य, उणिवा, संधी आणि संकटाची भीती या प्रत्येक कप्प्यात योग्यच वाटतो! कॅलिडोस्कोपप्रमाणे वारंवार ह्या कप्प्यातून त्या कप्प्यात फिरवूनही समाधान होत नाही. शेवटी बॉस इज ऑलवेज राइट या तत्त्वावर तो जे सांगेल तसे टाकून त्या अग्निदिव्यातून सर्वांची सुटका होते!

पण उद्या आपल्या देशाचा स्वॉट ॲनालिसिस करायचा झाला, तर निःसंशयपणे 'प्रचंड लोकसंख्या' ही विकनेस आणि थ्रेट म्हणजे उणिवा आणि येऊ घातलेल्या संकटाची भीती या गटामध्ये टाकावी लागेल. दुर्दैवाने सगळेच राजकीय पक्ष, सामाजिक-राजकीय विश्लेषक, विचारवंत यांना ही स्ट्रेंग्थ आणि ऑपॉर्च्युनिटी म्हणजे सामर्थ्य आणि येऊ घातलेली संधी वाटतेय. त्याचे समर्थन म्हणून २०२०-२५ साली भारत हा सर्वाधिक तरुणांचा देश असेल हे गाजर दाखवले जात आहे. सतत विरोध, उपहास आणि सगळे वाईट आहे ह्या मानसिकतेची जशी नशा असते तशीच उणिवा आणि येऊ घातलेल्या संकटाकडे दुर्लक्ष करून सतत सकारात्मक बोलण्याचीही एक नशा असते. त्यासाठी सोयीस्कर अशी सामाजिक प्रश्नांची मांडणी आणि विश्लेषण हेही करावे लागते. एक खोटे लपवण्यासाठी दुसरे झूट अशी मालिकाच तयार होते. गेली तीन दशके समाज-स्वास्थ्याच्या दृष्टीने ऐरणीवर असणारा प्रश्न म्हणजे विकास! विकासासाठी जमीन अधिग्रहण आणि त्याला सातत्याने होणारा विरोध. त्यामुळे वाढणारा प्रकल्पांचा खर्च. त्याची मुळे या अमर्याद लोकसंख्यावाढीत आहेत.

लोकशाहीत ह्या विकासाचे जास्तीत जास्त फायदे आणि वाटा आपल्याला मिळावा आणि तोटे मात्र दुसऱ्यांकडे जावेत यासाठी सर्वांची धडपड चालू आहे. एकट्याने जमत नाही म्हणून धर्म, जात, प्रांत, भाषा, आर्थिक वर्ग अशा वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारे एकत्र येऊन हा प्रयत्न अव्याहत चालू असतो. वेगवेगळ्या अस्मिता ही ह्याचीच रूपे आहेत. देशाच्या विकासात आपल्या गटावर अन्याय होतोय आणि फायदे दुसरेच घेत आहेत ही भावना कोणत्या ना कोणत्या अस्मितेच्या स्वरूपात धगधगत ठेवणे गरजेचे असते.

महाराष्ट्रात जमीन-अधिग्रहणावरून लवासा आणि नंतर जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला झालेला विरोध सर्वश्रुतच आहे. त्या आधी उरण-पनवेलजवळचा सेझ प्रकल्प व्यापारात अत्यंत धूर्त समजल्या जाणाऱ्या रिलायन्सला अशाच विरोधामुळे सोडून द्यावा लागला. हरियानातील त्यांच्या दुसऱ्या एका सेझचीही हीच स्थिती आहे. तमिळनाडूत कुडानकुलम अणुऊर्जा प्रकल्पाला झालेला विरोध ही असाच. नंदीग्राम सिंगूर येथल्या टाटाच्या नॅनो प्रकल्पाला झालेल्या विरोधाची परिणती डाव्यांचे सरकार जाण्यात झाली. अशी अनेक उदाहरणे आहेत. पण ८०-९० च्या दशकांतील चिपको आणि नर्मदा बचाव आंदोलनाने हा प्रश्न देश आणि जागतिक पातळीवर नेला. अशा प्रकल्पांचा फायदा बाहेरच्या लोकांना होतो ही स्थानिकांची सर्वदूर भावना. बंगलोर विमानतळ शहराबाहेर जमीन अधिग्रहण करून बांधला तेव्हाही त्याला विरोध याच कारणावरून झाला की इथे मुंबई-पुण्याचे संगणक तंत्रज्ञ येऊन पैसे कमावतील - आम्हाला काय मिळणार? आज पुण्या-मुंबईसारख्या शहरांतून बाहेर टाकल्या जाणाऱ्या कचरा डम्पिंगला तेथल्या रहिवाशांचा

विरोध आंदोलनातून बाहेर पडताना दिसतो. ५०च्या दशकात – आधुनिक भारताची देवळे अशा ज्या भाक्रा-नांगल धरणांचा उल्लेख पंडित नेहरूंनी अभिमानाने केला तेव्हाही विस्थापन झालेच. क्षीण प्रमाणात का होईना त्यांचा विरोध आजही कोर्टात प्रलंबित आहे. तेव्हा विरोधाचे आंदोलनात रूपांतर करण्याची आजच्यासारखी रचना सहज उपलब्ध नव्हती. प्रसारमाध्यमे नव्हती. स्वयंसेवी संस्थांचे जाळे नव्हते. मुख्य राजकीय पक्ष काँग्रेस, जो सत्तेत होता. डावे, समाजवादी आणि जनसंघ यांची ताकद क्षीण होती. अनेक प्रादेशिक पक्षांचा जन्म व्हायला अजून खूप अवकाश होता. शिवाय स्वातंत्र्य मिळाल्याचा उत्साह आणि 'हम होंगे कामयाब' असे भारलेले वातावरण होते. आणीबाणी आणि नंतर कोसळलेल्या जनता सरकार यांनी ते सगळे बदलले.

या प्रश्नाला अनेक आयाम आहेत. जमीन अधिग्रहण, त्याची योग्य किंमत, विस्थापन, रोजगार आणि पर्यावरणाची हानी. ज्या प्रकल्पासाठी जमीन घेतली त्यासाठीच त्याचा वापर होतो आहे का आणि त्या विकासात विस्थापिताला भविष्यात कायम-स्वरूपी वाटा मिळेल काय? सोन्याचा इतर दागिना आणि मंगळसूत्र यात एक भावनिक फरक आहे. जवळपास तीच भावना विस्थापितांसाठी आपल्या शेतजमिनीबद्दल असते. स्थलांतराच्या बदल्यात मिळालेल्या पैशांतून जवळपास कुठे जमीन विकत घेण्याचा प्रयत्न केला तर तिथल्या किमती आधीच वाढलेल्या असतात. जमिनीची भरपाई दुप्पट-चौपट केली तर जवळपासच्या जमिनीच्या किमतीही त्या प्रमाणात वाढतात. गरजेपेक्षा जास्त जमीन अधिग्रहण करणे, काही काळानंतर ती भलत्याच कामासाठी वापरणे, वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवून प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करणे हेही चालू असते. दुसरीकडे एवढी भरपाई आणि वेळ घालवून प्रकल्प व्यवहार्य होतील का ही भीती प्रकल्पकर्त्याला असते. गेल्या दोन वर्षांत अनेक हायवेंसाठी टेन्डर घ्यायला कोणी पुढे आलेले नाही.

धावा काढताना जितक्या जास्त तितके चांगले, पण मुलांचे मात्र तसे नाही! असे दीड-दोन दशकांपूर्वी सुनील गावस्करने दूरदर्शनवरून आपल्याला वारंवार बजावले. कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगणाऱ्या या जाहिरातीचा वसा वहिवाटेने खरे तर सचिनकडे यायला पाहिजे होता, पण एकूणच सर्वच पक्षांच्या सरकारांनी टप्प्याटप्प्याने कुटुंबनियोजनातील लक्ष काढून घेतले आणि अशा कुटुंब-नियोजनाच्या सरकारी जाहिरातीही बंद झाल्या. कुटुंबनियोजनाला कुठलाच धर्म उघड विरोध करत नसला तरी ते मनापासून अनुकूल नाहीत हे वास्तव आहे. देवाच्या देणगीत आपण ढवळाढवळ करणे योग्य नाही असाच भावनिक पवित्रा आहे. दुसरीकडे स्त्री-विषयक प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांचा आणि कार्यकर्त्यांचा अनुभव हा की- एक किंवा दोन पुरेत हे वरवर आकर्षक वाटले तरी भारतीय मानसिकतेत त्याचा सोयीस्कर अर्थ एक किंवा दोन मुलगे असा लावून प्रत्यक्षात स्त्रीभ्रूणहत्येला अजाणता मदतच होते – त्यामुळे सरकारी सरधोपट कुटुंबनियोजन कार्यक्रमाला त्यांचाही विरोध आहे. त्यावर उपाय म्हणून लोकशिक्षण किंवा इंग्रजीत सेन्सिटाइझ असे शब्द योजण्यात येतात म्हणजे साध्या शब्दांत 'काही करू नका' अशीच भूमिका आहे. अशा वैचारिक दृष्ट्या विरुद्ध ध्रुवांवर असणाऱ्या दोनही टोकांचा फारसा उत्साह नसताना कुठले सरकार त्यात लक्ष घालेल?

१९४०-५० च्या स्वातंत्र्य मिळण्याच्या दशकांत लोकसंख्या आणि वाढीचा वेग १.३% एवढा कमी असल्याने तेव्हा त्याचे गांभीर्य लक्षात आले नाही. ते यायला ७० चे दशक उजाडावे लागले. दुर्दैवाने आणीबाणीत संजय गांधी यांनी लादलेला नसबंदी कार्यक्रम अनेक कारणांनी बदनाम झाला आणि त्याबरोबर कुटुंबनियोजनही बदनाम झाले. ७७च्या निवडणुका काँग्रेस उत्तर भारतात हरण्याचे हेही एक महत्त्वाचे कारण मानले जाते. त्यानंतर बहुतेक राजकीय पक्षांनी हा विषयच आपल्या कार्यक्रमपत्रिकेतून बाद करून टाकला. शिवाय स्वातंत्र्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी एकूणच वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर उद्बोधन करणे वगैरे असल्या निरुपद्रवी गोष्टी सोडून फक्त निवडणुकांच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले. असलाच तर,



जमीन अधिग्रहण, त्याची योग्य किंमत, विस्थापन, रोजगार आणि पर्यावरणाची हानी. ज्या प्रकल्पासाठी जमीन घेतली त्यासाठीच त्याचा वापर होतो आहे का आणि त्या विकासात विस्थापिताला भविष्यात कायमस्वरूपी वाटा मिळेल काय? सोन्याचा इतर दागिना आणि मंगळसूत्र यात एक भावनिक फरक आहे. जवळपास तीच भावना विस्थापितांसाठी आपल्या शेतजमिनीबद्दल असते.

उद्बोधनाऐवजी चिथावण्याकडेच सहसा कल असतो. आज भारताची लोकसंख्या साधारण १२५ कोटींच्या आसपास असेल. लोकसंख्यावाढीचा वेग साधारण २-२.५% आहे. म्हणजे आजही मृत्यूपेक्षा जन्माचा वेग जास्त आहे. लोकसंख्यावाढीचा वेग कमी झाला असला तरी लोकसंख्या वाढतेच आहे. दर महिन्याला भारतात साधारण १० लाख जीवांची भर पडते. आज चीननंतर लोकसंख्येत भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२०-२५ सालापर्यंत चीनच्या लोकसंख्येला पार करून भारत पहिल्या क्रमांकावर असेल! दुर्दैवाने अतिउत्साहात तेच आपले बलस्थान असेल अशी मांडणी केली जाते आहे.

२०२०-२५ साली भारत हा सर्वाधिक तरुणांचा देश असेल म्हणून ढोल बडवण्याचा फाजील उत्साह कुठल्या आधारावर चालतो? या तरुणांना भूक नसेल की आकांक्षा नसतील? त्यांना रोजगार कुठून उत्पन्न होणार? शिवाय २०-२५ साली सर्वाधिक तरुणांचा देश म्हटल्यास- त्याच न्यायाने - ५ दशकानंतर सर्वाधिक वयस्कारांचाही देश असेल! त्यामुळे यापुढे एवढ्या प्रचंड लोकसंख्येच्या गरजा पुरवण्यासाठी मोठे प्रकल्प अटळ आहेत. लोकशाहीत ती मागणी लोकांकडूनच येणार. त्यासाठी मोठ्या प्रमाणात जमीन अधिग्रहण अटळ आहे आणि फायदे दुसऱ्यांना, मग तोटे आणि त्रास आम्ही का सहन करायचा असे म्हणत त्याला विरोध होणार. त्यात स्थानिक पक्ष आणि देश-विदेशातील लॉबी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष मदत करणार आणि मोठा संघर्ष होणार हे आता अटळ आहे. वेगवेगळ्या कायद्याची कलमे आणि अंमलबजावणी यात गरजेप्रमाणे बदल करून या संघर्षाची तीव्रता कमी करणे शक्य आहे, पण संघर्ष टाळणे आता अशक्य. त्यासाठी हा गुंतागुंतीचा संघर्ष आणि त्याचे राजकारण समजून घेण्याची मानसिकता अंगी बाणवली पाहिजे. विळा-हातोडा म्हणजेच फक्त शेतकरी/कामगार आणि राजकारणी हे खलनायक आणि त्यांना निवडून देणारे मतदार मात्र गरीब बिच्चारे; निवडणुका म्हणजे लोकशाही पण सत्ता स्थापन करणे म्हणजे संधिसाधुपणा आणि काहीच नाही तर या सगळ्याशी आपला काय संबंध, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. आज अनेक घरांत वृत्तपत्र येते पण ते वाचले जाते असे नाही. सभोवताली घडणाऱ्या घटनांवर तावातावाने तर दूरच पण साधी चर्चाही होत नाही. व्हॉट्स ॲप आणि फेसबुकवरही सहसा वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि तत्सम काही ललित इकडून तिकडे फिरत असते.

विकास विकास म्हणजे तरी नक्की काय? आसपासच्या अमूर्त स्वरूपात दडलेल्या गुणधर्माचे मानवाला उपयुक्त आणि उपभोग्य स्वरूपात परिवर्तन करणे. त्यासाठी शेती करणे ही एक आदिम काळापासून चालत आलेली परंपरा हे एक टोक, आणि उत्पादनाचे यांत्रिक कारखाने हे दुसरे टोक. ते स्वयंभू नाहीत. त्यांना यशस्वी होण्यासाठी अनेक सुविधा लागतात. मग त्यासाठी जसे रस्ते, पूल, लोहमार्ग, वीज, पाणी, धरणे तसे प्रदूषणही आलेच. काम करणारी माणसे आली. त्यांना राहायला घरे, वैद्यकीय सुविधा, शाळा, महाविद्यालये सगळेच आले. याला जमीन लागणार. त्यात निसर्गाचा वेगवेगळ्या प्रकारे ऱ्हास होणार. त्यातून सुटका नाही. तो कमीत कमी कसा होईल यासाठी प्रयत्न करणे शक्य आहे, पण निसर्गही टिकवू आणि विकासही साधू अशी जादू अजून स्वप्नवतच आहे.

'अ फ्यू गुड मेन' चित्रपटात कोर्ट मार्शल प्रकरणात उलट तपासणीत वकील टॉम क्रुझ चिडून साक्षीदार जेक निकल्सन याला म्हणतो, टेल मी द ट्रुथ कर्नल, टेल मी द ट्रुथ! मला सत्य सांग. आणि कर्नल जेक निकल्सन छद्मीपणे उत्तर देतो, यु कान्ट हँडल द ट्रुथ! सत्य पचवण्याची तुझ्यात ताकदच नाही तर काय सांगणार!


**- धनंजय गांगल**


भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०

dhananjay.gangal@gmail.com



ग्रंथाली

## स्त्रिया आणि दहशतवाद - डॉ. अंजली रानडे




मराठीत प्रथमच 'स्त्रिया आणि दहशतवाद' या विषयाचा घेतलेला वेध. दहशतवादाच्या व्यामिश्र जगात स्त्रियांचे स्थान काय, त्यात त्या स्वेच्छेने सहभागी होतात की त्यांच्यावर बळजबरी केली जाते, त्या संघटनेत कोणकोणत्या स्तरांवर कार्यरत असतात, त्या संघटनेत सर्वोच्च पदावर पोचतात की संघटना त्यांचा आपल्या स्वार्थासाठी फक्त वापर करून घेते, या विषयी अत्यंत वेधक माहिती या पुस्तकात मिळते.

याबरोबरच या पुस्तकात विविध देशांतील महत्त्वाच्या दहशतवादी संघटनांमधील स्त्रियांच्या सहभागाचा आढावा घेतलेला आहे. त्यात स्त्रियांच्या सहभागाचे विविध पैलू दिसतात. श्रीलंकेतील तामिळ ईलम स्थापनेसाठी संघटनेत येणाऱ्या स्त्री दहशतवादी, रशिया व इस्त्राएलविरुद्ध लढणाऱ्या चेचेन व पॅलेस्टाइनी दहशतवादी हा एक पैलू, इराकमधील मुद्दाम घडवून आणलेल्या बलात्कारांमुळे दहशतवादी बनवलेल्या स्त्रिया हा दुसरा पैलू, तर युगांडा आणि सिएरा लिऑनमधील पळवून नेलेल्या, जिवाच्या भीतीने 'दहशतवादी' बनलेल्या स्त्रिया हा आणखी एक पैलू. यातून मिळणारी माहिती कधी आश्चर्यकारक, कधी मती गुंग करणारी, कधी धक्का देणारी तर कधी हृदय हेलावून टाकणारी! प्रत्येकाने वाचायलाच हवे असे पुस्तक.

**मूल्य २५० रु.**

**सवलतीत १५० रु.**

# सोन्या-चांदीचे भाव कुठपर्यंत?

## आशीष अरविंद ठाकूर



अर्थकारण व राजकारण हे हातात हात घालून चालत असतात. पूर्वीच्या एकसंघ असलेल्या रशियाचे विभाजन करून युक्रेन देशाची निर्मिती झाली. याच युक्रेनची सीमा रशियाच्या नजीक आहे व तिथे रशियन लोक बहुसंख्येने राहतात, त्यांच्यावर युक्रेन अन्याय करत आहे असे कारण सांगत तो भाग रशियाने आपल्या साम्राज्याला जोडला. तेव्हा प्रश्न होता, रशियाच्या साम्राज्यविस्ताराला वेसण कशी घालायची? रशियाच्या या 'मसल पॉवर'ला रोखण्यासाठी 'अर्थास्त्राचा' आधार घेण्यात आला व त्यातही अचूक निशाणा साधणारे 'तेलास्त्र' निवडण्यात आले.

'तेलास्त्र' का निवडण्यात आले?

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी ही दोन अर्थव्यवस्थांधारित विचारसरण्यांवर झाली.

एक, भांडवलशाही विचारसरणी (कॅपीटॅलिस्ट) आणि दुसरी, समाजवादी, साम्यवादी विचारसरणी (कम्युनिस्ट)

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे प्रमुखपद अमेरिकेकडे आले व साम्यवादी अर्थव्यवस्थेचे प्रमुखपद पूर्वीच्या एकसंघ रशियाकडे आले. हे दोन्ही देश लष्करीदृष्ट्या बलवान आणि तोडीसतोड असल्यामुळे उभयंतांमध्ये प्रत्यक्ष युद्धापेक्षा आपल्या कंपूतील एका देशाला प्यादे बनवून युद्ध (शीतयुद्ध) अथवा आर्थिक युद्धे सुरू झाली.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल जे दररोज नवनवीन नीचांक मारत आहे त्याकडे या दृष्टिकोनातून बघितले पाहिजे.

गेली तीन दशके अमेरिका हा 'तेलापिपासू' देश होता. किंबहुना त्या अगोदर 'कच्चे तेल' हाच केंद्रबिंदू मानून युद्धे लढली अथवा लढवली गेली. त्यात प्रामुख्याने १९६० च्या उत्तरार्धातील अरब-इस्राएल युद्ध, १९८० चं इराण-इराक युद्ध, १९८९-९० चे इराक-कुवेत युद्ध व शेवटचे २१ व्या शतकातील सद्दामकडे आण्विक, रासायनिक शस्त्रे आहेत असे सांगून, सद्दाम हा जागतिक शांततेला धोका आहे हे सांगून केलेले इराक युद्ध. त्यावेळेला अमेरिकेला आंतरराष्ट्रीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर तेलाची आवश्यकता भासत होती. कच्चे तेल हीच आपली कमकुवत बाजू आहे, दुखरी नस आहे हे ओळखून तेव्हापासून अमेरिकेने पर्यायी व्यवस्था शोधण्यास सुरुवात केली. त्या पर्यायी व्यवस्थेस यश यायला लागले व 'तेलपिपासू' देश एकदम 'तेलउदासीन' राष्ट्र झाले. हे अमेरिकेच्या बाबतीत झाले, तर जगात इतरत्र उद्योगधंद्यांमध्ये मंदी अथवा क्षीण स्वरूपाचा विकास, वृद्धी होत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाची मागणी एकदम घटली व भाव कोसळायला लागले.

**अमेरिकेने तेलाला शोधलेले पर्याय**

१) समुद्राच्या तळाशी असलेल्या दगडा, खडकांच्या संधीकपारीतून तेलजन्य पापुद्रे शोधून त्यावर प्रक्रिया करून तेल मिळवणे.

२) आपली मित्र राष्ट्रे कॅनडा, मेक्सिकोच्या आखातात तेल शोधण्याची मोहीम व त्या मोहिमेत मोठ्या तेलसाठ्यांचा शोध लागणे.

३) कच्च्या तेलाला पर्याय म्हणून अपारंपरिक ऊर्जास्रोतांवर जास्तीत जास्त भर देणे. उदा. सौरऊर्जा.

या सर्व पर्यायांना यश येऊन 'तेलपिपासू' देशाचे परिवर्तन तेल उदासीकरणात झाले व त्याच काळात रशियाला दुर्बुद्धी सुचून त्यांनी युक्रेनवर आक्रमण केलं. हे निमित्त पुढे करून 'तेलास्त्र' वापरण्यात आले.

'तेलास्त्र' निवडताना देखील 'एका दगडात दोन पक्षी मारता येतील' हे लक्ष्य ठेवण्यात आलं.

१) आंतरराष्ट्रीय दहशतवादाला जी राष्ट्रे उघडपणे अथवा छुपी मदत करतात त्या देशांची अर्थव्यवस्था ही तेलाधारित आहे तेव्हा उत्पन्नाच्या मूळ स्रोतांवरच घाव घालण्यात आला की, त्या राष्ट्रांची आर्थिक विंवचना सुरू होऊन त्यांची आर्थिक व्यवस्था डळमळीत होईल व दहशतवादाला सढळहस्ते होणाऱ्या मदतीवर बंधन येऊन दहशतवादाचा आर्थिक कणा कमकुवत होईल.

२) रशियाची अर्थव्यवस्था तेलाधारित असल्याने व निर्यातीत ८०% हे कच्चे तेल असून ते उत्पन्नाचं प्रमुख स्तोत्र आहे. अमेरिकेच्या तेलास्त्रवापरामुळे रशियाच्या आर्थिक नाड्या आवळून रशियाचे 'नाक दाबलं की तोंड उघडण्याचा' प्रत्यय येत आहे.

या सर्व आंतरराष्ट्रीय, आर्थिक व राजकीय घडामोडींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मकच परिणाम होत आहे.

आपल्या आयातीमध्ये आजही ७० ते ८०% वाटा हा कच्च्या तेलाचा आहे व अजूनही स्मृतीत असलेला ११० डॉलर प्रती बॅरल भाव गेल्या दोन ते तीन महिन्यांत अर्ध्याहून जास्त खाली आला (४७ डॉलर प्रती बॅरल) त्यामुळे आयात स्वस्त झाली आहे. दुसऱ्या बाजूला परेदशस्थ गुंतवणूकदार संस्थांनी भारतीय भांडवली बाजारात खरेदीचा सपाटा लावल्यामुळे डॉलरचा ओघ वाढला व चलनविनिमय दरात रुपया सशक्त झाला. त्याच्या दृश्य परिणाम म्हणजे चालू खात्यावरील तूट (करंट अकाउंट डेफिसिट) चिंताजनक परिस्थितीतून संतोषजनक परिस्थितीत आली. आताच्या घडीला स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारताची परकीय चलन गंगाजळी ३२ हजार कोटी डॉलरवर पोचली आहे. त्याचा परिणाम सोन्याच्या आयातीवरील कडक निर्बंध शिथिल करण्यात झाला.

**भारताची दुसरी समस्या म्हणजे आर्थिक तूट (फिस्कल डेफिसिट टू जी.डी.पी.)**

गेली आठ ते दहा वर्षे कच्चे तेल आपण ८० ते ११० डॉलर प्रती बॅरल बघत आहोत. सद्य स्थितीतील ५० डॉलर प्रती बॅरल हा भाव २००३-२००४ मध्ये होता. तेव्हा पेट्रोलचा भाव ५० रुपयांच्या आसपास होता. आजही भाव ५० डॉलर प्रती बॅरलच्या खाली असताना पेट्रोल ६६ रुपयांच्या आसपास आहे. (हा भाव २६ जानेवारीचा आहे) व यातही ग्यानबाची मेख म्हणजे तेल स्वस्त होत असताना त्यावरील अबकारी कर वाढवले गेले. कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील भााव झपाट्याने कोसळत होते. आपल्या स्मृती जागवल्या तर लक्षात येईल ११० डॉलरवरून ८० डॉलर म्हणजे ३० डॉलर प्रती बॅरलइतके तेल झपाट्याने खाली आले. मात्र भारतातील तेलाच्या किमती या त्यावेळेला पैशांत खाली येत होत्या. मात्र भाववाढ त्याच रात्री अमलात येत असे. सरकारला आजही प्रती लिटर १० ते १५ रु.फायदा होत आहे. जी आपली आर्थिक तूट भरून काढण्यात फार मोठी मदत करत आहे. याचा सर्वात मोठा फायदा महागाई, चलनवाढ, खाली येण्यास मदत होईल. त्यामुळे उद्योगधद्यांना लागणारा कर्जपुरवठा हा सवलतीच्या व्याजदराने होईल. याची सुरुवात १५ जानेवारीपासून सुरू झाली आहे.

आता आपल्या भगिनींचा, वहिनींचा जिव्हाळ्याचा विषय 'सोनं कधी घ्यायचं? सोनं आणखी स्वस्त होईल का?' या प्रश्नामागची मानसिकता जाणून घेऊया.

२००० च्या आसपास प्रत्येक सुवर्णपेढीने मासिक सुवर्णसंचय योजना काढली होती. महिना किमान १,००० रुपयांची गुंतवणूक करून ५ वर्षांनी जे काही सोने जमलेले असे त्याचे साधारणत: मूल्य त्या वेळेला ८,००० रुपये येत होते व २००५-२००६ मध्ये सोने १६,००० ते २०,००० च्या दरम्यान गेल्यावर सर्वांना खूप फायदा झाला. म्हणून सोने विकून टाकले व तिथून ते ३५,००० वर गेल्यावर जीवाची फार मोठी घालमेल झाली. आता सोने पुन्हा २५,००० च्या आसपास आल्यावर ते परत कधी घ्यायचे, सोन्याने तळ गाठला का व येणाऱ्या दिवसांत कुठल्या स्तरावर सोन्याची दीर्घकालीन खरेदी करावी या प्रश्नांची सविस्तरपणे उत्तरे आपण जाणून घेऊया.



आताच्या घडीला सोन्याने २५,000 चा तळ गाठला आहे हे समजण्यास हरकत नाही व आताच्या घडीला खालचा स्तर हा २८,000 असेल व वरचा स्थर या ३१,000 असेल व एकदा का सोनं सातत्याने ३१,000 च्या वर टिकायला लागले की ३४,000 चा टप्पा दृष्टिपथात येईल. चांदीच्या बाबतीत प्रथमत: ३८,000 वर टिकून ४0,000 रुपयांवर टिकणे नितांत आवश्यक आहे.

सोन्या चांदीच्या भावांच्या चढ-उतारांना प्रामुख्याने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकीय, आर्थिक अस्थिरता व भारताच्या बाबतीत प्रामुख्याने भारताच्या परकीय चलन गंगाजळीची (फॉरेन एक्स्चेंज रिझर्व्ह) पातळी संतोषजनक असेल व दुसऱ्या बाजूला चालू खात्यावरील तूट (करंट अकाउंट डेफिसीट) आटोक्यात असेल तर केंद्र सरकारला सोन्याच्या आयातीबाबत लवचीक धोरण अवलंबता येते. (उदा. सोन्यावरील आयात कर कमी करणे, सोन्याच्या आयातीवरील बंधन उठवणे वगैरे.)

आता सोन्या, चांदीच्या दीर्घकालीन खरेदी कुठल्या स्थरावर करावी या प्रश्नाकडे वळूया.




चांदीच्या भावाने आता ३३,५०० रुपयांचा तात्पुरता तळ गाठला आहे असे समजण्यास हरकत नाही. चांदीचा भाव सातत्याने ३८,००० रुपयांच्यावर राहिल्यास ४०,००० रुपयांचा भाव शक्य आहे.

सातत्याने मंदीत असलेला चांदीचा भाव एकदा का ४०,००० रुपयांच्यावर सातत्याने टिकायला लागला की चांदी ४३,००० ते ४६,००० रुपयांवर झेपावेल.

सोन्याच्या बाबतीत मात्र आताच्या घडीला सोन्याने रुपये पंचवीस हजाराचा तळ गाठला आहे असे समजण्यास हरकत नाही.

भविष्यात सोन्याचा भाव सातत्याने २७,५०० रुपयांवर टिकणे म्हणजे गेले अठरा महिने झाकोळलेले सोने पुन्हा एकदा तावून सुलाखून बाहेर येऊन सोने पुन्हा एकदा झळाळून उठेल व सोन्याचा २९,००० ते ३१,००० रुपयांचा भाव दृष्टिपथात येईल,

सोन्या चांदीच्या भावावर प्रामुख्याने आर्थिक अस्थिरता, सरकारची आयात-निर्यातीबाबतची धोरणे व भारताच्या बाबतीत सणासुदीच्या दिवसांत चढ-उतार होत असतात.

आताच्या बदलत्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय बदलांचे वर्तमानात व भविष्यात भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मकच परिणाम होणार आहेत. हे बदल काव्यात्मक पद्धतीने सांगायचे झाले तर माझ्या दोन आवडत्या काव्यपंक्तीचा आधार घ्यावासा वाटतो.

''वो शाम कुछ अजीब थी । ये शाम भी अजीब है ।'' आणि सुधीर मोघे यांच्या काव्यपंक्ती ''साज ये गोकुळी सावळी सावळी''

१९६९-७० च्या दशकात 'काळाच्या पटलावरील सारीपाटात दैवाच्या फाशाचे दान आमच्या विरुद्धच पडत होते' मग त्यात - अरब-इस्राएलच्या युद्धामुळे तेलाच्या किमतीचा भडका असो, सत्ताधारी कॉग्रेसमध्ये उभी फूट असो, पाकिस्तानच्या अत्याचारामुळे पूर्वपाकिस्तानमधून (आताचा बांग्ला देश) भारतात निर्वासितांचे लोंढे आल्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडलेला असो व हे सर्व कमी म्हणून १९७२ चा भीषण दुष्काळ असो, हे सर्व 'हलाहल' आमची अर्थव्यवस्था पचवत होती.

ती एका वादळातील काळीकुट्ट अशी संध्याकाळ होती - 'वो शाम कुछ अजीब थी'।

आता त्याच काळाच्या सारीपाटावर आमच्या बाजूने दैवाचे फासे पडत आहेत.

तब्बल २५ वर्षांनंतर केंद्रात एका पक्षाचे पूर्ण बहुमत असलेले स्थिर सरकार आले आहे, आर्थिक सुधारणांना गती येत आहे. भाववाढीची जननी कच्च्या तेलाचे भाव कोसळत आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आय.एम.एफ.) भारताची अर्थव्यवस्था येणाऱ्या वर्षांत चीनला मागे टाकेल असे भाकीत केले आहे. सर्वात शेवटी, स्वप्नवत वाटणारी गोष्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एकाच वर्षात दोन वेळा व त्यात प्रामुख्याने २६ जानेवारीच्या प्रजासत्ताकदिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून येऊन गेले. तेव्हा, 'ये शाम भी अजीब है'।

आजच्या हसऱ्या, खेळकर, प्रसन्न अशा संध्याकाळच्या वर्णनासाठी सुधीर मोघेच्या काव्यपंक्ती चपखल बसबात.

'सांज ये गोकुळी सावळी सावळी...
अमृताच्या जणू ओंजळी ओंजळी.'

आजच्या सांजसमयात उद्याचा उज्ज्वल, आशादायी उष:काल दडला आहे.

**- आशीष अरविंद ठाकूर**
देवीछाया तिसरा मजला,
न्यू प्रभादेवी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०००२५
भ्रमणध्वनी : ९८१९७२९५०८
ashishthakur1966@gmail.com

**महत्त्वाची सूचना :**

**सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लेखक जाहीर करू इच्छितो की, माझी अथवा माझ्या जवळच्या नातेवाईकांची लेखामध्ये सुचवलेल्या सोन्यात अथवा चांदीमध्ये आताच्या घडीला कुठलीही गुंतवणूक नाही. तसेच एम.सी.एक्स.वर सोन्याच्या/ चांदीच्या खरेदी अथवा विक्रीमध्ये स्वत:चा अथवा जवळच्या नातेवाईकांचा प्रत्यक्ष सहभाग अथवा स्वारस्य नाही. सोन्याच्या/चांदीच्या खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांकडून/पेढ्यांकडून कुठलेही मानधन घेतलेले अथवा मिळालेले नाही. येणाऱ्या ४ ते ५ वर्षांत सोन्याची/चांदीची संभाव्य वाटचाल कशी असेल त्याचा आढावा घेण्यात आला आहे. प्रत्यक्ष सोन्या/चांदीची खरेदी तज्ज्ञ सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली करावी. त्या व्यवहारातील नफ्या/तोट्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित वाचकाची/गुंतवणूकदाराची असेल आशीष ठाकूर ह्याला जबाबदार राहणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

# अपारंपरिक गुंतवणूकसाधने

**विवेक बकोरे**

पोस्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद अनेकांना असतो. अनेक देशांचे विविध प्रकारांतील आणि विविध आकारांतील पोस्टाची तिकिटे अशा छांदिष्ट लोकांच्या संग्रहात असतात. ग्रेट ब्रिटन मधील स्टेन्ले गिब्बन्स यांना दुर्मिळ तिकिटसंग्राहकांचे प्रणेते म्हणतात. त्यांनी १८५६ पासून अशा दुर्मिळ पोस्टल तिकिटांचे व्यवहार सुरू केले. पोस्टाची तिकिटे जेवढी दुर्मिळ तेवढी त्यांची किंमत अधिक असते. लंडनमध्ये कार्यरत असलेल्या स्टॅन्ले गिब्बन्स पोस्टल तिकिटे लिलाव आणि गुंतवणूक केंद्राने जागतिक पोस्टल तिकिटांच्या बाजारपेठेत भारतासह ब्राझील, रशिया, चीन इत्यादी देशांतील पोस्टल तिकिटांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या पोस्टल तिकिटांची खरेदी–विक्री करण्यासाठी सर्व तिकीट संग्राहकांना या स्टॅन्ले गिब्बन्स पोस्टल तिकिटे लिलाव आणि गुंतवणूक केंद्राचा मोठा आधार लाभलेला आहे.

स्टॅन्ले गिब्बन्स जीबी २५० रेअरिटीज इंडेक्स हा निर्देशांक जगभरातील सर्व तिकिटसंग्राहकांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. १९९५ पासून आजपावेतो हा निर्देशांक कधीही घसरलेला नाही. अगदी २००८च्या जागतिक मंदीच्या काळातही त्याची घोडदौड कोणीही रोखू शकलेले नाही. या निर्देशांकाने १९९५ पासून २०१४ पर्यंत सुमारे ३७५ टक्क्यांहून अधिक वृद्धी दर्शवली आहे. ब्लुमबर्ग प्रोफेशनलवर हा निर्देशांक नोंदलेला असून या पोस्टल तिकिटांच्या बाजारपेठेतील प्रत्येक कल टिपला जात आहे. या निर्देशांकाने मागील चाळीस वर्षांत संचयित वार्षिक वृद्धी दर Compounded Annual Growth Rate प्रति वर्ष दहा टक्क्यांहून अधिक दर्शवला आहे. गेल्या दहा वर्षांत तर हाच वृद्धी दर १३.१४ टक्के येत आहे. शेअर बाजार, सोने, नाणे आणि मालमत्ता निर्देशांकाच्या तुलनेत या निर्देशांकाने गुंतवणूकदारांना नफा अधिकच करून दिला कधीच तोटा करून दिलेला नाही. अर्थात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या निर्देशांकांचा गुंतवणुकीचा अवधीच मुळी आठ ते दहा वर्षे असतो. भारतीय गुंतवणूकदारांची पावलेसुद्धा या निर्देशांकाकडे वळू लागली आहेत. पण झटपट लाभाच्या योजनावर लोभ असलेला भारतीय आठ–दहा वर्षे संयम ठेवणार का, हाच प्रश्न आहे.

कोलकात्यामध्ये निशांत सिंघल यांनी जुलै २००४ मध्ये भारतात एक इतिहास घडवला. या निशांत सिंघलना वयाच्या तेराव्या वर्षापासून सर्व क्रिकेटपटूंच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्याचा छंद जडला होता. खरे तर असा छंद बऱ्याच लहान मुलांसह मोठ्यांना सुद्धा असतो. पण या सिंघल यांनी आपल्याकडील स्वाक्षऱ्या लिलावात विकण्यास काढल्या. त्यांचा संपूर्ण संग्रह लिलावात विक्रीस जाऊन त्यांना पंधरा लाख रुपये मिळाले. त्यापैकी साडेचार लाख रुपये ९८ क्रिकेटपटूंच्या स्वाक्षऱ्यांच्या विक्रीतून मिळाले होते. अर्थात या ९८ स्वाक्षऱ्या गोळा करण्यास सिंघल यांना जवळजवळ १४ वर्षे लागली होती. सिंघल यांच्या कृतीतून एकीकडे चलनवाढीवर मात करून आणि चलनातील अस्थिरतेला तोंड देत वर्षाला किमान बारा ते सोळा टक्के सरासरी वृद्धी दर हा छंद सहज देऊन गेला. यामुळे भारतातील स्वाक्षरी संग्राहकांना एक प्रकारे प्रोत्साहन मिळाले. अर्थातच आता स्वाक्षऱ्या गोळा करणे आज केवळ छंद न राहता प्रदीर्घ अवधीत चांगले उत्पन्न दर दर्शवणारे गुंतवणुकीचे साधन ठरले आहे.

स्वाक्षरी जेवढी दुर्मिळ तेव्हढी तिची किंमत अधिक असते. १९९७ ते २००७ काही स्वाक्षऱ्यांच्या मूल्यात एक हजार टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. स्वाक्षऱ्यांच्या गुंतवणुकीचे शेअरबाजाराप्रमाणे दोन निर्देशांक आहेत– पीएफसी ४० ऑटोग्राफ इंडेक्स आणि फ्रेझर्स १०० इंडेक्स. हे निर्देशांक पॉल फ्रेझर हा



स्वाक्षरी संग्राहक सातत्याने प्रसारित करत असतो. या निर्देशांकात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या निर्देशांकानी सुमारे १४.८६ टक्के वार्षिक दराने वृद्धी दर्शवली आहे. संपूर्ण जगभरात सुमारे तीस कोटी स्वाक्षरी संग्राहक असून ब्राझील, रशिया, चीन आणि भारत या 'ब्रिक' देशांमध्ये स्वाक्षऱ्या संग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. संपूर्ण जगात दुर्मिळातील दुर्मिळ स्वाक्षऱ्यांमध्ये अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग आणि गोल्फ खेळाडू टायगर वूड्स यांच्या स्वाक्षऱ्यांचा समावेश आहे. वॉल्ट डिस्ने, प्रिंसेस डायना, चार्ल्स डिकन्स आणि मार्टिन ल्युथर किंग ज्युनिअर यांच्या स्वाक्षऱ्या सुद्धा दुर्मिळतील दुर्मिळ मानण्यात येतात. भारतीय व्यक्तींमध्ये सर्वात दुर्मिळ आणि महाग स्वाक्षरी महात्मा गांधींची असून त्याचे मूल्य सुमारे पावणे सात लाख रुपये आहे. मदर टेरेसांच्या स्वाक्षरीचे मूल्य ७७ हजार रुपये, राजा राममोहन रॉय यांच्या स्वाक्षरीचे मूल्य ७० हजार रुपये, रवींद्रनाथ टागोर यांच्या स्वाक्षरीचे मूल्य ४९ हजार रुपये तर जवाहरलाल नेहरूंची स्वाक्षरी ३५ हजार रुपये मूल्याची आहे. या सर्वांच्या तुलनेत इंदिरा गांधींच्या स्वाक्षरीचे मूल्य वीस हजार रुपयांच्या आसपास आहे.



पोस्टाची तिकीटे, नामवंतांच्या स्वाक्षऱ्या, विविध देशांच्या चलनी नोटा-नाणी गोळा करण्याचे छंद बऱ्याच जणांना असतात. पण हेच छंद एकीकडे गुंतवणूकीची साधने म्हणून पुढे येत असतानाच सोन्याच्या बरोबरीने प्लॅटिनम, पॅलाडियम सारख्या धातूमध्येही गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढीस लागली आहे.

आज सोन्याच्या बरोबरीने प्लॅटिनमचे अलंकार भारतीयांना वेड लावत आहेत. पण अजूनही काहीजण प्लॅटिनमला नाके मुरडत आहेत. पण केवळ प्लॅटिनमच नव्हे तर त्याच्या जातकुळीतील पॅलाडियम, ऱ्होडियम, इरिडियम, रुथेंनियम आणि ओसीयम या पाच धातूंचे पर्याय गुंतवणुकीसाठी भारतीयांपुढे हळूहळू येत आहेत. भारतात सद्या पॅलाडियम या धातूचा चंचु प्रवेश झालेला आहे. प्लॅटिनमला पर्याय म्हणून दागिन्यांच्या निर्मितीसाठी पॅलाडियमकडे आज सर्वजण बघत असले तरीही या धातूची औद्योगिक उपयुक्तता महत्त्वाची आहे. वाहन निर्मिती, इलेक्ट्रोनिक्स, दंतचिकित्सा डेंटिस्ट्री आणि रासायनिक प्रक्रियांमध्ये पॅलाडियमचा वापर अधिक आहे.

२०१४ च्या पहिल्या तिमाहीत प्रती औंस ७५० डॉलर्स असलेला पॅलाडियमचा भाव आज प्रती औंस ८०० डॉलरवर पोचला आहे. सोन्यापेक्षा किंमतस्थिरता असलेला पॅलाडियमचा भाव गेल्या पांच वर्षात सोन्याच्या तुलनेत कायम वर्धिष्णू ठरला आहे. मागील सहा महिन्यांत सोन्याच्या दरात अकरा टक्क्यांनी कपात झाली पण पॅलाडियमच्या दरात मात्र ७ टक्क्यांनी वाढच झाली आहे.

आज पॅलाडियममध्ये जे छोटे गुंतवणूकदार गुंतवणूक करत आहेत ती कॉईन म्हणजेच नाण्याच्या स्वरूपात! या नाण्यांना पॅलाडियम बुलियन कॉईन असे म्हटले जाते. हा धातू बार किंवा वेफर्सच्या आकारात उपलब्ध आहे. अमेरिका, दक्षिण आफ्रिका, रशिया आणि युरोपातील काही देशांमध्ये एक्स्चेंज ट्रेडेड फंडच्या स्वरूपात पॅलाडियमचे युनिट्स उपलब्ध आहेत. ज्यांना पॅलाडियममध्ये गुंतवणूक करायची आहे ते या पॅलाडियम एक्स्चेंज ट्रेडेड फंडच्या ईटीएफ युनिट्सच्या माध्यमातून करतात. दुर्दैवाने आज भारतात ही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे पॅलाडियम बुलियन कॉईन किंवा बारशिवाय भारतीयांना पर्याय नाही.

दक्षिण आफ्रिकेतील सुवर्णउद्योग क्षेत्रातील अत्यंत अस्थिर वातावरणामुळे गुंतवणूकदारांनी आपला रोख प्लॅटिनमकडे वळवला आहे. ते प्लॅटिनमच्या एक्स्चेंज ट्रेडेड फंडांत मोठी गुंतवणूक करत आहेत. आज प्लॅटिनमचा वापर जगभरात अलंकारांसाठी ३४ टक्के, वाहन उद्योगासाठी उत्प्रेरक म्हणून ४० टक्के, सहा टक्के गुंतवणुकीसाठी तर उर्वरित वीस टक्के रासायनिक, इलेक्ट्रॉनिक्स, आणि काच उद्योगांसाठी होत आहे. प्लॅटिनमच्या अलंकारांसाठी सर्वात अधिक म्हणजे एकूण मागणीच्या सत्तर टक्के मागणी चीनकडून असून त्यानंतर जपान ११%, उत्तर अमेरिका ६.७% आणि युरोपातील काही देशांचा क्रमांक लागतो.

भारतातील अतिश्रीमंत कुटुंबांमध्ये प्लॅटिनमचे दाग-दागिने प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात असल्याने प्लॅटिनमची भारतात मागणी वाढत आहे. लग्न निश्चित झाल्यावर साखरपुड्यासाठी प्लॅटिनमच्या अंगठीने उच्च मध्यमवर्गाचे लक्ष खेचून घेतले आहे. भारतात अजूनही चांदीतील गुंतवणुकीसाठी सिल्व्हर इटीएफ येऊ शकलेले नाही तर प्लॅटिनम इटीएफ, पॅलाडियम इटीएफ यांचा प्रवेश दूरच दिसतोय.

**– विवेक बकोरे**

vivekbakore@yahoo.com

# सिनेमाचे अर्थकारण

## दिलीप ठाकूर



'पिक्चर पैसे से नही, दिलसे बनती है' असे एकेकाळी खरेच कौतुकाने म्हटले जाई, कारण ते दिवसच 'कलेसाठी करा' व 'जीवनासाठी करा' या दोघांचे छान 'मीलन' झाल्याचे होते.

मराठी व हिंदी अशा दोन्ही चित्रपटसृष्टीतील 'हालात'च तसे होते. पण ती 'सिच्युएशन' कायम तशीच कशी राहील? बदल ही जगातील एकमेव स्थिर गोष्ट आहे, 'चित्रपटाच्या जगात' तो व्हायलाच हवा.

आता चित्रपट किती कोटी रुपयांत बनला व त्याने किती दिवसांत किती कोटी कमावले याला खूपच 'किंमत' आली आहे. त्यावरून त्या कलाकृतीचे योग्य 'मूल्य'मापन होते अथवा नाही याचे 'बायपास ऑपरेशन' होऊ शकते.

खरे तर, दादासाहेब फाळके यांनी एकशे दोन वर्षांपूर्वी म्हणजे १९१३ साली 'राजा हरिश्चंद्र' या आपल्या देशातील पहिल्या चित्रपटाची निर्मिती केली, तेव्हा त्यांनादेखील आर्थिक संकट-समस्या यांना सामोरे जावे लागले. मात्र चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत बराच काळ तरी 'पैसा' या घटकावर अवाजवी 'फोकस' टाकला जात नव्हता. दिग्दर्शकांचा कल पटकथेला जास्तीत जास्त न्याय देण्याकडे होता आणि प्रेक्षकदेखील अमूक चित्रपटाने आपल्या तिकिटाचा 'पैसा वसूल' झाला की नाही, यास महत्त्व देत.

ओ.पी. रल्हनने 'तलाश'च्या वेळी (१९७२ साली) या परंपरेला पहिल्यांदा छेद दिला. त्याने 'एक कोटीचा चित्रपट' अशी प्रचंड टामटूम केली. त्या काळात ही रक्कम अवाढव्य होती. पण प्रेक्षकांना 'किती खर्चात सिनेमा बनला, त्याचे अर्थकारण काय, यापेक्षा पडद्यावर त्यात काय बरे दिसले' यात 'रस' असतो. (हे सर्वकालीन सत्य आजही कायम आहे.) तसे विशेष काही 'तलाश'मध्ये दिसले नाही. त्यावेळी दक्षिण मुंबईतील अप्सरा हे 'तलाश'चे मुख्य चित्रपटगृह होते व त्यावरून त्याला लवकर गाशा गुंडाळावा लागला.

'शान'च्या वेळी (१९८० साली) रमेश सिप्पीदेखील याच 'चाली'ने गेला. 'सहा कोटींचा चित्रपट' असा त्याचा प्रचंड गवगवा करताना खलनायक 'शाकाल' (कुलभूषण खरबंदा) याचा ड्रेस व अड्डा किती व कसा महागडा आहे यावर 'भर' दिला. खरे तर 'शोले'च्या (१९७५ साली) पुण्याईमुळे 'शान'ची जोरदार-शोरदार प्रसिद्धी करण्याची गरजच नव्हती...

टप्प्याटप्प्याने चित्रपटाचे 'अर्थ'कारण कसे महत्त्वाचे ठरत गेले व फारसा 'अर्थ' नसणाऱ्या काही चित्रपटांच्याही उत्पन्नाची कशी चर्चा वाढली हे 'अर्थ'पूर्णरीत्या सांगण्यासाठीच हा 'फ्लॅशबॅक.'

आज समाजाच्या सर्वच क्षेत्रांत पैशाला प्रचंड 'किंमत' आल्याने त्याला चित्रपटाचे 'रंगीन जग' कसे अपवाद असेल? कितीतरी चित्रपटांत फक्त आणि फक्त पैसाच तर दिसतो (हॅप्पी न्यू इयर, बँग बँग) आणि कितीतरी चित्रपटांच्या गुणवत्तेचे विश्लेषण करण्यापेक्षा त्यांनी 'गल्ला पेटी'वर किती कोटींची भरारी घेतली याच्या 'बातम्या' (की खरे?) होतात. (लय भारी, दुनियादारी)

चित्रपटाचे अर्थकारण म्हणजे नेमके काय हे सांगता येणारे नाही, हीच तर या माध्यमाची व व्यवसायाची गंमत आहे. 'याचे उत्तर मी देऊ शकतो' असे म्हणणाऱ्यांना या क्षेत्राची 'खरी किंमत'च कळलेली नाही असे 'रोखठोक' विधान करता येईल.

चित्रपटाची निर्मिती करताना सर्वप्रथम 'पटकथा' लागते, ही वस्तुस्थिती आहे. पण 'प्रत्येक चित्रपटाचा जन्म' ही एक स्वतंत्र 'कहानी' आहे.

काही नवीन हौशी-क्रेझी निर्मात्यांना वाटते, 'पैशांची थैली' घेऊन या क्षेत्रात 'आलो रे आलो' की सिनेमा बनलाच समजा. काही गुणवान दिग्दर्शक मात्र, 'चांगला विषय माझ्याकडे आहे, पण चांगले पैसे खर्च करणारा निर्माता सापडत नाही' अशा विवंचनेत असतात.

काही 'नियमित' निर्माते मात्र व्यवस्थित (व अधिकृत) 'आर्थिक घडी' बसवून 'एक चित्रपट झाला की दुसरा' अशा गतीने सालोसाल चित्रपटनिर्मितीची 'खेळी' रंगवतात.

काही राजकीय नेते, बिल्डर, बारवाले, हॉटेलवाले आपल्या 'वरकमाई'चा पैसा घेऊन चित्रपटनिर्मितीत 'पडतात' आणि 'चित्रपट निर्माता' अशी 'प्रतिमा' मिरवत समाजात वावरतात.

चित्रपटनिर्मिती हा 'इनकमिंग फ्री' व्यवसाय असल्याने अक्षरश: येथे कोणीही यावे असा 'खेळ' आहे. पण कदाचित तुम्हाला एक 'रिॲलिटी शो' माहीत नसेल की, प्रत्येक काळात नव्वद टक्के निर्माते 'फक्त पहिल्या एकमेव चित्रपटातून'च येथून आउट होतात. पाच टक्के निर्माते तग धरतात व अवघे पाच टक्के

निर्माते दीर्घकालीन टिकतात. त्यांना 'ओळख' मिळते. 'पीके'ने पाचशे कोटी कमावले, 'पोस्टर बॉईज'ने तीस कोटी कमावले अशा प्रचारकी बातम्यांना भुलून येथे पुन्हा नव्वद टक्के निर्माते 'आत'मध्ये येतात.

अशी ये-जा फार असल्यानेच चित्रपटसृष्टीची वर्षभराची अधिकृत 'आर्थिक उलाढाल' किती याचा नेमका 'आकडा' कधीच 'सापडणार' नाही, हेच या व्यवसायाचे 'खरे अर्थकारण' आहे.

अर्थात, चित्रपटाच्या मुहूर्तापासून प्रीमियरच्या जंगी 'पार्टी'पर्यंत येथे 'पैसा वाहता राहतो' हे मी तब्बल तीन दशकांच्या सिनेपत्रकारितेमधील 'भटकंती' व निरीक्षण यातून पाहतो-अनुभवतो आहे तरी येथील 'अर्थ'कारणाची काही 'कोडी' आहेतच.

पटकथेची गरज म्हणून विदेशात चित्रीकरणाचा 'डेरा' टाकून बजेट वाढले की, बक्कळ पैसा आहे खुश्शाल खर्च करुयात असा माईंडसेट पक्का करूनच अत्याधुनिक तंत्राचा वापर करण्याचे ठरले हो!

स्टारची किंमत चित्रपटाचे बजेट वाढवते की यशस्वी चित्रपटामुळे कलाकार आपले मानधन अव्वाच्या सव्वा करतो?

एका हिंदी चित्रपटाच्या घोषणेपासून त्याच्या यशाच्या 'पार्टी'पर्यंत एकूणच जो 'खावो-पिओ-मजा करो' यावर प्रचंड पैसा खर्च होतो, त्यात एक सामाजिक मराठी चित्रपट सहज निर्माण होईल. तर मग 'तो' पैसा शक्य तेथे 'वाचवून' एखाद्या चांगल्या चित्रपटाच्या निर्मितीला 'प्रेरणा' देता येणार नाही का?

एव्हाना, तुमच्या डोळ्यांसमोर सेटवरच्या व्हॅनिटीच्या खर्चापासून एखाद्या नटी-फटाकडीने अवघ्या तीन-साडेतीन चित्रपटांतच घेतलेली गाडी असा सर्वच स्तरावरचा पैसा 'दिसत' असेल.



...यस, चित्रपटाच्या जगात फक्त पैसा बोलतो.

मद्रास कॅफे, स्पेशल २६, भाग मिल्खा भाग, मेरी कोम, बेबी असे हिंदी; 'एलिझाबेथ एकादशी', 'फ्रेन्ड्री', 'लोकमान्य' असे मराठी; या आशयपूर्ण चित्रपटांच्या 'निर्मिती'साठी 'पैसा' उपयोगी पडला.

कथा-कल्पकता सिम्बॉलिक दृश्य, प्रतिमांचा वापर, 'या चित्रपटाने समाजाला काय दिले', 'येथे दिग्दर्शक दिसतो', 'या चित्रपटाने चित्रपटसृष्टीला पुढे नेले', 'या चित्रपटाने मानाचे पुरस्कार पटकावले', 'या चित्रपटाला जगातील मान्यवर महोत्सवात संधी मिळाली' अशा कितीतरी गोष्टींपेक्षा आजच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीला 'आर्थिक ताकद' खूपच महत्त्वाची वाटते. त्यात त्यांचे तरी काय चुकते म्हणा. 'पैशांत काटकसर करून निर्माता म्हणून उभे राहण्याची प्रवृत्ती असणाऱ्याने' या क्षेत्रात पाऊल टाकूच नये, अशीच प्रत्येक पायरीवर 'कंडिशन' आहे. तसा 'कडवट' अनुभव येतो म्हणूनच वर्षभरात शे-दीडशे मराठी-हिंदी चित्रपट 'निर्मितीच्या मधल्या पायरी'वर बंद पडतात.

तात्पर्य, येथील अर्थकारणाचा 'वार्षिक ताळेबंद' आकड्यांत पकडता येणारा नाही, हे केवढे मोठे सत्य आहे. त्यात पुन्हा राजश्री प्रॉडक्शनच्या चित्रपटासाठी कलाकार अथवा तंत्रज्ञ म्हणून काम करायचे तर 'चेक पेमेंट' आहे, तर नवख्या निर्मात्याला 'आपली खरी किंमत काय' हे माहीत नसल्याचा काही चाणाक्ष कलाकार 'अचूक' फायदा उठवून 'भारी रक्कम' खेचतात. म्हणजे पुन्हा 'एकूण अर्थकारणा'त वजाबाकी फार.

तरी, तुम्हाला 'निर्मितीचा सर्वसाधारण खर्च' सांगणारा हवाच.

एक सर्वसाधारण स्वरूपाचा मराठी चित्रपट निर्मिण्यास किमान दीड कोटी खर्च आहे.

चित्रपटनिर्मिती हा 'इनकमिंग फ्री' व्यवसाय असल्याने अक्षरश: येथे कोणीही यावे असा 'खेळ' आहे. पण कदाचित तुम्हाला एक 'रिॲलिटी शो' माहीत नसेल की, प्रत्येक काळात नव्वद टक्के निर्माते 'फक्त पहिल्या एकमेव चित्रपटातून'च येथून आउट होतात. पाच टक्के निर्माते तग धरतात व अवघे पाच टक्के निर्माते दीर्घकालीन टिकतात. त्यांना 'ओळख' मिळते. 'पीके'ने पाचशे कोटी कमावले, 'पोस्टर बॉईज'ने तीस कोटी कमावले अशा प्रचारकी बातम्यांना भुलून येथे पुन्हा नव्वद टक्के निर्माते 'आत'मध्ये येतात.
अशी ये-जा फार असल्यानेच चित्रपटसृष्टीची वर्षभराची अधिकृत 'आर्थिक उलाढाल' किती याचा नेमका 'आकडा' कधीच 'सापडणार' नाही, हेच या व्यवसायाचे 'खरे अर्थकारण' आहे.

नामवंत कलाकार, विदेशात चित्रीकरण व बंपर मीडिया हाइप (त्यात पेड न्यूज वगैरे...) असा थाटमाट असेल तर एका बड्या मराठी चित्रपटाचे बजेट चार कोटींपर्यंत जाते.

हिंदीत नवीन चेहरे घेऊनही पाच कोटींचा एक चित्रपट हे गणित आहे. बड्या हिंदी चित्रपटाला त्याच्या किती पट खर्च येतो याच्या आकड्याचा 'अंतिम शोध' शक्यच नाही. खरे तर, पै पै मोजून खर्च करणाऱ्यांनी चित्रपटाचा निर्माता बनण्यापेक्षा चित्रपटाचा प्रेक्षक बनावे.

आता वसुलीचे काय?

मराठी शासनाचे अनुदान असले तरी ते चित्रपटाच्या गुणवत्तेवर ठरते. ते तीस व चाळीस लाख अशा दोन प्रकारचे आहे. उपग्रह वाहिनीचे हक्क विकून 'बक्कळ' वसुली होते, यात तथ्य किती ते 'करारपत्रा'वरूनच स्पष्ट होईल. चित्रपटगृहातील कमाई हा प्रचंड संशोधनाचा विषय आहे. त्याचा 'अंतिम आकडा' कधीही कोणी जाहीर केलेला नाही. तर मग 'अर्थ'कारणाचा तराजू समतोल कसा साधणार? मराठी असो वा हिंदी, त्यांच्या कमाईतून निर्मिती-प्रमोशन-मार्केटिंग यांचा खर्च, आयकर व अन्य कर हे सगळे वजा केल्यावर जी रक्कम राहते तीच त्या चित्रपटाची अस्सल कमाई असते. एखाद्या निर्मिती संस्थेने तो 'खरा आकडा' एकदाचा सांगावाच, म्हणजे या 'शो बिझनेस'मधील 'खरे सत्य' जगासमोर येईल. तसे प्रत्यक्षात होणार नाही, कारण यापेक्षा 'क्लासमेट्स'ने दोन आठवड्यांत सहा कोटींची कमाई केल्याची प्रसिद्धीखात्याची बातमी प्रसारमाध्यमातील काही खुळचट 'खरी' मानतात व 'आम आदमी'पर्यंत पोचवतात. ही सोयीची भूमिका बऱ्याच सिनेमावाल्यांना प्रिय वाटते.

चित्रपटाच्या जगात भल्यामोठ्या सेटपासून पोस्टरबाजीपर्यंत सर्वत्र पैसा तर 'दिसतो', पण तो 'मुठी'त पकडून सांगता येणारा नाही. हीच तर येथील 'खरी गंमत' आहे. बरे, येथे स्तर केवढेतरी आहेत, ट्रायल शोचा खर्च, त्यातील मध्यंतरच्या खाण्याचा खर्च अशा बऱ्याच वाटाही आहेत. बाहेरून त्या लक्षात येत नाहीत. एखादी पार्श्वगायिका मेकअपमनचा खर्च मागत नाही याबाबत निर्मात्याने समाधान मानावे, अशाही काही खर्चाच्या लबाडीच्या वाटा येथे आहेत. अर्थपुरवठा फुगत राहील, असे येथे सर्वदूर वातावरण आहे.

मालिकांच्या निर्मितीच्या खर्चाचे गणित तसे सोपे वाटते, पण तेही असेच गुंतागुंतीने भरलेले आहे. काही वेळा, ती मालिका कोणत्या उपग्रह वाहिनीवर प्रक्षेपित होणार यावर 'बजेट' ठरते, तर कधी त्या मालिकेला मिळणाऱ्या 'स्पॉन्सर'वर बजेटचा आकडा खाली-वर होतो. कधी कधी, वाढत्या खर्चामुळे दबल्याने निर्माता पळ काढतो व दुसरा निर्माता त्या मालिकेला 'खांदा' देतो. मालिकेत अथवा रिॲलिटी शो, गेम शो यामध्ये 'सिनेमातला वलयांकित तारा' आणला की बजेट फुगते. बरे, तो 'एकटा' येत नाही, मेकअपमन, हेअरड्रेसर, ड्रायव्हर, बॉय अशा लव्याजम्याचा खर्च निर्मात्यालाच करायचा असतो. सिनेमाच्या जगात हा वाहता खर्च गृहीत धरला जातो. मालिकेसाठी दीर्घकालीन लागलेला-लावलेला सेट बजेट वाढवत ठेवतो. अर्थात, तशा 'माईंडसेट'नेच निर्मात्याने येथे 'उभे' राहण्याचा प्रयत्न करावा.

बाहेरून हे बारकावे, खर्चाच्या छोट्या छोट्या वाटा लक्षात येत नाहीत, म्हणूनच येथील अर्थकारणाचा वेध घेताना अनेकांची फसगत होते.

'कॉर्पोरेट' युग येथे 'आर्थिक शिस्त' आणेल असे वाटणे व प्रत्यक्षातील चित्रपटसृष्टीतील व्यवहार यात असणारे अंतर व फरक काहीजण शक्य तितका कमी करतात. पण एकूणच चित्रपट निर्मितीची प्रक्रिया 'पाहता' कागदावरचे अथवा कम्प्युटरवरचे खर्चाचे गणित 'फिक्स' राहण्याची शक्यता जवळपास 'शून्य' असते. कारण, मुंबईत रस्त्यावर महत्त्वाचे दृश्य चित्रीत करण्यासाठी स्थानिक दादाला द्यावा लागणारा हप्ता 'खर्चाच्या नोंदी'त नसतो, बऱ्याचदा हुशार दिग्दर्शकाला 'भरल्या सेटवर' सुचलेली एखादी चांगली कल्पना तो पटकथेत 'फिट' बसवतो तेव्हा अनपेक्षितपणे खर्चाची नवीन वाट येते. कधी मालिकेत ट्रॅकच बदलतो व नवा खर्च येतो. एखाद्या चित्रपटाला अंडरवर्ल्डकडून होणारे अर्थसाहाय्य या एकूणच अर्थकारणाचा आणखी एक 'कडक' रंग आहे...

तात्पर्य, मनोरंजनउद्योगात अनेक रंगाचा 'अर्थ' सामावला आहे, तो फक्त 'अर्थकारण' अथवा 'अर्थशास्त्रा'पुरता नाही. 'अर्थाचे शास्त्र' तर केवढे तरी किचकट/गुंतागुंतीचे/विरोधाभासाने भरलेले आहे. येथे पैशाची आवक-जावक सुरू आहे, पण पैशाचा 'अर्थ' ज्याला समजतो तोच येथे कोणत्याही भूमिकेत (म्हणजे निर्माता, कलाकार, तंत्रज्ञ वगैरे) 'उभा' राहू शकतो. चित्रपट हा एका सरळ रेषेत जाणारा विषय कधीही नव्हता. (हे चित्रपटाच्या स्वयंघोषित अभ्यासकांना कधी हो कळणार?) येथे पैसा श्रेष्ठ की कला, व्यावसायिक चित्रपट हवेत की कलात्मक अशा वादात सापडण्यापेक्षा 'फक्त आणि फक्त पैसा असेल' तर आणि तरच अस्तित्व व अस्मिता हे घटक आहेत. उगाचच चिल्लर मोजण्यात वेळ घालवला तर येथील आर्थिक ताकद लक्षात येणार नाही.

चित्रपटसृष्टीच्या अर्थशास्त्राच्या हिशोबात बेहिशोबच जास्त, त्यात गुरफटून मेंदूचा पिझ्झा करण्यापेक्षा चित्रपटच पाहिलेला बरा ना...

**- दिलीप ठाकूर**

ए ७०२ शारदा सहनिवास, राजेंद्रनगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६
भ्रमणध्वनी : ९८७०६१६२१६
glam.thakurdilip@gmail.com

''गुंतवणूकदाराला कोण यशस्वी करते?
शिक्षण, धीर की नशीब ''
- फिलिप फिशर वॉरेन बफेंचे गुरु

# ‘मेक इन इंडिया’त कुठे आहे महाराष्ट्र?

## नितीन पोतदार



महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रातील अतिशय प्रगत राज्य आहे असा समज आहे, मात्र गेल्या दोन दशकांच्या आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरणाच्या काळात व माहिती आणि तंत्रज्ञानाच्या महापुरात महाराष्ट्र दिशाहीन झालेला दिसतो. या काळात आपण कुठल्याच क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करू शकलेलो नाही. महाराष्ट्रात सगळ्यात जास्त सेझला परवानग्या मिळाल्या पण दुर्दैवाने एकही सेझ अजून सुरू झालेले नाही. तसेच महाराष्ट्रात एमआयडीसीच्या माध्यमातून आपण छोट्या छोट्या उद्योगांचे मोठे जाळे निर्माण करू शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून त्या अर्थाने आपली अजूनही खरी प्रगती झालीच नाही. कारण यशवंतराव चव्हाणांनंतर एकही दूरदर्शी नेतृत्व महाराष्ट्राला खऱ्या अर्थानं लाभलंच नाही. अगदी सहकारक्षेत्राचं उदाहरण द्यायचं तर बाजूच्या गुजरातनं त्याच सहकारातून ‘अमूल’ निर्माण करून जागतिक स्तरावर स्वतंत्र स्थान मिळवलं आणि हजारो अशिक्षित शेतकऱ्यांना रोजगार मिळवून दिला. जे त्यांना एका उत्पादनातून जमलं ते आपल्याला साखर, ऊस, कापूस आणि इतर उत्पादनांत का साधलं नाही? सहकारक्षेत्रानंतर आपण उच्च शिक्षणसंस्था निर्माण केल्या, तरीही जगाला लागणारा उच्च शिक्षित कामगार आपण देऊ शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. खाजगी इंजिनीयरिंग कॉलेजेसचं भरमसाठ पेव फुटलं, पण त्यातून बाहेर येणाऱ्या पदवीधरांना नोकरीच्या बाजारात अजिबात किंमत नाही अशी दयनीय स्थिती आहे.

पुण्याचं आयटी क्षेत्र बघता बघता चंद्राबाबू नायडुंनी हैदराबादला नेलं; चेन्नईनं आपल्याकडे येणारा मोटार-कार व्यवसाय कधी पळवला हे आपल्याला कळलं देखील नाही; टाटानं आपली नॅनो कोलकात्याहून थेट साणंद -गुजरातला नेली आणि हे सगळं घडत असताना आपल्याला तीन मुख्यमंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपावरून बदलावे लागले हे आपले दुर्दैव. १९९१ नंतरच्या उदारीकरणाचा फायदा शेजारच्या गुजरात, आंध्रप्रदेश, तामीळनाडूनं घेतला आणि आता उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश ही राज्यंदेखील घेताना दिसतात. तेसुद्धा परदेशी गुंतवणूक आपल्या राज्यात आणण्यासाठी खास प्रयत्न करत आहेत आणि आमच्या राज्यकर्ते इथे फारच कमी पडले असंच म्हणावं लागेल!

गेल्याच महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ‘मेक इन इंडिया’ या महत्त्वाकांक्षी मोहिमेचा शुभारंभ केलेला आहे, निदान त्यांना साथ म्हणून तरी महाराष्ट्रानं औद्योगिक क्षेत्राला निश्चित दिशा देणं गरजेचं आहे. आपल्याला खरोखरच औद्योगिक प्रगती करायची असेल तर सर्वप्रथम महाराष्ट्राची स्वतंत्र ओळख निर्माण होईल अशा काही निवडक उद्योगक्षेत्रांत आपल्याला एका निश्चयानं काम केलं तरच मोठ्या प्रमणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. त्यासाठी आपल्याला निवडक उद्योगात मक्तेदारी उभारावी लागेल. जे काम मोदींनी गुजरातमध्ये केलं आणि जे चंद्राबाबू नायडूंनी आंध्रप्रदेशात केलं ते आपल्याला का जमू नये? उदाहरणार्थ महाराष्ट्रात आज मिडिया ॲण्ड एन्टरटेन्मेंट (मुंबई), पर्यटन (कोकण) आणि शिक्षणांत (पुणे) अशा क्षेत्रात मूलभुत काम झालेलं आहे, पण अजून भरपूर काम करण्यासारखं आहे. या तिन्ही उद्योगांतून मोठ्या प्रमाणात तरूणांना रोजगारनिर्मिती होऊ शकते. त्याचबरोबर पायाभूत सुविधेसाठी देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक अपेक्षित आहे, त्याचा मोठा भाग विदर्भात येऊ शकतो. पायाभूतसुविधा क्षेत्रात परदेशी गुंतवणूक आली तर रस्ते, पूल, विमानतळ, इमारती, बांधकाम, विजनिर्मिती या क्षेत्रात कुशल व अकुशल दोन्ही प्रकारच्या मनुष्यबळाला मोठ्या प्रमाणात काम मिळू शकतं.

‘मेक इन इंडिया’मध्ये उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्राला प्राधान्य दिलं जाणार आहे. यातूनच जास्त रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे व त्यातून भारतातील प्रचंड मोठ्या बेरोजगार हातांना काम मिळेल अशी आशा करायला हरकत नाही. इथे एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे, की अत्याधुनिक कारखाना म्हणजे जास्तीत जास्त तंत्रज्ञान व स्वयंचलित मशिनरी म्हणजे फक्त कुशल आणि मोजक्या मनुष्यबळाचा वापर. याचाच अर्थ मोठी गुंतवणूक म्हणजे जास्त रोजगारनिर्मिती असं सरळ प्रमाण आपण गृहीत धरू शकत नाही. एकूणच ‘मेक इन इंडिया’ या मोहिमेअंतर्गत सर्वदूर पायाभूत सुविधा क्षेत्रात धडाक्यात कामं व प्रकल्प सुरू झाल्याशिवाय रोजगार निर्माण होणार नाहीत. परकीय गुंतवणुक आणण्यासाठी आपल्याला काही निवडक क्षेत्रासाठी खास सवलती द्याव्या लागतील. त्यासाठी महाराष्ट्राला परदेशात जाऊन या क्षेत्रांसाठी जोरदार मार्केटिंग करावं लागेल. या क्षेत्रात होणारी प्रत्येक मोठी गुंतवणूक (देशी किंवा परदेशी) ही महाराष्ट्रातच व्हायला पाहिजे असा आपला आग्रह

आणि त्यापेक्षाही निर्धार असायला हवा. त्याचबरोबर प्रशासकीय निर्णयप्रक्रियेत अमूलाग्र बदल करावे लागतील. उद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्रात एकखिडकी योजनेच्या जागी ओपन डोअर पॉलिसीचा विचार व्हायला पाहिजे. त्यातून पंतप्रधानांच्या मेक-इन-इंडियाच्या मोहिमेला महाराष्ट्रातून एक नवी क्रांतिकारक साथ लाभेल.

या पार्श्वभूमीवर हे वरच्या स्तराचे मुद्दे बाजूला ठेवून प्रत्येकजण स्वत:साठी काय विचार करू शकतो याचा विचार झाला पाहिजे. नोकरी हा आर्थिक उत्पन्नाचा एक प्रमुख स्रोत. नोकरी म्हटलं की पूर्वी कोणता विचार मनात यायचा, तर ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण पूर्ण करणं, नंतर रोजगार नोंदणीकेंद्रात नाव नोंदवणं, तिथून सरकारी किंवा खाजगी कंपनीत निवृत्तीपर्यंत मिळेल त्या पगारावर मिळेल ते काम करणं किंवा Bank Recruitment, UPSC, IS अशा परीक्षा देणं आणि मिळेल ती नोकरी करणं. खरं तर गेल्या २० वर्षांत भारतानं नाइलाजास्तव का होईना पण स्वीकारलेलं आर्थिक उदारीकरण, त्यानंतरचं जागतिकीकरण आणि माहिती-तंत्रज्ञान यातून जो सुवर्णयोग घडून आला त्यामुळे एकूणच रोजगारनिर्मितीच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आलेला दिसतो. १९९० मध्ये आपण आर्थिक उदारीकरणाचं धोरण स्वीकारलं. त्यामुळे अनेक परकीय कंपन्यांना भारतातील उद्योगविश्वाचे दरवाजे खुले झाले. भारतीय उद्योगांनाही देशाबाहेर विस्तार करण्याची संधी मिळाली. या जागतिकीकरणाच्या लाटेवर स्वार होत असतानाच माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राचा उदय झाला. याचा जगाला आणि एकूणच भारताला मोठा उपयोग झाला. भारत हा शेतीप्रधान देश पण गेल्या दोन दशकांत अर्ध्याहून जास्त जीडीपी हा सेवा क्षेत्रातून आलेला आहे. त्यात नव्याने निर्माण झालेल्या बॅंकिंग, हॉस्पिटॅलिटी (हॉटेल, टूरिझम), रिअल इस्टेट, मीडिया ॲण्ड एंटरटेनमेंट अशी अनेक नवी क्षेत्रं आहेत.

माहिती-तंत्रज्ञानाच्या विकास व विस्तारामुळे आज प्रत्येक क्षेत्रात नवनवं संशोधन (इनोव्हेशन) होत आहे. पूर्वी एखादं नवीन प्रॉडक्ट तयार झालं तरच संशोधन झालं असं म्हटलं जायचं. आता उत्पादनप्रक्रियेतही संशोधन होऊ लागलंय. माहिती-तंत्रज्ञानानं आजच्या संपर्कयंत्रणेतही मोठाच बदल घडवून आणला आहे. व्हॉट्स ॲप, ट्विटर, फेसबुक यांसारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून आता जगाशी 'कनेक्ट' होणं शक्य झालं आहे. एकूणच या गतिमान संपर्कयंत्रणेमुळे व्यापारवृद्धी ही पूर्वीपेक्षा अधिक सोपी आणि सुलभ बनली आहे.

आज माहितीतंत्रज्ञानातील बदलांमुळे रोजगारनिर्मितीच्या तसंच स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत आणि विशेष बाब अशी की या छोट्या उद्योगांसाठी जागा किंवा भांडवल यांची फारशी गरज उरलेली नाही. आज मोबाईलद्वारे ग्राहकांशी संवाद साधत नवनवी कामं मिळवण्याच्या खात्रीशीर संधी निर्माण होत आहेत. यातून ग्राहकांनाही घरबसल्या विविध सेवांचा लाभ मिळवणं शक्य झालं आहे आणि ही ताकद मिळालीय ती माहितीतंत्रज्ञानामुळे. आज रोजगाराचं स्वरूप पूर्णपणे पालटलं आहे. त्यामुळे रोजगारनिर्मितीसाठी शासन काय करतंय असा प्रश्न विचारत बसण्यापेक्षा माहितीतंत्रज्ञानाच्या मदतीनं मला काय करता येऊ शकतं असा विचार प्रत्यकानं केला तर रोजगारनिर्मितीला मोठाच हातभार लागू शकतो. आपण नोकरी मागणाऱ्या हातांबरोबर नोकरी देणारे हात निर्माण तयार केले पाहिजेत, तरच महाराष्ट्राने खऱ्यादृष्टीनं प्रगती केली असं म्हणता येईल.

स्वयंरोजगार हा घराघरात रुजवायचा असेल तर सर्वप्रथम गरज आहे ती शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची. आजची शिक्षणपद्धती ही विद्यार्थ्यांना



काल-परवापर्यंत महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात देशातील प्रथम क्रमांकाचं राज्य आणि मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी समजली जात असे. आता अर्थात इतरही राज्यं औद्योगिक क्षेत्रात प्रामुख्यानं परदेशी तंत्रज्ञान, परदेशी गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीत जोरदार आगेकूच करत आहेत. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी 'व्हायब्रंट गुजरात'च्या माध्यमातून खूपच मुसंडी मारली. मुंबईसह महाराष्ट्राला देशाच्या आर्थिक क्षेत्रात अजूनही अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे हे खरं आहे. पण ते पुढील पन्नास वर्षं टिकून राहील याची खात्री मात्र देता येणार नाही. या पार्श्वभूमीवर विचार करता पुढील काळात महाराष्ट्रासमोर औद्योगिक-आर्थिक क्षेत्रात काय आव्हानं असतील हे पाहणं गरजेचं ठरतं.


फक्त घोकंपट्टी करायला शिकवते. शाळेतलं पुस्तकी ज्ञान बाहेरच्या जगात तितकंसं उपयोगी ठरतंच असं नाही. त्यातून उत्पादकतेला काहीच हातभार लागत नाही. ही उत्पादकता वाढवायची तर इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र या विषयांबरोबर मुलांची आकलनशक्ती, निर्मितीक्षमता विकसित होईल अशाप्रकारच्या शिक्षणावर भर द्यायला हवा. त्यादृष्टीनं कौशल्यं विकसित करायला हवीत. महत्त्वाचं म्हणजे 'मी काहीतरी निर्माण करू शकतो' हा विश्वास मुलांमध्ये वाढला पाहिजे. या दिशेनं प्रयत्न केले तर शाळा-महाविद्यालय नावाच्या भट्टीतून बाहेर पडणाऱ्या मुलांच्या रोजगाराचं काय असा प्रश्न निर्माण होणार नाही. ते स्वत:च स्वत:साठी रोजगार निर्माण करतील. हा स्वीकार आज केला तर त्याचे बदल दहा वर्षांनंतर पाहायला मिळतील. आज बीए, बीएस्सी, बीकॉम या पदव्या नावाला उरल्या आहेत. व्यावहारिक जीवनात त्यांचा उपयोग होतोच असं नाही. याबाबतीत मॅकेन्झी या कंपनीचा अहवाल असं सांगतो, की भारतातील जवळपास ६० ते ७० टक्के इंजिनीयर हे नोकरी करण्याच्या योग्यतेचे नाहीत. कारण त्यांना मिळणारी नोकरी आणि शिक्षण याचा काहीही संबंध नाही. त्यांचं असं म्हणणं आहे, की तुम्ही घेतलेलं शिक्षण हे तुमच्या व्यवसायाला अनुरूप असलं पाहिजे.

यातला पुढचा मुद्दा तितकाच महत्त्वाचा आहे. मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी आहे. अर्थशास्त्र असं सांगतं, की पैसा हा पैशाच्या मागे धावतो. आता ते समीकरण पूर्ण मोडीत निघालं असून ज्ञानाच्या (सरस्वतीच्या) मागे पैसा (लक्ष्मी) अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्राला शिक्षणाची समृद्ध परंपरा लाभली आहे. महाराष्ट्रातील घराघरात सरस्वतीचं अधिष्ठान आहे. ग्रामीण असो वा शहरी, अगदी गरीब कुटुंबातील पालकांनाही आपल्या मुलानं शिकून मोठं व्हावं असं मनापासून वाटतं. आता गरज आहे ती या मानसिकतेला योग्य दिशा देण्याची.

आजच्या वस्तुस्थितीला अनुसरून शिक्षणव्यवस्थेत बदल करण्यासाठी शासनावर निर्भर न राहता आता शिक्षणसंस्थांनीच कंबर कसायला हवी. शैक्षणिक धोरणात शासनानं त्यादृष्टीनं बदल करण्यासाठीचा आग्रह शिक्षणसंस्थांनी धरायला हवा. पण त्याच्या अंमलबजावणीपर्यंत वाट पाहात न बसता शिक्षणसंस्थांनी आपल्या शाळांपुरता एक वेगळा उपक्रम म्हणून एक वर्ग असा सुरू करावा जिथं पुस्तकी शिक्षण न देता मुलांना त्यांच्या कलाने त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील शिक्षण मिळवता येईल.

याच्या जोडीनंच या शिक्षणपद्धतीतून बाहेर पडणाऱ्या आणि स्वत:चा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन तरुणांना महाराष्ट्र शासनाच्या वतीनं अत्यल्प भांडवली साहाय्य (मायक्रो फायनान्स) उपलब्ध करून देणं गरजेचं आहे. त्यात परिणामकारकता आणायची तर त्यासाठी योग्य यंत्रणा उभी करावी लागेल. त्याचबरोबर या माध्यमातून दिलेले पैसे परत मिळणारच आहेत असा सकारात्मक दृष्टीकोनही ठेवायला हवा. पुढील काळात केवळ रोजगारनोंदणी करून नोकऱ्यांचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी रोजगारनिर्मितीचे समांतर पर्यायही उपलब्ध व्हायला हवेत. तसं झालं तर आजच्या ज्ञानयुगात महाराष्ट्रातील घराघरात सरस्वतीशेजारी लक्ष्मीचंही अधिष्ठान असेल.

**– नितीन पोतदार**
कॉर्पोरेट लॉयर
भ्रमणध्वनी : ९८२००५४७४७
nitin@jsalaw.com



# पैशाचे भान

**प्रवीण शिंदे**



येरे येरे पावसा, तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा

हे बालगीत ज्याला माहीत नाही असा मराठी माणूस सापडणार नाही. पैशाची ओळख व त्याचा असा उपयोग याची जाणीव आपल्याला अगदी लहान वयातच करून दिली जाते. पुढे एकूण संस्कारच असे घडतात, की शिक्षण घ्यायचे ते उत्तम पैसे कमावण्यासाठी. कोणताही निर्णय 'पैसा' या वस्तूला केंद्रस्थानी ठेवत घेतला जातो. मनुष्याच्या अनेक वर्षांच्या उत्पन्नातून साहजिकच व्यक्तिगत संपत्ती निर्माण होते. मग संपत्तीची वृद्धी वा व्यवस्थापन यांचे सल्ले दिले व घेतले जातात. पैसे कमावण्याची व वाढवण्याची जी कला आपल्याला अवगत केली जाते त्यापुढे पैशाचे भान आपण ठेवतो का याचा ऊहापोह आपण करणार आहोत.

प्रत्येक धर्मामध्ये दानाची संकल्पना आहे. पण ती आज काही व्यक्ती वा समूहांपुरती मर्यादित आहे. 'आयकर नियम ८० जी'नुसार आयकरामधून वजावटसुद्धा आपल्याला मिळते. तरी सुद्धा एकूण संपत्ती व्यवस्थापनशास्त्रामध्ये या देण्याबाबत एवढी उदासीनता का? चला तर मग एक तक्ता बनवू या, ज्याद्वारे आपले वय, आयुष्य अंदाजे, आजचे उत्पन्न, अपेक्षित खर्च, महागाई निर्देशांकानुसार वाढीव खर्च व शिल्लक संपत्ती यांचा एक ढोबळ अंदाज बांधू या. यातून आपण काहीतरी रक्कम आपल्या आवडीच्या, सामाजिक कामासाठी देऊ शकतो का याचा अंदाज आपणास येईल. मग दरवर्षी उत्पन्नाच्या १०% (दहा टक्के) रक्कम देणे जमेल का असा विचार केल्यास, निदान आपल्या राहत्या घराशिवाय इतर संपत्तीमधून किमान २% (दोन टक्के) रक्कम देण्याची मानसिकता तयार होईल.

पैसा हा जीवनात आनंद मिळवण्यासाठी आवश्यक आहे, परंतु ही आनंदाची व्याख्या प्रत्येक व्यक्तीनुसार बदलत असते. चला आनंद / समाधानाचे गणिती सूत्र बनवूया -

$$\text{आनंद/समाधान} = \frac{\text{संपत्ती}}{\text{गरजा}}$$

जेवढ्या गरजा कमी होतील तसे समाधान वाढेल. यातून फार काही त्याग वा वैराग्य अशी समजूत करून घेऊ नका. पहाट जवळ येताना जशी मेणबत्ती विझवावी तसा हा प्रकार आहे. म्हणूनच गरजा मर्यादित ठेवणे उत्तम. खूपजण असे जगतात, की त्यांची आजची संपत्ती त्यांच्या गरजांसाठी पुरेशी नाही, त्यामुळे ते सतत अपूर्णतेचा अनुभव घेत असुरक्षितता व भीती यांच्या छायेत असतात. या जगात प्रत्येकासाठी भरपूर आहे व आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत आवश्यक त्या गरजा भागवण्यापुरती संपत्ती आपल्याजवळ राहील ही ठाम भावना मनात निर्माण झाली तर आपल्याला आजच काहीतरी देण्याची भावना निर्माण होईल. त्यासाठी म्हातारपणाची वाट पाहायला नको! उत्तम म्हणजे यासाठी चक्क कागद-पेन घेऊन आपण आपल्या आवडीच्या सामाजिक कामांचा तक्ता बनवा, त्यामध्ये मनापासून भाग घ्या व वर्षाकाठी त्या कामासाठी किती रक्कम देणार आहात ते लिहून काढा व तो संकल्प जाणीवपूर्वक पूर्ण करा. या प्रकारे आपला प्रवास जीवनाच्या आपल्या उद्दिष्टांकडे विनासायास होईल व त्या प्रवासात एका आंतरिक समाधानाची कमाई आपणास नक्कीच होईल.

आता एका अध्यात्मिक दृष्टीने याकडे पाहू या. ही देण्याची भावना आपल्यावरील ऋणांतून मुक्त होण्याच्या जाणिवेतून निर्माण झाली तर उत्तमच ठरेल. आपल्याला तीन प्रकारची ऋणं फेडायची असतात. - पितृऋण, गुरुऋण व देवऋण.

पितृऋणामध्ये आपण, आपले आईवडील व मुले अशा तीन पिढ्यांचा विचार केला जातो. प्रपंचामध्ये आपली विहित कर्तव्ये यथाशक्ती जरूर करावीत. घरातील प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक गरजांकडे दुर्लक्ष करू नये.

गुरुऋणामध्ये, ज्या व्यक्ती आपल्याला काही विद्या देतात त्यांना गुरुपौर्णिमा वा शिक्षकदिनाच्या माध्यमातून आपण काही द्यावे. तसेच आपण जे ज्ञान आत्मसात केले ते दुसऱ्यांना नि:स्वार्थपणे देण्यासाठी काहींचे मार्गदर्शक बनावे.

'देवऋणा'मध्ये या सृष्टीच्या निर्मात्याबाबत आदरभाव ठेवून आपल्या समाजासाठी किंवा सेवाभावी संस्थांसाठी काही काम करू शकतो. हे देणे सहवेदनेच्या भावनेतून झाले पाहिजे. त्यामध्ये अहंकार किंवा दुजाभाव नको. आपण राहतो त्या परिसरामध्ये चालू असलेल्या सामाजिक उपक्रमामध्ये भाग घेऊ शकतो. आपल्या संपत्तीचे व्यवस्थापन करताना या देशाच्या संपत्ती व्यवस्थापनाकडे

जरा सजगपणे बघूया.

विविध उद्योगसमूह गेली अनेक वर्षे आपल्या नफ्यातील काही रक्कम विविध सामाजिक संस्थांना दान देत आहेत. आज देशातील कित्येक जगप्रसिद्ध शैक्षणिक संस्था, रुग्णालये, उद्याने, प्राचीन ऐतिहासिक स्थळे या उद्योगसमूहांच्या पाठबळामुळे उभी आहेत, पण हे दान ऐच्छिक न राहता कायद्यातील तरतूदीनुसार सर्व उद्योगसमूहांना बंधनकारक केले तर एक मोठा निधी विविध सामाजिक कामांना उपलब्ध होईल. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीबद्दल (औद्योगिक समूहांची सामाजिक बांधिलकी) थोडेसे विवेचन आवश्यक आहे. यामध्ये उद्योग हे सामाजिक विश्वस्त या भूमिकेतून चालवले पाहिजेत ही गांधीजींची भूमिका अभिप्रेत आहे. ज्या कंपन्यांची उलाढाल एक हजार कोटींपेक्षा जास्त आहे वा त्यांचे निव्वळ मालमत्ता मूल्य पाचशे कोटींपेक्षा जास्त असेल त्या कंपन्यांनी आपल्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्यापैकी किमान दोन टक्के रक्कम विविध सामाजिक कार्यक्रमांवर खर्च करणे बंधनकारक झाले आहे. या द्वारे विविध सामाजिक संस्थांना निधी उपलब्ध होईल. त्यातून देशात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. राष्ट्राच्या संपत्तीमध्ये निव्वळ राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाशिवाय विविध सामाजिक कार्यांचे संचित राष्ट्राच्या विकासाला वेगळे परिमाण देण्यास कारणीभूत होईल. आजच्या खाउजा (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) संस्कृतीमध्ये विविध सामाजिक घटकांच्या विकासाचा समतोल साधला जाईल व प्रत्येकाला आर्थिक स्थैर्य मिळेल. त्यामुळे देशात शांतता नांदेल.

व्यक्तिगत जीवनामध्ये आपल्या उत्पन्नातून दर वर्षी अशा प्रकारे हे देणे आपल्या हातून होत राहिले तर जणू एक आध्यात्मिक पातळी गाठते. जसजसे हे देणे घडते तसे आपले मन हलके होते. ह्या विश्वाला आपण जेवढे देतो त्याच्या कितीतरी पटींनी आपणास मिळते. कोणतेही देणे हे व्यर्थ नसते. हे देणे जर तत्पर, कोणत्याही अपेक्षेशिवाय फक्त प्रेम, आनंद व सहवेदनेच्या भावनेतून झाले तर ते पैशांचे अत्युच्च भान आपणास देईल.



हे जीवन एका विहिरीप्रमाणे आहे. जेवढे पाणी आपण उपसाल तेवढेच नवीन ताजे पाणी विहिरीत येईल. हे जीवन एका झऱ्याप्रमाणे निर्मळ होईल व आपण आणखी संपत्ती मिळवाल. हा पैशाचा व्यवहार फक्त गुंतवणूक, नफा, आयकर, संपत्तीकर, व्याज या परिघामध्ये न राहता एक वेगळेच भान आपणास देईल हे नक्की!

**– प्रवीण शिंदे**
संचालक व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन
भ्रमणध्वनी : ९८२००५७०१४
shinde_p@vsnl.com

टीप : लेखक गेली अठ्ठावीस वर्षे चार्टर्ड अकाउंटंट या व्यवसायात आहेत. विविध सामाजिक संस्थांशी त्यांचा जवळून संबंध आहे. संपत्ती व्यवस्थापनामध्ये अशा सामाजिक कामांसाठी निधी देण्याची मानसिकता समाजात निर्माण व्हावी या जाणिवेतून सदर लेख लिहिला आहे.

- एकाच उत्पन्नावर अवलंबून न राहता गुंतवणूकीद्वारे दुसरा उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करा.
- खर्च केल्यानंतर शिलकीतून बचत करण्यापेक्षा बचतीनंतर खर्च करा.
- दोन्ही पायांनी नदीच्या खोलीचा अंदाज घेऊ नका.
- एकाच टोपलीत सर्व अंडी ठेवू नका.

# अभिप्राय

प्रा. प्रदीप मोहिते
करमाळा, जि. सोलापूर
दि. १४/०१/२०१५.

प्रति,

परमादरणीय गांगल सर,

सर, तुम्ही 'कुरियर' ने पाठवलेले 'स्क्रीन इज द वर्ल्ड' आज मिळाले (म्हणजे १३ ला सायं ६ वाजता) रात्री १०.०० वा. वाचायला घेतले आणि आत्ता रात्री १.०० वा. वाचून पूर्ण केले.

पुस्तकाच्या पानापानातून तुम्ही वाचकांशी अक्षरशः बोलताय असे वाटले. असो.

खूप छान पुस्तक आहे. छान अशा साठी की, (१) ते कमालीचं 'बोलकं पुस्तक' आहे. (२) महाराष्ट्रा विषयी तुमचं असलेलं भान वैश्विक आहे. (३) त्यातील — तुमचे असलेलं भान वैश्विक आहे. (३) त्यातील — सनावळ्यांसह तुम्ही केलेलं (साधार) विवेचन अभ्या- सकांच्या दृष्टीने प्रेरक व मार्गदर्शक आहे. (४) तुम्ही केलेली महाराष्ट्राची चिकित्सा अभिनव आणि चर्चा- वादविवादाला पोषक आहे. (५) सध्या MPSC/UPSC च्या पाठी जीवन पणाला लावलेल्या भावी नोकरशहांसाठी हा ग्रंथ म्हणजे एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे. (अ उद्याच मी माझ्या MPSC/UPSC फायटर — विद्यार्थ्यांना हे पुस्तक वाचा असं सांगणार आहे.) (६) तुमचा कला — साहित्य — समाजकारण — राजकारण — संस्कृती — माणूस — त्याचं व्यक्तिस्वातंत्र्य — मिडिया — आणि संपूर्ण जग यांचं आकलन पाहून थक्क झालो.

पण........

(१) लो. टिळकांचा गणेशोत्सव, अमेरिकेत गेला हे वाचतांना मला 'देशाचे दुश्मन' आठवत होते (२) बाळशास्त्री जांभेकर वाचतांना म. फुले आठवत होते. (३) साहित्यावर तुम्ही बोलतांना नामदेव ढसाळ च्या कवितांचा उल्लेख कधी येतोय याचा शोध माझी नजर घेत होती. (४) राजकारण-समाजकारणाचा ऊहापोह जेव्हा तुम्ही करत होतात तेव्हा दलित-चळवळीचे मूल्यमापन आता करते होईल या कडे माझे लक्ष्य लागले होते.

हे आपलं मला वाटलं ते लिहिलं. बाकी काहीही म्हणा पण तुम्ही मात्र आधुनिक महा- राष्ट्रातील समकालीन भाषिक वास्तव असे काही रेखाटले आहे की, बोलायचे काम नाही. या पुस्तकाच्या वाचना नंतर मराठी माणूस फक्त कामाचेच बोलेल (अधिक आणि लिहील ही कळवावा) अशी ताकद या पुस्तकात आहे.

पुस्तक पाठवून मला तुम्ही कायमचे ऋणी केलेत यास्तव शतकोटी धन्यवाद!

तुमचा
[illegible]

---

☼ अध्यक्ष : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे : शाखा - बार्शी
☼ माजी राज्य सचिव : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
☼ माजी अध्यक्ष : मा. अण्णा हजारे प्रणित - भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन, बार्शी

**श्री. पां. न. निपाणीकर**
'मधु', ७२५/१-६७, शिवाजी नगर,
**बार्शी - ४१३ ४११**, जि. सोलापूर (महा.)
फोन : ०२१८४ - २२३८४१, मोबा. ८८०५६०२०६२

दिनांक : २१ जाने. २०१५

प्रति,
मा. श्री दिनकरजी गांगल सर,
मुख्य संपादक, थिंक महाराष्ट्र डॉट कॉम,
दादर (पूर्व) मुंबई-१४
स. न.

अप्रतिम ....आणि केवळ अप्रतिम!

आपण अगत्यपूर्वक पाठविलेलं आपलं 'स्क्रीन इज द वर्ल्ड' हे पुस्तक वाचून संपवलं आणि उत्स्फूर्त, आतून प्रतिक्रिया आली ..अप्रतिम ...आणि केवळ अप्रतिम!

सखोल चिंतन, वैचारिक प्रगल्भतेचा वस्तुपाठ, सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचे यथार्थ भान, सूक्ष्म अवलोकन व आकलन, समस्या मांडण्याची टोकदार तरीही न बोचणारी हातोटी, सहज-सरळ-ओघवती शैली, सागतीकरणाच्या एकूणच वैश्विक परिप्रेक्षात सपाट्याने होत चाललेल्या वेगवान बदलांचा घेतलेला अचूक वेध - या पुस्तकाची अशी किती वैशिष्ट्ये सांगावीत?

मागच्या बऱ्याच दिवसांत असे कांही मर्मग्राही, कसदार आणि वाचकांच्या बोथट बनलेल्या संवेदना पुन्हा चेतविण्याची क्षमता असलेले लिखाण वाचनात आले नव्हते. ती कसर 'स्क्रीन इज द वर्ल्ड'ने भरुन काढली. गोंधळलेल्या, बावरलेल्या, भांबावलेल्या समाज मनाला कार्यप्रवणतेची नवी दिशा दिशा दाखविण्याचे काम हे पुस्तक निश्चितपणे करील यात संदेह नाही!

आठवणीने, अगत्यपूर्वक पुस्तकाची प्रत पाठविल्या बद्दल मनःपूर्वक धन्यवाद!

थिंक महाराष्ट्र डॉट कॉमच्या पुढील कार्यवाही संबंधी जरुर कळवावे.

स्नेहांकित
[signature]
(पां. न. निपाणीकर)

---




## स्क्रीन इज द वर्ल्ड

**दिनकर गांगल**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

बदलते तंत्रज्ञान, उपलब्ध होत असलेली नवनवी माध्यमे आणि क्रांतिसदृश स्थित्यंतराच्या वातावरणातील मराठी भाषा-संस्कृतीचे स्थान यांचा उहापोह करणारे हे लेखन. ते लोकल आणि ग्लोबल या वास्तवाचा 'ग्लोकल' स्वरूपात यथार्थ वेध घेते आणि तंत्रज्ञानामुळे व्यक्ती-व्यक्तीला लाभलेल्या स्वातंत्र्याची व सामर्थ्याची रास्त जाणीव करून देते.


# ग्रथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

‘आयुष्य सुंदर जगावे, आरोग्यपूर्ण जगावे कसे, याच्या एका उच्च कोटीच्या सहृदय डॉक्टरने दिलेल्या टिप्स तर या पुस्तकात आहेतच; त्याचबरोबर आपले जीवनविषयक तत्त्वज्ञानही थोडक्यात, चपखलपणे आणि रसिक दृष्टीने त्यांनी सांगितले आहे. जीवन त्यांना कळले हो... अशी जी माणसे असतात त्यामध्ये रामाणींची गणना करायला हरकत नाही.’

‘सत्तरीचे बोल...’ या पुस्तकावरील हा अभिप्राय आहे ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक, अरुण साधू यांचा. डॉ. रामाणी यांनी लिहिलेल्या या पुस्तकावर अनेक मान्यवरांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.




डॉ. अलका मांडके लिहितात, ‘सकारात्मक जगण्याबद्दल बोलणे सोपे असते, प्रत्यक्ष प्रसंगाला तोंड देण्याची वेळ येते तेव्हा सारे विसरले जाते. परंतु डॉ. रामाणी यांनी ‘सत्तरीचे बोल...’ या त्यांच्या पुस्तकात स्वतःच्याच उदाहरणातून, वेगवेगळ्या प्रसंगातून ते प्रत्यक्ष दाखवून दिले आहे – कुठलाही उपदेश न करता जणू वाचकाला हात धरून मित्रासारखे आपल्याबरोबर ठेवलेय.’

सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मनीषा पिंपळखरे लिहितात, ‘सत्तरीचे बोल’ हे पुस्तक वाचले आणि एका नव्याच ३डॉ. रामाणींची ओळख झाली. तीव्र जीवनेच्छा असेल तर सत्तरीच्या उंबरठ्यावर उभं राहून मागे सरलेल्या आणि पुढे परसलेल्या जीवनाकडे प्रगल्भ नजरेनं कसं पाहता येतं याचा अनुभवनिष्ठ वस्तुपाठ या पुस्तकाच्या रूपानं प्रत्ययाला आला.’

डॉ. रामाणी यांचे ‘ताठ कणा’ हे पुस्तक आपण वाचले आहे. त्यातून डॉ. रामाणींचा जीवनाकडे पाहण्याचा आणि प्रत्येकाला उत्तम आरोग्याचा मंत्र देण्याचा सकारात्मक दृष्टिकोन त्याचवेळी आपल्या अनुभवाला आला होता. उत्तम आरोग्य कसे राखावे आणि त्यासाठी वयाची अट आहे का, हा खरा वास्तवात नसलेला प्रश्न सहजपणे बहुतेकांच्या डोक्यात चटकन उपस्थित होतो. सुखी जीवन जगायचे, आनंदाच्या राशीत लोळायचे, तर आरोग्य उत्तम राखण्याला पर्याय असू शकत नाही. आणि त्यासाठी फार काही करावे लागते असे नाही. गरज आहे ती शिस्तीची. ती शिस्त म्हणजेच आरोग्याचा गुरुमंत्र. तो गुरुमंत्र डॉ. रामाणी देत आहेत या पुस्तकातून. अगदी सहजपणे. सोप्या पद्धतीने. कुणालाही आकलन होईल अशा पद्धतीने. कारण हा गुरुमंत्र उजळून निघालेला आहे, त्यांच्या स्वतःच्या अनुभवाच्या मुशीतून. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ ज्ञानाच्या परीसस्पर्शातून.

या जन्मावर, या जगण्यावर प्रेम करायचे तर लहानपणापासूनच आरोग्याच्या चांगल्या सवयी लावणे आवश्यक आहे. सकाळी लवकर उठणे, जॉगिंग, ध्यानधारणा करणे, याने दिवसाची सुरुवात करा. मन प्रसन्न ठेवा, रागाचा लोभ आवरा, यासारखे सोपे पण आनंद देणारे उपाय जवळ बाळगा. प्रमाणाबाहेर शारीरिक दगदग नको आणि मानसिक ताण नको हे तनमन प्रसन्न ठेवण्याचे सूत्र. मन प्रत्येकक्षणी चांगल्या सकारात्मक विचारांनी भरलेले असावे. त्याचा परिणाम नकळत शरीरावर होतो. ते तंदुरुस्त व सक्षम बनते. साठीचा उंबरठा ओलांडला असेल, निवृत्त झाला असाल तर ‘आता निव्वळ आराम’ ही संकल्पना सोडायला हवी. प्रवास, वाचन, लेखन, लोकांत मिसळणे, जागतिक व सामाजिक घडामोडीविषयी मते वृत्तपत्रांना कळवणे, हे करत राहिल्यास नैराश्यापासून दूर राहता येईल. आहार आणि व्यायाम कसा असावा याचेही गणित जुळवायला हवे. अशा अनेक उपयुक्त आरोग्याच्या टिप्स डॉ. रामाणी यांनी या पुस्तकात दिलेल्या आहेत.

डॉ. रामाणी स्वतःचे अनुभवही वाचकांसमोर ठेवतात. आज ते सत्तरीच्या पुढे आहेत. जगातील दहा नामांकित न्युरोसर्जनांमध्ये त्यांची गणना होते. त्यांच्या या अचंबित करणाऱ्या प्रवासाचे वर्णन ते करतात, ‘बुद्धिमत्तेबरोबर, अपरिमित कष्ट आणि स्वतःत नेतृत्वगुणांचा विकास करत मी या यशोशिखरापर्यंत पोचलो आहे. शरीर स्वास्थ्यासाठी रोज पहाटे उठणे आणि जॉगिंग करणे हा माझा परिपाठ आहे. त्याचप्रमाणे नियमित ध्यानधारणा करून मी माझे चित्त शांत, प्रसन्न ठेवण्याची काळजी घेतो. माझा मित्रपरिवार मी सतत वाढता ठेवला.’

सत्तरीच्या उंबरठ्यावर असलेल्यांनी जरूर वाचावे असे लेख आहेत. तसेच सर्वच वयातील वाचकांनी सत्तरी गाठण्यासाठी कसा जीवनक्रम असावा हे समजून घेण्यासाठी हे पुस्तक वाचावे, असे आहे. लेख मोजक्या शब्दात नेमके तेच सांगणारे हे लेख आहेत. मी किती मोठा हे सांगण्याऐवजी प्रत्येकाला कसे मोठे होता येईल, ही भावना यात आहे. स्वतःच्या चांगल्या सवयी आणि चांगले जे काही काही सांगण्यासारखे आहे तेच यात आले आहे. त्यांना अनुभवाची जोड असल्याने त्यातला सशक्तपणा लक्षात येतो. शेवटी काही व्यायामाचे प्रकारही दाखवलेले आहेत. हे लेख वाचताना वाटत राहते, आजारी माणसांनी सल्ल्यासाठी डॉक्टरांच्या दारात रांग लावण्याऐवजी डॉक्टरच आपल्या दारात उभे आहेत, तेही कुठली फीची अपेक्षा न करता.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

अरब देश म्हटले की तेल आणि सोने ही समीकरणे ठरलेली. सामान्य माणसांना या वाळवंटी तेलाचा तसा मोह असण्याचे कारण नाही. परंतु सोन्याचे नाव काढले तर झोपेतून पळत सुटेल. एक काळ असा होता, खरोखर अनेकजण या देशाकडे धाव घेत. सोन्याचा धूर निघतो म्हटल्यानंतर तोही सोनेरीच असणार. मग स्वप्नाळू, ध्येयवादी भाग्यावरील काजळी झटकण्याची सुवर्णसंधी ते कशी सोडतील? परंतु सगळेच तसे धावत सुटतात असे नाही. अन्य कारणामुळेही या धुराचे ढग पाहण्याची संधी अनेकांना मिळते. तशी ती डॉ. दळवी दाम्पत्याला मिळाली. त्यांनी या संधींचे सोने किती केले, यापेक्षा या काळात त्याना अनुभवांनी किती समृद्ध केले, हे अधिक महत्त्वाचे. या देशातले अंतर्गत जीवनमान, व्यवस्था आणि निसर्ग याचेही कुतूहल न टाळता येणारे. त्यांनी ते सारेच अलगद टिपलेले आहे, पायाला वाळूचे कण बिलगावेत तसे. हे तेथील वास्तव्यात अनुभवाला आलेले जीवनकण आपल्यासमोर पसरून ठेवले आहेत डॉ. उज्वला दळवी यांनी.

सोन्याच्या धुराचे ठसके

डॉ. उज्ज्वला दळवी




डॉ. दळवी दाम्पत्य आणि काहीजण असे बाराजण अरब देशाच्या भूमीवर पाय ठेवतात. जवळपास पंचवीस वर्षे ते याच भूमीत डॉक्टर म्हणून काम करतात. हे काम करीत असताना त्याना जवळून पाहता आले तेथील ग्रामीण जीवन, शहरी जीवन. नमाजाची वेळ झाली की सर्व कामकाज बंद. गुन्हेगाराला जाहीर शिक्षा करताना केलेला शिरच्छेद. स्त्रियांबाबातचे कठोर नियम, नखशिखांत बुरखा घातल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी गेल्यास, परक्या पुरुषासमोर गेल्यास डोक्यावर छडीचा प्रसाद. व्याज नाही म्हणून आणि पूर्ण कर्ज मिळत असल्याने गाड्या उडवण्याची चैन. महिलांनी वाहन चालविण्यास असलेला कडक निर्बंध. महिलांची मातृत्व हीच कसोटी . जिला अधिक मुले होत नाही ती घटस्फोटाला पात्र. मुलींना हुंडा देण्याची पद्धत. त्यामुळे मुलीसाठी वराचे वय पाहण्यापेक्षा पैशाची राशी पाहिली जाण्याची रीत. फ्री व्हिसावर बाहेर देशातून आणलेले, फसलेले लोक. नोकर म्हणून राबणाऱ्यांच्या व्यथा. असे कितीतरी अनुभव यात उलगडतात.

लेखिका डॉक्टर आहेत म्हणून त्यांच्यासाठी वेगळा नियम? नाही. त्या स्त्री आहेत ना, मग बुरखा पहिला. म्हणून पहिल्या पगारात त्यांची पहिली खरेदी आहे ती बुरखा. यालाच अबाया म्हणतात. लेखिका नमूद करतात, 'पूर्ण अबाया घातलेली म्हणजेच तालेवाराची लेक-सून रस्ता ओलांडू लागली की धावत्या गाड्या आदाराने थबकून तिला वाट करून देतात.'

'सौदीच्या स्वदेशीसुतांनी नियमांना बगल दिली तरी त्यांना शिक्षा होत नाही. तिथल्या अनागोंदी कारभाराचा भार असह्य होतो तो केवळ परदेशी चाकरमान्यांना.' हे सत्य त्यांना विषम वाटते, हवामानासारखे.

सोन्याचा वर्ख आणि तेलाचा गर्भ असलेले अफाट वाळवंट ही या देशाची संपन्नता. तशी या वाळूत अनेक प्राण्यांची वस्ती. इथले हवामानही विषम. कधी वादळ होईल याचा भरवसा नाही. रणरणीत भाजणारे ऊन आहेच, तर हिवाळ्यात जमिनीवर बर्फाची लादी जमावी अशी थंडी पडते. धुके इतके प्रचंड की जवळचे दृष्टीला पारखे व्हावे. या हवामानाचा अनेकदा अनुभव त्याना आला आहे, जीवघेणा, कायमचा लक्षात राहावा असा.

इथल्या वास्तव्याकडे लेखिकेने अतिशय मोकळ्या मनाने पाहिलेले आहे. दवाखान्यात येणाऱ्या तरुण मुलींच्या अडचणी आणि आजार यातून परिस्थितीचे भान टिपले आहे. आदरातिथ्य, रीतभात यात दिसलेले खानदानीपण कुतूहलाने स्वीकारले आहे. निसर्गाचे वर्णन करताना त्या हरखून जातात. 'जुबैल' शहर पाहताना त्या म्हणतात, 'नैसर्गिक हिरव्यानिळ्याच्या कोंदणात वसलेलं ते लखलखीत रत्न तेव्हाच मनात भरलं.' कार खरेदी करताना लिहितात, 'बघण्याच्या कार्यक्रमात गाडीची चालचलणूक व्यवस्थित आहे ही खात्री पटल्यावर त्याला गाडी पसंत पडली.' यजमानीण माशाचे काटे तिच्या उष्ट्या बोटांनी काढून देऊ लागली तेव्हा लिहितात, 'त्या अन्नदात्या हाताची काळी नखं आठवली की अजूनही वदनि कवळ घेता ढवळते पोट भारी.'

एकूणच भाषेचा डौल फार प्रसन्नपणे सांभाळलेला आहे. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही या मनमोकळ्या वर्णनाशी साजेसे झाले आहे. एक वेगळा अनुभव देणारे हे पुस्तक आहे.

- **मूल्य २७५ रु. सवलतीत १६५ रु.**

# ग्रंथपान

'लग्न झाल्यावर नवरा बायकोनं कसं वागावं हे शाळा कॉलेजच्या परीक्षेला का नसावं? याचं उत्तर कोन देईल मला?'

'.. लय वाईट बेकार जीनं. सादली तर शिकार नाईतर भिकार ! पकडल्यावर मायचं दूध आटवतं. आन आमाला का कमी डोकं चालववं लागतं? मस रंगढंग करावं लागत्यात, तवा कुटं एकांदी शिकार सात्ती.'




या भाषेचं वळण आहे दखनी प्रदेशातलं. आपल्या पद्धतीनं ठासून बोलणं. याच भाषेतला हा संग्रह म्हणजे 'भिडू'. लेखकाला त्याच्या शालेय जीवनात भेटलेले, पुढे जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भेटलेले हे त्याचे भिडू. त्यांच्या कथा. अशा नऊ कथांचा हा संग्रह असून त्याचे लेखक आहेत भगवान इंगळे. भगवान इंगळे यांची आणि आपली भेट यापूर्वीच झालेली आहे, 'ढोर' या त्यांच्या आत्मचरित्रातून. त्याची भाषा ही देखील हीच होती. आताही तीच आहे. लेखक ज्या मातीत घडला, त्याचा गंध आणि गुण कसा सुटणार? रा.रं. बोराडे यांच्या काही कथा याच नाद-तालातल्या आहेत. त्याचा प्रत्यय 'भिडू'मधून येतो. यात आणखी एक विशेष ठळकपणे लक्षात येणारा आहे तो म्हणींचा. पात्रांच्या संवादात येणाऱ्या म्हणी इतक्या सहजपणे आणि तितक्याच चपखलपणे येतात, की आपणही काही क्षण वाचताना थबकून जातो. त्यांची ही पेरणी म्हणजे दाणेदार कणसाला आलेला मोहोर. तो प्रत्येक कथेतून आपल्या भेटीला येतो.

'धनगर बसला जेवाया आन ताकासंग शेवाया.' 'माडचावर माड्या बत्तीस माड्या, हात न्हाय पुरत बोंबल भाड्या!'

'नवाल नवटं आन टिरीला कवटं.' 'हिचा हात काय न्हाईना आन काम काय व्हईना.'

'भिडू' म्हणजे ज्याच्या सुखदुःखात समरस होतो; ज्याच्यापासून काही लपवत नाही; जो अंतःकरणाला भिडतो; तो भिडू असा साधारणपणे अर्थ घेतला जातो. परंतु विशिष्ट प्रवृत्तीनुसार व्यक्तीची जीवनशैली बनते. त्याची ठरावीक मानसिकता असते. ती प्रवृत्ती किंवा मानसिकता त्या व्यक्तीचा भिडू हा अर्थ, असे लेखकाला अभिप्रेत आहे. आणि या संग्रहात आलेल्या व्यक्तींचा आलेख उभा राहिलेला दिसतो तो याच अर्थावर. माणसांचं वागणं, बोलणं, त्याची प्रगती, अधोगती, हे सारे अवलंबून ते त्याच्या प्रवृत्ती आणि मानसिकतेवर, याचा प्रत्यय प्रत्येक कथेतून आपणास येत राहतो.

'जय जवान' या कथेतला जयराम, डोक्यानं उजवा, चुणचुणीत. तल्लख बुद्धीचा. जगावेगळं काही करून दाखवयाची धमक बाळगणारा. पण दुष्काळात शिक्षण सुटलं. सैन्यात गेला. एकदम पिळदार, तगडा, लाल गाजरावानी झाला. घर सजलं. गावाचं नाव केलं. त्याच्या शब्दाला किंमत आली. पण घरातल्या, बाहेरच्या माणसांचं वागणं अंगावर येत गेलं. श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्या कचाट्यात सापडला. सीमेवर शत्रूला गोळीने लोळवणारा जयराम घरच्या शब्दांच्या गोळ्यांनी घायाळ होत गेला. 'घरातल्या खुळचट रीतिरिवाजाच्या शतूसंग झुंजायचं ध्यानी धर' असा बायकोला सल्ला देणारा जयराम बायकोलाच परेड करायला लावू लागला. बिथरल्यासारखा मुलाबाळांशी, घरच्यांशी वागू लागला. शेवटी पोटच्या पोराने त्याच्यावर हात उचलला. आणि जयराम खचला. एक जवान घरातच घायाळ होऊन पडला.

तीच तऱ्हा 'सुकडी बाहत्तरीन'मधल्या सुकडीची. आधीच गरिबी, त्यात दुष्कळात जन्माला आलेली. बाहत्तरच्या दुष्काळी कामावर असलेल्या मजुरांना खाण्यासाठी सरकार सुकडी देई. म्हणून हिचं नाव सुकडी. लग्नाला सतरा विघ्न. आणि झालं तरी विघ्नांचा फेरा कायम. इतरांच्या वागण्याचा फटका तिच्या संसाराला बसतो. तसा स्वतःच्या वागण्याचाही. तीच शेवटी कबूल करते,'माझी मिस्टेक झाली. थोडी कळ काढायची होती. दादाच्या ढेकीनं माहेरी आल्याची केवढी मोठी सजा ही.'

'पळपुटे महाराज' या कथेतला बळीराम गाढवे, याची कथाच भन्नाट. शिक्षणाच्या नावाने पोबारा करणारा बळीराम हा लेखकाचा मित्र. एक दिवस लेखक ज्या विद्यालयात अध्यापन करतो, तिथेच हजर होतो, शिक्षणाधिकारी म्हणून. मात्र मोठेपणाच्या नादात आईच्या जुनेराचा तिरस्कार करतो. आई घर सोडून निघून जाते. तिचा पत्ता लागत नाही. 'तिचे कष्ट होते म्हणून मोठा झालो. पण तिला वाईट बोललो याचं वाईट वाटतं', असा शेवटी पश्चात्ताप करत राहतो.

डागुराचा प्रताप किती आणि कसा प्रतापी आहे, याचे वर्णन मजेशीरच. भामटा राजपूत असलेला हा प्रताप चोऱ्या करताना काय शक्कल लढवावी लागते, याची मजेशीर वर्णनं करतो. प्रा. दाणी, लीलाबाई, गणितज्ञ कवडू, आगलावे जीवन यांच्याही कथा लक्षणीय आहेत. यात येणारे स्वभाव, गावगाडा, परिसर, झालेले बदल लेखकाने बारकाईने टिपलेले आहेत. त्यामुळे हा संग्रह कसदार झाला आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**पंखाविना भरारी**

प्रसादची आई




अपत्य जन्माचा आनंद हा एक सोहळाच. सारे कुटुंब आनदांच्या सागरात न्हात राहते. कृतार्थ झाल्याची भावना उचंबळून येते. तसा सोहळा घाडी कुटुंबाच्या भरलेल्या संसारात सुरू झाला, प्रसादच्या जन्माने. या सुदृढ आणि गोंडस प्रसादच्या भोवती भविष्याच्या स्वप्नांचे इमले उभे राहू लागले. आणि त्याचवेळी मेडिकल रिपोर्ट आला, प्रसाद कधीच चालू शकणार नाही. सारेच इमले मृगजळाचे भासले. परंतु आईवडिलांनी धीर सोडला नाही. खंबीरपणे उभे राहायचा निर्धार केला. आणि एक बाळलीलांचा रांगणारा लडिवाळ प्रवास सुरू झाला. या प्रवासाची ही कहाणी, आईच्या काळजातून उतरेली. मायेची, ममतेची, जिव्हाळ्याची, कर्तव्याची आणि कारुण्याची. जी लिहिताना हातच नव्हे तर मनही थरथरले. पेनातून शाई नाही, काळजातला पान्हा उतरला. साकार झाले ते शब्द नाही, ओथंबलेले मातृत्व आहे. पुस्तकावर लेखिकेचे नाव नाही, 'प्रसादची आई' लिहिले आहे, यावरून भावना लक्षात यावी.

''प्रसादला 'स्पायनल मस्क्युलर अ‍ॅट्रोपी' नावाचा आजार आहे. म्हणजे मज्जारजूशी संबंधित मासपेशींचा क्षय होणे. या व्याधीत मांसपेशींचा हळूहळू क्षय होत गेल्याने स्नायू क्षीण होत जातात. फुप्फुसांची क्षमता कमीकमी होत जाते. त्यामुळे सर्व हालचाली कमीकमी होत जात शेवटी बंद होतात. या आजारावर कोणताही उपाय नाही. अशा मुलांचं आयुष्य कमी असतं. त्याला देता येईल तेवढा आनंद द्या. सर्व इच्छा पूर्ण करा. त्याला खूश ठेवायचं.'' डॉक्टरांनी भान दिले आणि आईवडिलांनी हे दान स्वीकारले.

प्रसादकडे पचनशक्ती, वाणी आणि बुद्धीचे वरदान होते. त्याच्या जोरावर त्याने दहावीचा सोपान पार केला. तोही ८६ टक्के गुण मिळवून. त्याने गायनाचे सूर अचूक पकडले. शाळेपासून दुबईपर्यंत त्याचा सूर पोचला. त्याच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या. जीवनातले आनंदाचे रंग त्याने चित्रकलेतून गडद केले. एक चित्र राष्ट्रपतींना भेट दिले. 'राष्ट्रीय बालश्री पुरस्कार' राष्ट्रपती भवनात जाऊन स्वीकारला. महाराष्ट्र शासनाच्या सन्मानाचा तो मानकरी ठरला. आणि जन्मासोबत आलेल्या व्याधीने तिचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी त्याला परतीच्या प्रवासाला बोलावले, वयाच्या बाविसाव्या वर्षी.

प्रसादला सर्वच बाबतीत दुसऱ्यांची मदत लागायची. तरी त्याची जिद्द कुठेही कमी पडलेली नाही. आई शिक्षिका असूनही प्रसादला शाळेत प्रवेश मिळवणे तिला अवघड गेले. पण सगळेच वाईट नसतात याचा अनुभव आला. खूप चांगली माणसे समाजात आहेत. त्यांनी प्रसादला आपला मानले. प्रोत्साहन दिले. आई वडील यांनी जे जे करता येईल ते सर्व केले. बापाने कायमची रात्रपाळी घेतली. दिवसभर त्याच्यासोबत राहिला. त्याच्या इच्छा पूर्ण केल्या. त्याला आनंदी ठेवला. मनातल्या वेदना मुखावर न येऊ देता.

'माझं दुःख मी खिशात घेऊन फिरत असतो. ते जर मला सोडून गेलं तर कुठेतरी भरकटेन. माझ्यासोबतच राहिलं तर बरं वाटतं.'

'छातीवर हात मारून सांगण्यासारखं जे काही माझ्याकडे आहे ते सगळं प्रसादचं आहे. प्रसादबद्दलचं आहे.' प्रसादचे वडील नागेश घाडी सहकाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तर देत ती अशी.

पुस्तकात प्रसादचे काही फोटो दिलेले आहेत. त्याने रंगवलेली चित्रे दिलेली आहेत. मुखपृष्ठावरील चित्र प्रसादचे आहे. पुस्तकाच्या शेवटी आईने आपल्या लाडक्या सोनूला लिहिलेलं पत्र आहे. प्रदीप जोशी, दिगंबर चिचकर, सूर्यकांत जाधव, भूषण कुलकर्णी यांनी प्रसाद विषयीच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. तर स्पायना मस्क्युलर अ‍ॅट्रोपी – लक्षणे व उपाय या विषयी डॉ. बापुरेकर यांचे टिपण दिलेले आहे. डॉ. स्नेहलता देशमुख यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे.


- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे




'इये मराठीचिये नगरी' पुस्तकाचे प्रकाशन.
छायाचित्रात उजवीकडून उषा तांबे
श्रीमती कुटिनो सीसिलिया कार्व्हालो, वीणा गवाणकर,
अरुणा ढेरे, दिनकर गांगल, फादर अल्मेडो,
उज्ज्वला मेहेंदळे व संपादक अशोक बेंडखळे

ज्योती शेट्ये लिखित
'ओढ इशान्येची' पुस्तक प्रकाशनसमयी
प्रभाकर भिडे
रविप्रकाश कुलकर्णी
दिनकर गांगल
आणि Pai's Friends
लायब्ररीचे संस्थापक पुंडलिक पै





डॉ. वर्षा दंडवते लिखित
'डॉक्टरांच्या जगात'
या पुस्तकाचे प्रकाशनसमयी
डॉ. अमित मायदेव
लेखिका डॉ. वर्षा दंडवते
आणि सुदेश हिंगलासपूरकर

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा
'जनस्थान' पुरस्कार
स्वीकारताना अरुण साधू
डावीकडून – अरुणा साधू
अरुण साधू
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
मधु मंगेश कर्णिक
जब्बार पटेल
आणि दिनकर गांगल



RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.

Kalyani Charitable Trust's

# Sapkal Knowledge Hub™

*Education Goes The Global Way...*

One with the world, one of a kind

**WITH BEST COMPLIMENTS**

## Orchid International School™ Residential, Nashik

ICSE Curriculum    Residential / Day Boarding    Grade Nursery to X

Ranked as top Ninth Co-educational Boarding Schools of the Country and **Third** in Maharashtra by Education World C-FORE Survey **2014**

## EN 5182 Late G. N. Sapkal College of Engineering

**UG Courses** (Civil / Computer / Electrical / E & TC / Mechanical)
**PG Courses** M. E. Civil (Structure) / M. E. Computer / M. E. Mechanical (Design) / M. E. E & TC (Signal Processing) / Ph. D. (Civil)

## MB 5127 K. R. Sapkal College of Management Studies (MBA)

(Marketing / Finance / HR / IT & Systems / Production & Material / International Business Management) Supply Chain Management / Rural & Agribusiness / Family Business / Technology Management) /
**Ph. D. (Management), French Language Classes**

## PH 5210 R. G. Sapkal College of Pharmacy

Bachelor of Pharmacy
M. Pharma (Quality Assurance Techniques)
M. Pharma (Pharmaceutics)
Ph.D (Pharmaceutical Chemistry)







**CORPORATE OFFICE:** Sapkal Knowledge Hub, 46 "Parag", Ashwin Sector, Opp. Hotel Sai Palace, Mumbai-Agra Highway, Nashik - 422 009.
**Tel: +91 253 - 2392450/ 51 Fax: +91 253 - 2375557 Mob.: 9881202880**

**CAMPUS:** Sapkal Knowledge Hub, Kalyani Hills, Anjaneri, Wadholi, Trimbakeshwar Road, Nashik - 422213 **Tel. No: 02594 220162 / 65 / 67 Fax: 02594 220164**
**Mob.: 9420695484 www.sapkalknowledgehub.org**

**Mr. Ravindra G. Sapkal**
Chairman & Managing Director

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.